रोग़नबदल रोषनाई दिवाबती
रोजीना कचे वजन ८८·।·

सदरहू प्रमाणे बदस्तुर साबीक अब्द मुदती गुदेरत गेली आहे. म्हणौन जाहीर केळें त्यावरुन सवाल करुन दिधळा असे . . . . . ची बंदगी करुन पिरांचें दरगाहां व महजिदीची खिजमती करुन ईबाहुती करुन खुशनूद[1] आराम पावोन पैदाकुनी याकें बंदगीत मशगुळ होणे फकीर फकीराणा येईळ त्यासि नान रोटीची खबर घेत जाणे सवाल

छ १७ सफर

At the request of Mulla Said Burhan, Said Malik and Said Jana Khadim of Mauje Jejuri the prince Azam continued watan of land to them for the maintenance of Pir Kanan and Pir Makhdum and Masjids at Jejuri and Valhe. Formerly similar Sanad was granted to them by Shahaji Raje, Shivaji Raje and Mirza Raja Jaising.

[1] खुशनूज-खुशनूद = आनंद.

शिवाजी कवडे यास मौजे दरुज येथे जमीन इनाम

रा. श. १९ अंगिरा फाल्गुन शु. ८ } **क्र. ३१*** { श. १६१४, फाल्गुन शु. ८ इ. १६९३, मार्च ५

स्वस्ति श्री राज्याभिशेक शके १९ अंगिरानाम संवछरे फाल्गुन शुा ८ भानुवासर क्षेत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजश्री देशाधिकारी लेखक वर्तमान भावी प्राा खटाऊ यासी आज्ञा केली ऐसीजे सिवाजी कवड याचेविषई राजश्री संताजी घोरपडे पंचपक्षी याणी चेज़ीचे मुकामी स्वामीसंनिध येऊन विनंती केली

सिका प्रधान
मोरेश्वर सुत
नीलकंठराव

सिका
प्रतिनिधि

की सिवाजी कवड हे देशीहून स्वामीच्या पायासी येकनिष्टता धरुन कर्नाटक प्राती चेजीस आले येऊन स्वामीसेवा येकभावे करीत आहेत यासी नूतन इनाम द्यावे आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केले त्यावरुन स्वामी त्यावर कृपाळू होऊन त्याचे पटेलगीचे गांव मौजे दरुज[1] प्राा माार येथे इनाम जिरायत पैकी भूमी चावर १ येक कुलबाब कुलकानु खेरीज हकदार करुन दिधले असे विशा पांडाचा बिघिया मोजणीप्राा सदरहू भूमी याचे स्वाधीन करणे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे या पत्राची प्रति लिहून घेऊन मुख्य पत्र इनामदार माारास परतोन देणे जाणीजे निदेश समक्ष मोर्तब मर्यादेयं विराजिते

रुजु

तारीख ७ रजब सुाा
सलास तिसैन

बार सुद सुरु सुद बार

Chhatrapati Rajaram issues order granting Inam land at Mauje Daruj to Shivaji Kawade on the recommendation of Santaji Ghorpade.

---

* सातारा जमाव ५०८.

[1] ता. खटाव, जि. सातारा.

नामाजी व महादाजी आपदेव लांडे आणि त्यांचे भाऊ यांना मौजे किरकटवाडी गाव इनाम

रा. श. १९ अंगिरा वैशाख शु. १३	क्र. ३२ *	श. १६१५, वैशाख शु. १३ इ. १६९३, मे ८

श्री

स्वस्ति श्री राज्याअभिषेक शके १९ श्रीमुखनाम संवत्सरे वैशाख श्रुा त्रयोदसी इंदुवासर क्षेत्रिय कुळावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजेश्री देश अधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत मावल यास आज्ञा केली ऐसीजे आताजी नामदेव याचे पुत्र नामाजी आपदेव व बंधू आंताजी नामदेव व यादव नामदेव उपनाम लांडे देशपांडे कुलकर्ण कर्यात मावल हे वतनादि शेव्रा बहुत येकनिष्टपणा करीत आहेत नामदेव्र याही कर्नाटकात स्वामीच्या पायापासी येऊन विनंती केली की करयात मावलचे देशकुलकर्ण वतनाची शेवा करुन वृती आनभवीत आहे अैसे यास या वृतीस इनाम गाव नाही यास्तव इनामाचे उदेशे स्वामीपासी आलो माहाराज पुण्य पुरुष प्रज्यापालन . . . ळू (फाटले) वृतीवतास नूतन इनाम करुन दिल्हे आहे आपणावरी कृपाळू होऊन येक गांव इनाम प्रावयास आज्ञा केली पाहिजे म्हणोन श्रुत केले त्यावरुन नामाजी आपदेव व माहादाजी आपदेव व आंताजी नामदेव व यादव नामदेव देशकुलकर्णा कर्यात माा याजवरी स्वामी दयाळू होऊन नूतन इनाम मौजे किरकटवाडी[1] कर्यात मावळ प्रांत मजकूर देहे १ येक इनाम कुलबाब कुलकानू हाली पटी व पेस्तर पटी झाड झडोरा पडले पड (स)हित खेरीज हकदार व इनामदार करुन गाव सर्वमान्या दिल्हे असे देशकुलकर्णी याचे स्वाधीन करुन यास व याचे पुत्र पौत्रादि वौषपरंपरेने इनाम चालवणे वर्ष प्रतिवर्षी नूतन पत्राची आपेक्षा करीत न जाणे या पत्राची तालीक लेहून घेऊन मुख्ये हे पत्र इनामदार माा यास परतोन देणे निदेश समक्ष

An order from Chhatrapati Rajaram to Deshadhikari and Lekhak of Prant Mawal informing them that Inam of village Kirkatwadi is granted to Namaji, Mahadaji Apdeo, Antaji Namdeo and Yadao Namdeo.

---

* सातारा जमाव २२८.

[1] तालुका हवेली, जिल्हा पुणे.

गणेश नीलकंठ यास मौजे गराडे येथील जमीन इनाम

सु. अर्बा तिसैन अलफ सफर ९ | क्र. ३३* | श. १६१५, आश्विन शु. १२ इ. १६९३, सप्टेंबर ३०

राजश्री देशाधिकारी व देशलेखक व
वर्तमान भावी सो॥ प्रात पुणे गोसावी यासी

अखडीत लक्षुमी आलंकृत राजमान्य सेवक रामचद्र नीलकठ नमस्कार सुा॥ अर्बा तिसैन अलफ राजश्री छत्रपती स्वामीचे पत्र प्रा॥ मजकूरास शके १६१९ अगिरानाम सवत्सरे फालगुण श्रुा॥ ३ इदू वासर छ १ रजब सुा॥ सलास तिसैन अलफ तेथे आज्ञे की शकराजी राम आत्रे याही चंदीचे मुक्कामी स्वामी सनिध येऊन विनंती केली आपले धाकटे भाऊ नीलो राम यासी हिंदुराव सरलस्कर असता याकडे सबनीसी होती स्वामी कार्यावर चीज जाले याचा पुत्र गणेश नीलकठ आपणाजवली आहे तरी स्वामीनी यास काही इनाम द्यावयाची आज्ञा केली पा॥ म्हणोन श्रुत केले त्यावरुन गणेश नीलकठ याजवर स्वामी कृपालू होऊन इनाम मौजे गराडे[1] ता॥ कन्हेपठार प्रात मजकूर प्रो॥ थल घोराले वीसा पाडाचे विघ्याने द्यावे जमिन चाऊर १ येकरास कुलबाब कुल कानू इनाम दिल्हा असे तरी यास व याचे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेने चालवणे म्हणौन आज्ञा त्या वरुन गणेश नीलकठ यासी मौजे मजकूर पैकी जमीन चाऊर १ येक चाऊर इनाम अ(व)ल दूम सीम दिल्हा असे तरी यास व याचे पुत्र पौत्री वौंशपरंपरेने चालवीत जाणे नूतन पत्राचा आक्षेप सालदरसाल करीत न जाणे या पत्राची तालीक लेहून घेणे असल पत्र परतोन भोगवटियास देणे जाणिजे छ ९ सफर सदरहू चावर जमिन येक नेमून दिलही आहे यैसे असोन कोणा इनामदाराचे असले तरी यास जो कोणी इनामदार सदरहू ठिकाणाच्या असेल तरी दुसरी जमीन अवल दुम सीम पाहून इनाम चालवणे जाणीजे निदेश समक्ष

सुरु सुद बार

Ramchandra Nilkanth informs the Deshadhikari, Deshlekhak of Prant Poona that the Chhatrapati is pleased to grant land of one chawar in the village Garade of the said Prant to Shri Ganesh Nilkanth whose father died while serving with Hindu Rao Ghorpade as Subnis.

---

* सातारा जमाव ५०८.

[1] तालुका पुरंदर, जिल्हा पुणे.

शंकराजी राम अत्रे यास कोढीत येथे जमीन इनाम

सु. अर्बा तिसैन अलफ सफर १९	क्र. ३४	श. १६१५, आश्विन व. ६ इ. १६९३, ऑक्टोबर १०

श्री

राजश्री देशाधिकारी देशलेखक वर्तमान
व भावि सुभा प्रात पुणे गोसावी यासी

अखडित लक्षुमी आलंकृत राजमान्य सेवक रामचद्र नीलकठ नमस्कार सुहुर सन आर्बा सी तिसैन आलफ प्रांत मजकुरास राजश्री छत्रपती स्वामीजि पत्र शके १६१९ आगिरानाम संवत्छरे फालगुण श्रुध्ध ३ इंदुवासर छ १ रजब सन सलास तिसैन आलफ तेथे लिहिले की मारफांत शंकराज्री राम आत्रे गाव कुलकर्णी व जौतिसी देहाये प्रांत मजकूर याही चंदीचे मुकामी स्वामीसंनिध येऊन विनंती केली की आपण वतनदार वतनाची सेवा येकनिष्ठे करीत आहो तरी आपणास इनाम द्यावयासी आज्ञा केली पाहिजे म्हणोन श्रुत केले त्यावरुन मनास आणितां शंकराजी राम आत्रे गाव कुलकर्णी व जोतिसी वतनदार हे स्वामी कार्यावर येकनिष्ठ यैसे जाणोन स्वामी याजवरी कृपालू होऊन इनाम देहाये मजकूर पाा विसा पाडाचे बिघेयाने चावर १॥ दीड बिताा

मौजे कोढीत[1] कर्यात सासवड पााा ताा करे पठार पाााा जमीन चावर १
निमे चावर ·॥· ·॥· मौजे भिवडी[2] निमे
·॥· मौजे भिवरी[3] निमे

येकूण चावर दीड इनाम कुलबाब कुलकानु हाली पटी व पेस्तर पटीसहित इनाम दिल्हा आसे तरी वृती यास व याचे पुत्रपौत्री चालवणे म्हणून आज्ञा त्यावरुन सदरहू जमीन दीड चावर इनाम आवल दम सीम पढ जमीन देविली असे यास व याचे पुत्रपौत्री वौशपरंपरेस सदरहू गाव पौ सदरहू प्राा इनाम जमीन चालवणे यास व याचे पुत्रपौत्री वौशपरंपरेस चालवणे या पत्राची तालिक लेहून घेऊन असल पत्र परतोन भोगवटियास याजवल देणे प्रती वरशी नूतन पत्राचा आक्षेप करीत न जाणे छ १९ सफर निदेश समक्ष

बार सूरु सुद बार

Taking into consideration the faithful services of Shankaraji Ram Atre, village Kulkarni and Watandar Mauje Kodhit one chawar land of the said village is given to him in Inam.

---

* सातारा जमाव ५०८.

१-३ तालुका पुरंदर, जिल्हा पुणे.

तुको त्रिमल पुरंदरे यास सुपे येथे जमीन इनाम

सु. अर्बा तिसैन अलफ रबिलावल ९ | क्र. ३५* | श. १६१५, कार्तिक शु. ११ इ. १६९३, ऑक्टोबर २९

श्री

मशरुल अनाम तुको त्रिमल पुरंधरे कुलकर्णी व जोतिशी मौजे सुपे खुर्द पाा सुपे यांसी रामचंद्र नीलकठ अमात्य सुहूर सन आर्बा तिसैन अलफ तुम्ही हुजूर येऊन

श्री राम चं
द्र चरण नील
कंठ सोनदे
व शरण

विनती केली की आपण साल गुदस्ता राजश्री स्वामीचे शेवेसी कर्नाटक प्राते जाऊन विनंती केली की स्वामी धर्म प्रभु अहेत कितेक वृत्तीवंताचा उधार केला अहे हे कीर्ती अैकोन स्वामीचे सेवेशी वृतीच्या उदेशे अलो तरी स्वामीने कृपाळू होऊन अपणास नूतन वृती करुन देवविलिया स्वामीचे अन भक्षून सर्वकाल स्वामीस कल्यण चितून म्हणून विनती केली त्यावरुन अपणावरी राजश्री स्वामी कृपाळू होऊन नूतन इनाम मौजे मजकूर पैकी विसा पाडाच्या बिघियाने अर्ध चावर दिल्हा अहे वृतीपत्रही करुन दिल्हे अहे याप्रमाणे स्वामीनेही वृती देऊन पत्र अपले करुन दिल्हे पाहिजे म्हणून ताा[१] विदित केले त्या वरुन मनास आणून सदरहू जमीन पैकी जमीन चावर पाव चावर रास मौजे मजकूरपैकी इनाम दिल्हा अहे अणि माहालीच्या कारकुनास पत्र सादर केले असे तेणे प्रमाणे ते अवल दूम सीम जमीन नेमून देववितील ते अपले स्वाधीन करुन घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वैशपरंपरेने अनभऊन सुखरुप राहाणे सदरहू जमीन कुलबाब कुलकानू हली पटी व पेस्तरपटी देखील हकदार इनामदार दिल्ही असे तेणे प्रमाणे दुमाले करुन घेणे कोण्हे बाबे शक अदेशा न धरणे येविशी अभय असे छ ९ रबिलौवल निदेश समक्ष लेखन

सीमा समु
ल्लसती

बार सुरु सुद बार

Vrittipatra from Chhatrapati Rajaram granting one chawar land of Mauje Supe to Tuko Trimal Purandhare Kulkarni in appreciation of his loyal services.

*पुणे जमाव २२८.
[१] ताा=तपशीलवार.

तुको त्रिमल पुरंदरे यास इनाम जमीन

सु. आर्बा तिसैन अलफ रबिलाखर ७ } क्र. ३६ * { श. १६१५, मार्गशीर्ष शु. ८ इ. १६९३, नोव्हेंबर २५

मशुरुल अनाम तुको त्रिमल पुरंधरे कुलकर्णी व जोतिषी मौजे सुपे खुर्द पाा सुपे यासि शंकराजी नारायेण सुहुर सन आर्बा तिसैन अलफ तुम्ही हुजूर

श्री
शंकराजी
नारायण

येऊन विनंती केली की आपण साल गुदस्ता राजश्री श्वामीचे शेवेसी कर्नाटक प्रांते जाऊन विनंती केली की स्वामी धर्म प्रभू अहेत कितेक वृत्ती बूताचा उधार केला अहे हे की यैकोन श्वामीचे शेवेसी वृतीच्या उदेशे अलो तरी श्वामीने कृपाळू होऊन अपणांस नूतन वृत्ती करुन देवविलिया स्वामीचे अन भक्षून सर्वकाळ स्वामीस कल्याण चितून म्हणून विनंती केली त्यावरुन अपणावरी राजश्री (मो. जा.) स्वामी कृपाळू होऊन नूतन इनाम मौजे मजकूर पैकी विसा पांडाच्या विधियाने अर्ध चावर दिल्हा अहे वृत्तीपत्रही करुन दिल्हे अहे त्याप्रमाणे स्वामीनेही वृत्ती देऊन पत्र अपले करुन दिल्हे पाहिजे म्हणून ताा विदित केले त्यावरुन मनास अणून सदरहू जमीन पैकी जिराती जमीन चावर ॥ पाव चावर मौजे मजकूर पैकी इनाम दिल्हा अहे आणि माहालीच्या कारकुनास पत्र सादर केले असे तेणे-प्रमाणे ते अवल दुम सीम जमीन नेमून देवितील ते अपले श्वाधीन करुन घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेने अनभऊन सुखरुप राहाणे सदरहू जमीन कुलबाब कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी देखील हकदार इनामदार दिल्ही असे तेणेप्रमाणे दुमाले करुन घेणे कोण्हे बावे शक अदेशा न धरणे येविषी अभये असे छ रबिलाखर संदेश समक्ष

पत्रा
वधिरयं
भाति

बार सुरु सुद बार

पत्रा
वधिरयं
भाति

पत्रा
वधिरयं
भाति

Tuko Trimal Purandhare is granted one chawar land in Inam in recognition of his loyalty to the Chhatrapati Rajaram.

---

* पुणे जमाव २२८.

शंकराजी राम अत्रे यास भिवरी येथे जमीन इनाम

सु. अर्बा तिसैन अलफ रबिलाखर २०	क्र. ३७*	श. १६१५, मार्गशीर्ष व. ६ इ. १६९३, डिसेंबर ८

अज् सुभा राजश्री नरहरी आपदेऊ सुभेदार व कारकून प्रा पुणे ताा मोकदमानी मौजे भिवरी ताा करपठार सुाा आर्बा तिसैन आलफ राजश्री पंत याचे आज्ञापत्र छ १ रबिलाखर याचे छ २० रबिलाखरी सादर जाले तेथ आज्ञा की प्रात मजकुरास राजश्री [मो. जा.] छेत्रपती स्वामीचे पत्र सके १९ आंगिरानाम संवछरे फालगुण सुद त्रितीया इदुवासर छ १ रजबु सन सलास तिसैन आलफ तेथ लिहिले की माा शकराजी राम आत्रे गावकुलकर्णी व जोतिसी मौजे मजकूर याणी चदीचे मुकामी स्वामीसनिध येऊन विनती केली की आपण वतनदार वतनाची सेवा येकनिस्ट करीत आहो तरी आपणास इनाम द्यावया आज्ञा केली पाहिजे म्हणून श्रुत केले त्यावरुन मनास आणिता शकराजी राम आत्रे गावकुलकर्णी व जोतिसी वतनदार हे स्वामी कार्यावरी येकनिस्ट यैसे जाणोन स्वामी याजवरी कृपाळू होऊन इनाम मौजे मा।रपैकी विसापाडाच्या बिघियाने चावर   निमे कुलबाव कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी सहित इनाम दिल्हा आसे तरी याचे पुत्रपौत्री चालवणे म्हणऊन आज्ञा त्यावरुन सदरहू जमीन चावर इनाम आवल दूमा सीम जिरात पड जमीन देविली आसे यास व याचे पत्रपौत्री वौंशपरंपरेस सदरहू प्राा इनाम जमीन चालवणे या पत्राची तालिक लेहून घेऊन आसल पत्र परतोन भोगवटियास देणे म्हणून आज्ञा आज्ञे प्राा सदरहू इनाम चावर निमे मौजे मजकूर पैकी पडि जमिनीमधे अवल दूम सीम पाहोन देणे आणि यास व याचे पुत्रपौत्रादि वौंशपरपरेस चालवणे ताजे सनदेचा उजूर न करणे तालिक लेहून घेऊन आसल परतोन देणे जाणिजे छ २० रबिलाखर

Shankaraji Ram Atre is granted one chawar land in the village Bhivari Tarf Karepathar as he remained faithful to the Chhatrapati Rajaram.

---

* पुणें जमाव २२८.

नरसिंहभट जोशी याच्याकडील पांडवेश्वर येथील इनाम जमीन पूर्ववत चालू

सु. खमस तिसैन अलफ सवाल २० | क्र. ३८* | श. १६१६, ज्येष्ठ व. ७ इ. १६९४, जून ४

अखडित लक्ष्मी अलकृत राजमान्य राजश्री
नरहरी आपदेव सुभेदार प्रा पुणे गोा

सेवक रामचंद्र नीलकंठ नमस्कार सुा खमस तिसैन अलफ नरसिभट बिन गणेशभट जोसी सो मौजे पाडवेस्वर याचा इनाम येक चावर मौजे मजकुरी कैलासवासी स्वामीच्या वेलेस चालत होता मध्ये पंधरा सोला वरुषे गांव खसब पडिला होता म्हणऊन वेदमुर्ति जोसी गोसावी इती येऊनू विदित केले त्यावरुन तुम्हास आज्ञा केली आहे तरी जेणेप्रमाणे कैलासवासी स्वामिच्या वेलेस चालत आले असेल ते मनास आणून हालीही चालवणे याचा इनाम येविसी अंतर न करणे वेदमूर्ति जोसी गोसावी सुखरुप आसतील तैसेच केले पाहिजे याचा इनाम भूमि याचे स्वाधीन करणे हे आपले व्राहातील अगर कुलास लावितील परंतु जैसे कलेल तैसे करतील छ २० सौवाल निदेश समक्ष

Narhari Apdeo Subhedar is informed to restore one chawar land of Inam grant to Shri Narsinh Bhat Joshi of Pandaveshwar.

---

* पुणे जमाव २२८

गोविंद कृष्ण देसाई याजकडून सवाई वसूल न घेणे म्हणून हुकूम

सु. खमस तिसैन अलफ [१०९५] जमादिलावल २२ **क्र. ३९*** **श. १६१६, पौष व. ९ इ. १६९४, डिसेंबर ३०**

पत्राच्या प्रारंभी उजव्या बाजूला फार्शी गोल शिक्का
व दोन ओळी फार्शी मजकूर

कमाविसदार कारकून ता॥ उमठे[१] मामले मूर्तजाबाद उरुफ चेऊल बिदानद के मौजे बोरघर ता॥ मजकूर गोविंद कृष्ण देसाई मामले मजकूर याचे इसापत आहे तेथे हासिलाखेरीज जाजती पटी वगैरा कदीम घेत नाही हाली मामलेची जमाबदी होतां देहे मजकुरी सवाई पडिली आहे म्हणौन देसाई याने जाहीर केले तरी बदस्तूर साबिक यैन हासिलाचे वसूल घेऊन सवाई वगैरेचे तसवीस न देणे बतारीख २२ जमादिलौवल सन ३८ जुलूसवाला सूहूर सन खमस तिसैन व अलफ

षटकोनी बहुदली
फार्शी शिक्का.

Officers of the Taluka Umathe in Cheul are informed that they should not realise revenue collection of village Borghur from Govind Desai at the rate of $1\frac{1}{4}$.

---

* पुणे जमाव २२८.

[१] उमटे—ता. अलिबाग, जिल्हा कुलाबा.

नामाजी आपदेव व त्यांचे इतर भाऊ यांच्याकडे वीस गावांचे कुलकर्णपण

सु. सीत तिसैन अलफ रमजान १२ } क्र. ४०* { श. १६१८, चैत्र शु. १३ इ. १६९६, एप्रिल ५

राजेश्री गोविंद लिंगोजी हवालदार व कारकून
ता॰ कर्यात मावल गोसावी यांसि

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य [मो. जा.] शेवक नरहरी त्रिमल सरसुभेदार व कारकून सुभेहाये ताा मावले नमस्कार सुाा सीत तिसैन अलफ अपाजि नामदेऊ यांचे पुत्र नामाजी आपदेऊ व माहादाजी आपदेऊ व भाऊ अताजी नामदेऊ व यादो नामदेव देशकुलकर्णी ताा कर्यात मावल यानी राजेश्री (मो. जा.) छत्रपती स्वामिचें अज्ञापत्र व राजेश्री पंत सचिव याचे अज्ञापत्र प्रविस्ट केळे तेथे अज्ञा कि ताा मजकूरचे देशकुलकर्ण पुरातन नामाजी आपदेऊ व माहादाजी आपदेऊ व भाऊ अताजी नामदेऊ व माहादाजी आपदेव व यादो नामदेऊ यांचे सालाबाद चालत आळे आसता दरम्याने रामचंद्र बावाजी व मा [मो] रो विठ्ठल होनप देशकुलकर्णी पाा पुणां यानी मोगलाईत हकीम लोकांस व देशांत कितेक लोकास लाच देऊन लटकेच गोही उभे करुन ताा मजकूरचे देशकुलकर्ण आपळे म्हणून महजर करुन घेतळा आणि हक लाजिमा खात आहेत यैशास पुणे प्रातीचे वीस गांव कर्यात मावलाखाळे उद्वत आहेत त्या गावीचे देशकुंलकर्ण होनपांचे आहे त्यावरुन विसा गावीचे हक लाजिमा तेच खात आहेत तरी होनप कर्यात माव [ल]च्या देशकुलकर्णाचे हक घेत असिले तरी होनपांच्या विसां गावीचा हक ग्रास देवीत जाणे म्हणून अज्ञा त्यावरुन हे अज्ञापत्र तुम्हास लिहिळे आहे तर होन्प दरम्याने कर्यात मावलीच्या देशकुलकर्णास दखल होऊन मोगलाचे तर्फेने हक लाजिमा घेत असिले तर होनपांकडील वीस गांव पुणे तर्फेचे कर्यात मावलाखाळें आहेत तेथील हक लाजिमा आपाजी नामदेऊ यांचे पुत्र नामाजी आपदेऊ

* पुणे जमाव २२८.

माहादाजी आपदेऊ व अताजी नामदेव व यादव नामदेऊ त्याचे भाऊ देशकुलकर्णी ता। मजकूर यांस देवित जाणे व विसा गावीचे देशकुलकर्णाची शेवाही घेत जाणे व होनपांचा मुतालीक असेल त्यास दखलगिरी होऊन देणे बाहेर घालणे छ १२ रमजान

श्री
नरहरी
त्रीमल

मोर्त
ब सुद

पो छ ५ सौवाल

Deshkulkarn of Taluka Maval consisting of twenty villages which was with Appaji Namdeo and his sons in the regime of Chhatrapati was transferred by Honaps in their name by the decision of the Civil Court (Panchayat). It is now ordered that this Deshkulkarn is removed from Honaps and restored to Namaji Apdeo and his brothers.

अंताजी व यादो नामदेव लांडे यांच्याकडे मावळ प्रांतीचे देशकुलकर्णपण

सु. सबा तिसैन अलफ
सफर २१ } क्र. ४१* { श. १६१८, भाद्रपद व. ९
इ. १६९६, सप्टेंबर ९

श्री

राजश्री सिदोजी जाधव हवालदार व
कारकून किले सिह्वगड गोसावी यांसि

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.] स्नेहाकित रामचंद्र नीलकंठ आमात्य आसीर्वाद व नमस्कार सुहुर सन सबा तिसैन व अलफ राजश्री अंताजी नामदेऊ व रा यादो नामदेऊँ लाडे देशकुलकर्णी कर्यात मावल यांणी हुजूर येउनू विदीत केले की संमत हवेली पुणें येथील वीस गाऊ कर्यात मावलाखाले वाढेत आहेत ऐसियासि होनप पुणेकर हे मोगलाचें तर्फेने आपल्या गांवास खलेल करुन हक लाजिमा खातात याबदल त्यांचा मुबादला स्वामीने आम्हास सदरहू वीस गाऊ देविले त्यास कितेक गांवकरी हक लाजिमा द्यावयास खलेल करितात तरी हक लाजिमा बिला कसूर चाले ते केले पाहिजे म्हणून विदीत केले अशास रा अंताजी नामदेऊ व रा यादो नामदेऊ पुरातन राज्यातील सेवक येकनिस्ठपणे सेवा करितात याकरिता सदरहू विसा गांवीचा हक लाजिमा मशारनिलेस देविला आहे तुम्ही गांवगना ताकीद करून विसा गावीचा हक लाजिमा देशकुलकर्णाचा दस्तमाफिक बिला कुसूर चालों देणं येविसी खलेल होऊ न देणे जाणिजे छ २१ सफर निर्देश समक्ष

लेखन
सीमा समु
लसति

[मागील बाजूस शिक्का]

श्री रामचं
द्र चरण नील
कंठ सोनदे
व शरण

सुरु सुद

Ramchandra Nilkanth Amatya issues orders for withdrawal of Deshkulkarn Hakk of twenty villages from Honap and restoration of the same to Antaji Namdeo and his brothers who were assigned these hakks by the late Chhatrapati.

---

* कोकण जमाव २०८.

अंताजी व यादव नामदेव यांस मावळ प्रांतीच्या वतनाची प्राप्ती

सु. सबा तिसैन अलफ सफर २१ } क्र. ४२* { श. १६१८, भाद्रपद व. ९ इ. १६९६, सप्टेंबर ९

श्री

सिका

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य ताहा मोकदम मौजे देहाय सा॥ हवेली प्रांत पुणे कोडवे खुर्द मौजे वडगाव मौजे हिंगणे बु॥ मौजे कोडवे बु॥ मौजे कोथरुड मौजे उडरी

१ १ १ १ १

मौजे पिसोली मौजे कात्रज धनकवडी मौजे नऱ्हे मौजे धायरी मौजे आंबेगाव

१ १ १ १ १ १

बु॥ पासणें इकरुदी बावधांण बु॥ माज हिजवडी मुलखेड मौजे गोर बु॥

१ १ १ १ १ १ १

खडकवासले वारजे सु॥ सबा तिसैन व आलफ देहाय मजकूर हाली

१ १

कर्यात मावलेकडे उह(ढ)त आहे यास पुण्याचे देश कुलकर्णी होनप हे तम्राकडे मिलोन रा॥ आताजी नामदेऊ व यादव नामदेऊ देशकुलकर्णी का॥ मावले याचा हक लाजिमा याचे वतनास खलेल केले यैसियास आताजी नामदेऊ व यादव नामदेऊ पहिले पासुन या राज्यात येकनिष्टपणे राहोन शेवा केली व हलीही करीत आहेत यैसे आसोन होनपानी हरामखोरी करुन तामरास मिलोन याचे हक लाजिमा यासी खलेल करावयासी काय गरज होती याकरीता सदरहू सदरहू गांवगना होनपास देशेकुलकर्णीच्या हक लाजिमा लागला आहे तो हक लाजिमा हाली यासी राजेश्री अताजी नामदेऊ व यादव नामदेऊ देशकुलकर्णी का॥ मावले यासी देविला आंसे तुम्ही बिला कुसूर यासी देणे याचा हक द्यावयाची हिर्क हरकत कराल म्हणजे मुलाहिजा होणार नाही अैसे बरे समजोन बिला कुसूर देत जाणे छ २१ सफर निदेश समक्ष मोर्तब आसे

Adnyapatra from Ramchandra Pandit Amatya that the Hak-lajima of twenty villages enjoyed by Honap should be set aside and restored to Antaji Namdev and Yadav Namdev Deshkukarni of Kasba Mawal.

---

* कोकण जमाव २२८.

नरसी भट यास माळसिरस येथे नैवेद्य नंदादीपाबद्दल नेमणूक

सु. सबा तिसैन अलफ रबिलाखर ९ } क्र. ४३* { श. १६१८, कार्तिक शु. ११ इ. १६९६, ऑक्टोबर २६

श्री

राजश्री सुभेदार व कारकून हाल व इस्तकबाल
प्रा सूपे बारामती गोसावी यास

ऽ॑ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. ज्ञा.] सेवक शंकराजी नारायेण सचिव नमस्कार सुाा सबा तिसैन अलफ श्री [मो. जा.] मुाा मौजे माळसिरस प्राा मजकूर येथे पूर्वी माहाराज राजश्री कैलासवासी याणी अभिषेक व नंदादीप व नैवेद्य याची मोईन करून दिल्ही आहे त्याप्राा चालत होते मध्ये धामधुमे -या प्रसंगामध्ये चालिले नाही ते चालवले पाहिजे म्हणऊनु नरसी भट याणी विदित केले त्यावरुन मनास आणून तुम्हास आज्ञा केली आहे तरी राजश्री पंडित राऊ याणी मोईन करुन देऊनु सुभा सनद सादर केली आहे तेणेप्रमाणे प्रति वर्षी चालवित जाणे दर हर साल ताजे सनदेचा उजूर न करणे तालिक लेहोन घेऊनू असल फिराउनू देणे छ ९ राखर पाा हुजूर

पत्रावधि
विभाति

श्री
शंकराजी
नारायण

बार सुरु सुद बार

Shankaraji Narayan continues a watan grant to Narsi Bhat for performing religious rites in a temple at Malsiras.

---

* पुणे जमाव ४३५.

हणमंतराव बिन कृष्णाजी घोरपडे देशमुख यांस इनाम गावे दिल्याचे वृत्तीपत्र

रा. भि. २३ }
पौष शु. ११ }

क्र. ४४*

{ श. १६१८, पौष शु. ११
{ इ. १६९६, डिसेंबर २४

श्री

[१]स्वस्ति श्री राज्याभिषक शके २३ धातृनाम संवत्सरे पौष शुध येकादसी गुरुवासर क्षत्रिये कुलावंतंस श्री राजाराम छत्रपती स्वामी याणी राजश्री हणमंतराव बिन कृष्णाजी घोरपडे देशमुख किले वंदन कर्यात अंगपूर यासि दिधले वृत्तीपत्र यैसे जे तुम्ही चंदीचे मोकामी स्वामीसमीप विदीत केले की

आपणास किले वंदन		[मो. जा.]
कर्यात अंगापूर प्रांत		नूतन इनाम गांव कर्याती
सातारा व प्रां वाई प्रा कऱ्हाड		अंगापूर प्रांत सातारा पैकी
देखील परली याचे देशमुखीचे		देशमुखीचे गांव वतनाचे
वतन आदलशाहाचे कारकीर्दीस		आहेत यैसियासि स्वामीच्या
चालिले आहे या वतनास		पायांपासी येकनिष्ठता
आपणास हक लाजिमा व		धरून कर्नाटक प्रांतास·
इनाम बाा फर्मान, गावगना		स्वामीसंनिध अलो त्यावरी
बिा		अयेवार कुटियाच्या
गला कैली दर		मुकामी संताजी घोरपडे
चावरास कुडो	दर चावरास	व राजश्री धनाजी जाधवराव
सालिना ८१ येकून	नख्त होन	या उभयेतांमध्ये जुझ जाले[२]
कलम १	सालिना ·॥·	त्यासमई आपण कस्त मेहनत
दर मागास सालिना	प्रताप याा	वहुत केली ते स्वामीस
पा टके येकून	कलम १	विदीतच आहे तरी स्वामीनी
कलम १	दर गावास	कृपाळू होऊन आपणास
दर घाणियास	सालिना बकरा १	नूतन इनाम देविले पाहिजे
तेल गांवगना		देहाये २ दोनी बिताा

---

* पुणे जमाव २२९.

[१] अशाच प्रकारचे आज्ञापत्र थोडयाफार फरकाने 'सनदापत्रांतील माहिती' (संपा. मावजी व पारसनीस, मुंबई, १९१३) पृ. १७७ ते १७९ मध्ये प्रसिद्ध झालेले आहे. त्या पत्राहून प्रस्तुत पत्रातील तपशील अधिक आहे.

[२] मे १६९६ त संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यांत कांची अलीकडे भांडण झाले. त्यांत अमृतराव निंबाळकर पडला. धनाजी पळून देशास आला. जेधे शकावली (शिचप्र), पृ. ३८.

दररोज ८८८९
नौटाक कलम १
आंबराईस आंबे
गावगना दरसदे ५
प्रा येकून कलम १
वेंद्रा [स] सणास
तेल गूळ गावगना
सेव येकून कलम १

येकून कलम १
तूप गांवगना
दर बिघा ये १
येक टाक येकून
कलम १
केले दरसदे ५
गावगना येकून
कलम १
इनाम गावगना
जिरायेत चावर
१७।। साडे सतरा
कलम १

मौजे गोजेगांव मौजे कांबेरी
१ १
प्रांत वाई सा कोरेगांव पैकी
मौजे येकंबे हा आपले
पाटिलकीचा वतनी गांव आहे
या गांव पैकी आपणास इनाम
भूमी देविली पाहिजे बिताा

कदिम मौजे
मजकूरी भूमी
चावर जिरायेत
१८ येक चावर
अदलशाहाचे
कारकीर्दीस
चालत होता
त्या उपरी
हा देश राजश्री
स्वामीस हस्तगत
जाल्यावरी
इनाम दिवानात
आमानत करुन
सेंभर खंडीस
गला कैली ५
पाच खंडी
प्रा देत होते
तेणे प्रा चालत
असे हली स्वामीनी
कृपाळू होऊन
अदलशाहाचे
कारकीर्दीस चालिल्या
प्रा देविले पाहिजे

हली नूतन इनाम
मौजे मजकूरी
आंब्रराई अपल्या
मिरासीच्या
सेतामध्ये अहे
ते जमीन बिघे
८५ पांच स्वामीनी
कृपाळू होऊन नूतन
इनाम देविला
पाहिजे

येकून कलमे १२ बारा रास
येणे प्रा आहे त्या उपरी
हा देश राजश्री स्वामीस
हस्तगत जाल्यावरी संपूर्ण
स्वामीच्या राज्यातील
वतनदाराचा हक लाजिमा
दिवाणांत अमानत केला
त्याबरोबर आपलाही हक
लाजिमा दिवाणात अमानत
केला आणि जुजबी
करुन दिल्हा
तेणेप्रा चालत असे
आपण वतनदार स्वामीचे
सेवक सनू सितामधे
देसीहून कर्नाटक प्रांतास
स्वामीसनिध आलो त्यावरी
राजश्री धनाजी जाधवराव
व संताजी घोरपडे या अुभयेतांमध्ये अयेवारकुटियाच्या मुकामी भांडण जाले त्या समई आपण व अमृतराव निंबालकर येक ठाई होतो अमृतरायानीं उडी टाकिली त्या समई आपण उडी टाकून मारामारी केली हे वर्तमान स्वामीस विदीतच अहे तरी स्वामिनी कृपाळू होऊन आप[ला हक ला] जिमा इनाम चालविला पाहिजे व येणे प्रा हकलाजिमा देविला पाहिजे म्हणोन विनंती केली त्यावरुन मनास आणिता

तुम्ही देशीहून कर्नाटक प्रांतास स्वामीच्या पायांपासी येकनिष्ठता धरुन स्वामीसनिध अलेत त्यावरी अयेवारकुटियाच्या भांडणी अमृतराव निंबालकर याही उडी टाकिली त्याबराबरी तुम्ही शरीक होऊन ते प्रसंगी उडी टाकून तुम्ही शूरत्वाची सीमा केली येकनिष्ट सेवक तुमचें चालवणे स्वामीस अगत्य यावरुन स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन तुम्हांस येणे प्रा करून दिल्हे असे सदरहू प्रा किले वंदन कर्यात अंगापूरपैकी व पाटिलकीच्या गांवपैकी इनाम भूमी अदलशाहाचे कारकीर्दीस बाा फर्मान प्रा व नूतन इनाम देहाये २ या प्रांती अंगापूरपैकी व पाटिलकीच्या गांवपैकी इनाम भूमी अदलशाहाचे कारकीर्दीस चालिल्याप्रा १ येक चावर जिरायेत व नूतन आंबराई बिघे ८५ पांच रास दिल्हे असे तरी किले वंदनची देशमुखीस हकलाजिमा इनाम बर हुकूम फरमान अदलशाहा व देहाये २ दोनी तुम्हांस कुल बाब कुल कानू देखील हली पटी व पेस्तर पटी झाडझडोरा पड्लें पानसहित खेरीज हकदार व इनामदार करून आपले स्वाधीन करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वौंश [परं]परें [दे]खील हली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार करून आपले स्वाधीन करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्राची वौंशपरंपरेने अनभऊन सुखरूप असणे यासी हिंदु कोणी कथला करील त्यासी वाराणसीमध्यें गोहत्या केल्याचे पातक लागेल व मुसलमान होतां कोणी इस्कील करील त्यासी मकेमध्ये सोर मारिल्याचे पातक लागल यैसे जाणोन तुम्हास चालवितील जाणिजे निदेश समक्ष

Chhatrapati Rajaram grants Vrittipatra (Inam) to Hanmant Krishnaji Ghorpade Deshmukh of fort Vandan. In the Vrittipatra Deshmukhi watan assigned to the fort in the regime of Adilshah is restored to him mentioning therein details of Inam Villages. The fighting between Santaji Dhanaji at Aiyawarkuti is referred to where Hanmantrao distinguished himself.

राया जोशी यास शिरवळ येथील जमीन इनाम

सबा तिसैन }
मया अलफ }

क्र. ४५*

{ श. १६१८–१९
{ इ. १६९६–९७

श्री शंकर

वेदमूर्ती राजमान्य राजेश्री राये जोसी बिन कान्ह जोसी माडिवे जोतिसी का सिरवल यासी प्रती राजेश्री केदारजी येसवंतराऊ निगडे देसमुख व रघुनाथ माहादेऊ देसकुलकर्णी पा सिरवल दंडवत अनुकर्मे नमस्कार सुा सबा तिसैन

[शिक्का]

अलफ तुम्ही येऊन विदित केले जे कसबे मजकुरी आपला इनाम पूर्वीपासून थल जातेखाणीपैकी चावर १ येक आहे यैसियासी ये प्रांती तांब्रांचा गलबला जाला गाव उद्दस जाला या करिता आपण आपल्या कुटुंबासहित श्री [मो. जा.] यात्रेस करनाटक प्रांते गेलो यात्रा करून तिकडेच दाहा पंधरा वरसे राहिलो यावर राजेश्री [मो. जा.] छत्रपती स्वामी ये प्रांतीहून करनाटकात चंदीस आले ते समई आपण जाऊन राजदर्शन घेतले आणि आपणाजवली पुरातन सनदा कदीम होती ते दाखऊन नवी पत्रे करून घेतली यावर या प्रांते आपण आलो राजेश्री शंकराजी पंडित सचिव यासी राजपत्र होते ते दाखऊन त्याचे पत्र मल्हार येसाजी सुभेदार प्रांत मजकूर यासी करून घेतले आहे हली सुभेदाराचे पत्र आपणास आणिले आहे पूर्वी तुमचे वडील राजेश्री अपाजी येशवंतराऊ देसमुख याचे पत्र आपणाजवली होते यैसियासी आपण ये प्रांतीहून करनाटकात गेलो ते समई पोथ्या पुस्तके व कागदपत्र वृती समधाचे होते ते मौजे मांडरदेऊ प्रा वाई येथे ठेविले होते त्यासी न्याहारखान याने दौडी करून मांडरदेऊ जालिला ते समई कागद जलाले त्यात इनामाचे पत्र होते ते जलाले या उपेरी आपण राजपत्र व सरकारकुनाचे पत्र व माहालीच्या सुभेदाराचे पत्र करून घेतले आहे ही पत्रे मनास आणून आपले पत्र करून दिल्हे पाहिजे म्हणऊन विदित केले त्यावरुन अवघी पत्रे मनास आणून तुम्हास आम्ही पत्र करून दिल्हे आहे तुमचा इनाम पुरातन काा मजकुरी थल जातेखाणीपैकी जमीन जिराती चावर १ येक आहे तो तुमचे दुमाले केला असे तुम्ही कीर्दी करून वंशपरंपरेने इनाम खाणे थल जातेखाणी नजीक थल बोरजाई जमीन चावर १ येक इनाम आहे तो तुमचे दुमाले केला असे

An order restoring the Inam of land at Shirwal to Raya Joshi.

---

* सातारा जमाव १८३४.

परगणे वाई येथील देशमुखी वतनाची सूर्याजी फिरंगोजी व दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ यांच्यामध्ये विभागणी

सु. समान तिसैन अलफ रबिलाखर २३ — क्र. ४६ * — श. १६१९, कार्तिक व. १० इ. १६९७, ऑक्टोबर २९

श्री

॥ मसरुल अनाम देसकुलकर्णी पाा वाई यासि जयेसिंग जाधवराऊ सेनापती सुाा समान तिसैन अलफ पाा मजकूरची देसमुखी दताजी केशवजी नाईक पिसाळ यास भोगवटा अहे यास राजेश्री छेत्रपती [मो. जा.] स्वामी अज्ञा सके २३ धातानाम संवछरीचे पौा छ १५ रबिलाखर सादर जाले तेथे अज्ञा की सूर्याजी बिन फिरंगोजी नाईक पिसाल यानी हुजूर स्वामीस विदीत केले की न्यारखान गनीम सिरवली ठाणे घाळून राहिला होता यासी तीन साले वाईची खंडणी दिली तिसरे वरसी न्यारखान वाईस कोट बांधोन राहिला त्यापासी सिवजी सुरो कारभारी निाा पिलाईअवा देसमुखीण हा भेटला याणे पिसालाची देसमुखी वाईची अहे परंतु ते कमजोर ते देसमुख तुम्ही घ्यावी म्हणऊन रदबदली केली त्यावरुन त्याणे देसमुखी घेतली मग आपण न्यारखानास पुसिले की अमची देसमुखी तुम्हास घ्यावया काये गरज यैसे विचारले यास बोलिला की देसमुखी आपणास पातशाहाने दिल्ही यावरी अपण परागंदा होऊन भगवी लुगडी करुन विजापुरास पातशाहासमोर उभे राहिलो वतनाचा करीना विदीत करुन दरबार खर्च रुपये १२३७२३ येक लक्ष तेवीस हजार सातशे तेवीस खर्च लागला तो सौदागरापासून कर्ज काडून देऊन फर्मान करून घेतले यैसा करीना अहे तर अपली देसमुखी दुमाले केली पाहिजे म्हणौन त्यावरुन मनास अणून त्यापासून सेरणी रुपये ३०००० तीस हजार घेऊन निमे देवविली आणि सनदा सादर केल्या अहेत यास चिरंजीव सौभग्यवती अनंदीबाई याचे पुत्र रा पदमसिंग पिसाल यास दिली माग .... तेव्हा पो मजकूरची देसमुखी मारा........ केशवजी यास होती ते दिली अहे तरी दुमाले करुन चालवित जाणे म्हणून पत्र सादर केले यास मनास अणिता दताजी केशवजी नाईक यास पाा मजकुरीचे देसमुखी वतन बहुत दिवस चालत अहे सारे दूर करुन यासच दिले याने बहुत कतला होऊन वतनास खलल होनार याकरिता साल मजकुरी देसमुखी निमे दताजी केशवजी नाईक पिसाल यास करार केली व निमे सूर्याजी बिन फिरगोजी नाईक पिसाल यापासून राजेश्री [मो. जा.] स्वामीनी घेतले त्याखेरीज येथून सेरणी रुपये [मो. जा.] घेऊन दिली असे त्याणी पाा मजकूरच्या देशाधिकारी .... चे .... राजश्री पंत अमात्य याचा व आमचा करार

---

* सातारा जमाव १८३४.

अहे याप्रमाणे निमे देसमुखी दताजी नाईक याचे व निमे देसमुखी सूर्याजी नाईक याचे स्वाधीन करुन वतनाची सेवा घेतील पाा मजकूरपैकी ताा जोरखोरे येथील देसमुखी दताजी नाईक यास करार केले असे तेथील देसमुखीची सेवा यापासून घेतील ताा ज्ञाबुळखोरे येथील देसमुखी सूर्याजी नाईक पिसाल याकड करार केले असे तेथील देसमुखी हे चालवितील वरकड समता देखील हवेली कसबा येथील देसमुखी निमेप्रमाणे उभयेता चालवितील तुम्ही या उभयेताच्या अज्ञेत वर्तत जाऊन कार्येभग देसकु[लक]र्णाचा करीत जाणे व्रडीलपणाचा पानमान अधी दताजी केशवजी नाईक पिसाल याउपेरी सूर्याजी फिरगोजी याप्रमाणे तह केला असे दताजी नाईक याचे तरफेचा सिका याचा याही करावा सूर्याजी फिरंगोजी याचे तरफेस याही करावा यैसे तह करुन दिला असे याप्रमाणे उभयेता वर्तणूक करितील पत्राची तालिक लेहून घेऊन असल पत्र भोगवटियास सूर्याजी फिरगोजी नाईक पिसाल देशमुख निमे यांजपासी देणे जाणिजे छ २३ रविलाखर

Deshmukhi watan of Pargana Wai was in the possession of Dattaji Keshvaji Naik Pisal. On representation the watan was equally divided between Dattaji and Suryaji Naik Pisal by mutual consent.

मातोश्री मकूबाईस मौजे पेडगावची मुकदमी

रा. श. २४ ज्येष्ठ शु. ११ | क्र. ४७* | श. १६२०, ज्येष्ठ शु. ११ इ. १६९८ जून ९

नकल

श्री गज्यानन प्रा

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २४ वहुधान्य सवत्सरे ज्येष्ठ शुा येकादसी गुरुवासरे क्षेत्रिये कुलावंत [वतंस] श्री राजाराम छेत्रपती याणी नरहर आपदेव सरसुभेदार व कारकून वर्तमान भावी सुभा प्रांत पुणे यांसि आज्ञा केली यैसिजे मातुश्री

सिका

मकूबाई[१] याणी हुजूर पत्र पाा तेथ लिाा की मौजे पेड़गांव खुर्द[२] ताा पाटस ह गांव मोकदमीचा पुरातन आहे तो गांव आपणास दिल्ह पाहिजे येविसी शामजी विस्वनाथ हुजूर पाा याणी विस्तार विदीत केल त्यावरून मनास आणिता मातुश्री श्री मकूबाईच चालवण हे स्वामीस आगत्य यास्तव मौजे पेडग्रांव खुर्द ताा पाटस प्रांत मजकूर ह गाव ज्यास मुकाला[सा]चालिला असेल त्याजकडून दूर करुन यांसि इनाम दिल्ह आसे तेही सदरहू गांव कुल वाब कुल कानू हली पटी व पेस्तर पटी सहित खेरीज हाकहकदार करून यांचे मूल लेकराण आणि वौंसपरंपरेण चालवीत जाणे नवीन पत्राचा आक्षेप न कर्णे या पत्राची तालीक लेहून घेऊन भोगवट्यास मातुश्री मकूबाईजवळ देणे मौजे मजकुरास तुम्ही येकदर आपले तर्फेण तोसीस न देणे जाणिजे लेखनालंकार मोर्तब

Chhatrapati Rajaram restores Mukadami of village Pedgaon to Makubai.

---

* सातारा जमाव ५०८.

[१] पहा—शिवचरीत्र साहित्य, खं. २, ले. २६३-२६५.

[२] तालुका दौंड, जिल्हा पुणे.

मातोश्री मकूबाई यांस सिरोपूर गाव इनाम

रा. श. २५
भाद्रपद व. १

क्र. ४८*

श. १६२०, भाद्रपद व. १
इ. १६९८, सप्टेंबर १०

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक २५ बहुधान्य सवंसरे भाद्रपद बहुल प्रतिपदा मंदवासर क्षेत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजश्री नरहरी आपदेऊ मुखें देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रात पुणे यासी अज्ञा केली ऐसीजे तीर्थरूप राजश्री उमाजी राजे यॉची स्त्री मातुश्री मकूबाई यांचे चालवणे हे स्वामीस अगत्य म्हणून नूतन इनाम मौजे सिरोपुर का पाटस प्रात मजकूर हा गाऊ कुलबाब कुलकानू हली पटी व पेस्तर पटी सहित खेरीज हकदार व इनामदार करून सर्वमान्य दिल्हा असे तरी हा गाऊ यांचे स्वाधीन करून उतरोतर यास व याचे वैशपरंपरेस चालवीत जाणे नवीन पत्राचा आक्षेप प्रतिवर्षी करीत नव जाणे या पत्राची प्रती लेहोन घेऊन असल पत्र परतून भोगवटियास मातुश्री मकूबाईजवली देणे जाणिजे लेखनालंकार

श्री राजारम
नरपती हर्ष
निदान मोरेश्वर
सुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरु निवीस

तेरीख १४
रबिलौवल सुा तिसा तिसैन अलफ

बार सुरु सुद

Chhatrapati Rajaram issues orders to Narhari Apdeo, chief Deshadhikari and Lekhak stating that Makubai, wife of Umaji Raje is granted Inam of Mauje Siropur in Karyat Patas.

* सातारा जमाव ५०८.

यादो नामदेव लांडे देशपांडे हेच कर्यात मावळचे देशपांडे. त्यास होनपांचा संबंध नाही

सु. तिसा तिसैन अलफ

क्र. ४९ *

श. १६२०–२१
इ. १६९८–९९

श्री

राजश्री यादो नामदेव लांडे देशपांडिये
ता कर्याती मावल गोसावी यासि

ई अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्ये [मो. जा.] स्नाा सुभानराऊ सितोले देसमुख पाा पुणे जोहार विनती सुाा तिसा तिसैन अलफ गोसावी पत्र पाठविले ते पावले तेथे लिहिले की हजरत पातशाह या प्रांते तुलापुरी मुाा होते ते समई आपण कर्नाटकामध्ये होते व आपले भाऊ चाकरीवरी होते तेव्हा होनप देशपाडे पुणे याणी नौ जिकीर कथला करून ताा मजकूरचे देशपांडेपण आपले म्हणऊन वेव्हार निर्माण केला आहे व गोसावी याचीही गोसाक्ष तेथे गुतली आहे म्हणऊ [न] आइकतो तरी तुम्ही सीव झाडे वतनदार आहा आमचे वृतीचा मामला तुमच्या वडिलाना[नी] तुम्हाजवल सागितला असेल व तुम्हासही ठावका असेल ते सत्य स्मरोन लेहोन पाठविले पाहिजे म्हणऊन लिहिले तरी तुम्ही ताा मारचे देशपांडे प्राचीन वतनदार आहा हे आमच्या वडिलानी सागितले आहे की लाडे कर्याती मावलचे देशकुलकर्णी यैसे सागितले आहे व आम्हांसही ठावके आहे तुमचा भोगवटा पिढी दर पिढी कारकीर्दी दर कारकीर्द अजी तागाईत चालत आला आहे होनप देशपांडे प्राा पुणे याचा चौका[1] व जबरदस्ती मोगलाईत आहे त्यामुले तुमचे देसमुख पायेगुडे व करजवणे यास कर्जमुले अडऊन त्यापासून कागदावरी सिके करून घेतले त्यावरी मन माने तैसें लिहिले आहे त्या कागदावरी आम्हासही साक्ष लेहोन मागत होते ते वेलेस तुम्ही कर्याती मावलचे देशपांडे न व्हा म्हणऊन आपण साक्ष करून दिल्ही नाही कर्यात मावलच्या ३६ गावासी होनपास संमंध नाही तेथील तुम्ही देसपांडे खरे जाणिजे हे विनंती

[पत्राच्या मागील बाजूस प्रारंभी डाव्या अंगास देशमुखाचा अस्पष्ट शिक्का]

Deshpande watan of Karyat Mawal usurped by Honap of Poona while Yado Namadeo Lande was in the Karnatak is now restored to Yado Namadeo Lande.

---

* सातारा जमाव २०३.

[1] चौका=जरब, धाक.

महादाजी बल्लाळ सभासद यास ज्याचे वतन त्याजकडे चालविण्याबद्दल आज्ञा

रा. श. २५
फाल्गुन व. १०

क्र. ५०*

श. १६२०, फाल्गुन व. १०
इ. १६९९, मार्च १६

श्री

स्वस्ति श्री राज्याभि शके २५ बहुधान्य संवत्सर फालगुण बहुल दशमी गुरुवासरे क्षेत्रिये कुलावंतस श्री राजाराम छत्रपती यासि रा माहादाजी बलाल सुभासद सुभा दाभोल यासी आज्ञा केली येसी स्वामी कर्नाटकास मसलतेस जातेसमई लस्करा‍ने वतनाचे कितेक मुदे घातले व पूर्वी स्वामीच दिस असता मुद्दे घातले त्याप्रमाणे त्याचे समजाविशीनिमित्य कागद करुन दिल्हे आहेत ये गोष्टीन येकाचे वतनास येक कथला करावयास उभा राहिला आहे म्हणोन कलो आले तर चदीच्या प्रसंगे व मसलतेच्या प्रसंगे समजाविसीनिमित्य वतनाचे कागद ज्याने जैस मागितले त्यास तैसेच दिल्हे काही प्रमाण नाही पूर्वील सनदा पत्रा वतनाचे द्रिवशी घेऊन येईल अगर येकाचे वतनास दुसरा कथला करील त्यास ताकीद करुन कागद पत्रानसी हुजूर पाठवून देणे स्वामी रा कोन्हेर पंडित न्यायाधीश यासी आज्ञा करुन बार हक मनास आणोन तुम्हास आज्ञापत्र सादर होईल त्याप्रमाणे वर्तणूक करणे कैलासवासी स्वामीचे वेलेस ज्याचे वतन चालिले असेल त्यास बिला कुसुर चालवणे या कामास म्हालोजी ढोका आफराद दिमत लबे यास वेचास लहरी ६ साहा रास देविले आसत देणे जाणिजे

मुद्रा नीलकंठ मोरेस्वर मुख्य प्रधान

मुद्रा परशराम त्रिंबक प्रतिनिधी

Chhatrapati Rajaram explains to Mahadaji Balal Sabhasad Subha Dabhol that while on the way to Karnatak the accompanying Army Officers requested the favour of watans they were granted mansabs and watan on an increasing general scale in order to entice them from the side of his enemies or to prevent them from becoming rebels, and that with the help of Pandit Konher Nyayadhish their watan disputes should be solved.

---

*सातारा जमाव ५०८.

मौजे पेडगाव खुर्द हा गाव मातोश्री मकूबाईस इनाम

सु. तिसा तिसैन अलफ सवाल २१ } क्र. ५१* { श. १६२१, चैत्र व. ८ इ. १६९९, एप्रिल १२

श्री
नरहरी
आपदेव

अज सरसुभा राजेश्री नरहरी अप्देऊ सरसुभेदार व कारकून मा। हाये पा। पुणे ता। मोकदमानी मौजे पेडगांव खुर्द ता। पाटस पा। मजकूर सु॥ तिसा तिसैन अलफ् बा। सनद राजेश्री [मो.जा.] पंत सचिव छ ४ मोहरम तेथे आज्ञा मौजे मजकूर मातुश्री मकुबाई यांचे मोकदमीचा म्हणोन राजेश्री [मो. जा.] स्वामीनी कुलबाब कुलकानु हली पटी व पेस्तर पटीसहित हकदार व इनामदार खेरीज करुन इनाम दिल्हा आहे राजश्री [मो. जा.] स्वामीची सनद अलाहिदा छ १० जिल्हेज सालमजकूरची सरसुभा सादर आहे त्याप्रा। मौजे मजकूर मातुश्री मकुबाईचे दुमाले करुन यास व याचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेने कुलबाब कुलकानु खेरीज हकदार व इनामदार करुन यांस इनाम सुरक्षित चालवणे प्रति वर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची तालिक लेहून घेऊन असल पत्र परतोन देणे पेशजी खडोजी थोरात यास मौजे मा।र मुकासा होता तो दूर करुन हाली मातुश्रीकडे इनाम दिल्हा असे मौजे मा।र याचे श्वाधीन करणे म्हणौन आज्ञा आज्ञेप्रा। मातुश्री मकुबाई यांचे स्वाधीन मौजे मा।र कुलबाब कुलकानु हली पटी व पेस्तर पटी सहित खेरीज इनामदार व हकदार करुन मौजे मजकूर यांचे दुमाले केले असे यांचे रजातलब शहत जाणे छ २१ सवाल मोर्तब सुद मौजे मजकूरचा उसुल मातुश्री मकुबाई याकडे देत जाणे मोर्तब सुद

मोर्त
ब सुद

साल दर साल ताजे सनदेचा उजुर न करणे मोर्तब सुद

मोर्त ब सुद   मोर्त ब सुद

An order from Chhatrapati Rajaram to Narhari Apdeo Sarsubhedar, Karkun and Mokadam of Pargane Poona informing them that Mauje Pedgaon Khurd, Tarf Patas is granted Inam to Makubai

* सातारा जमाव ५०८.

सासवड येथील कुळकर्ण व देशकुळकर्ण वतनाबाबत कैफियत

प्रमाथीनाम संवत्सर
रविलावल २९ } **क्र. ५२** * { श. १६२१, आश्विन शु. १
इ. १६९९, सप्टेंबर १४

श्री

राजश्री कोनेर जगनाथ न्या(या)धीश तकरीर कर्ते अंबाजी त्रिंबक व कासी विस्वनाथ व सिऊभट बिन दादमभट पुरंद्रे सुा मया अलफ तकरीर कर्ते यैसीजे आम्हास व बावाजी गोविंद भगवंत कासी यामध्ये वेव्हार कसबे सासवड येथील कुलकर्ण व देशकुलकर्ण यामधे कथला आहे पूर्वी कसबा येकलाच होता आपले वडिल राम हे पंत व चाहूपंत आपले वडिल कुलकर्ण चालवित होते त्यास लिहिणे ऊरकेना म्हणऊन त्याणी बावाजी गोविंद व भगवत कासि याचे वडिल गुमस्ते ळुमाजीपंत ठेविले त्यानीं मुताळकी केली त्याने आमचा हक उत्पन्न दिल्हे त्या मागे त्याचे पुत्र तिमाजीपंत जाले हक उत्पन्न द्यावयाची रेटाई केली ते वेळेस कसबा पुणे येथे आपले वडिल त्रिंबक भट व रंगनाथ भट पुरंधरे होते त्याणी तलब करुन तिमाजी पंतास नेले त्यापासून खावंदप्रशाचे उत्पन्न घेतले त्याजवरी तिमाजीपंताची बहिण चिमाई आपल्या वडिलास काकुळती येऊन मागिली तिमाजी पंतास मुतालकीस ठेविले त्यावरी तिमाजी पंताचे पुत्र गोविंदपंत व रामाजी पंत याची प्रबलता जाली त्यापासून आमचा हक ऊत्पन्न देत नाहीत जोरावरी आले आपले वडीलानी कुठे उभे राहोन पारपत्य करुन घ्यावे तरी जो (फाटले) देसमुखास अर्ज करुन देशकुलकर्ण आपल्या नावे केले तरी आमचे मुतालीकीस आमचे वृतीवरी राहिला तेथे त्याजवरी जे वतन मेलाले ते वतन आमचे बावाजी गोविंद व भगवत कासी यासि समध नाही इजारावार आले पेस्तुपोन आपल्या पासून हक उत्पन्न द्यावयासि रेटाई केली याचे पारपत्य केले पाहिजे तकरीर सही

सके १६२१
प्रमाथी सैवछर

तेरीख २९
रविलोवल

Ambaji Trimbak, Kasi Vishwanath and Siv Bhat Purandare place their kaifiyat before Justice Koner Jagannath saying that their Mutalik Govind Pant and Ramji Pant should be prevented from enjoying their Inam of Kulkarni Watan at Saswad.

---

* सातारा जमाव ५०८.

खंडेराव दाभाडे यास परगणे दहिहांडे इनाम

रा. श. २६ रबिलावल २७ } क्र. ५३* { श. १६२१, आश्विन व. १४ इ. १६९९, ऑक्टोबर ११

श्री

सिका राजमुद्रा

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २६ प्रमाथिनाम संवछरे आश्विन वहुल सप्तमी गुरुवासर क्षत्रिय कुलावंतस श्री राजाराम छत्रपति याणि राजश्री खंडेराव दाभाडे यास दिल्हे इनामपत्र यैसेजे तुम्ही स्वामीसंनिध विनंती केली की आपले भाऊ राजश्री सिवाजी दाभाडे हे सेनासमुदाये घेऊन वराड प्रांते स्वारीस गेले होते ऐसीयासी कसबे द्रहीहांडे प्रांत वराड येथे युद्ध प्रसंग जाला ते समई मारनिलेस जखम लागोन मृत्य पावले तरी साहेबी मेहेरवान होऊन परगणे दहीहांडे सारा महाल आपणास इनाम करुन दिल्हा पाहिजे म्हणून विनंती केली व तुम्ही स्वामीसेवा अंतकर्णपूर्वक करुन स्वामीस संतोशी केले व तुमचे बंधू स्वामी कार्यावरी वीज जाले याकरिता तुमचे वंशपरंपरेने चालवणे स्वामीस बहुत अगत्य यानिमित्य स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन तुम्हास परगणे दहिहांडे प्रांत वराड सात माहाल कुलबाव कुलकानू खेरीज हकदार व इनामदार करुन महाल इनाम दिल्हा असे तरी तुम्ही परगणे मजकूर आपले दुमाले करून होऊन इनाम तुम्ही व आपले वंशपरंपरेने अनभऊन स्वामीची सेवा मनोभावे करुन सुखरुप राहणे तुम्हास इनाम सुरक्षित चालेल जाणीजे लेखनालंकार मर्यादेयं विराजते

[शिक्का]

रुजु सुरुनिवीस

तेरीख २७
रबिलाखर सुहुर सन मया व अलफ

बार सुद

Chhatrapati Rajaram grants Inam of Pargane Dahihande to Khanderao Dabhade for the services rendered by his brother Shivaji Dabhade in the battle of Warhad where he succumbed to injuries.

---

* मोगलाई जमाव २०६.

अंबाजी त्रिंबक, कासी विश्वनाथ व सिऊभट पुरंधरे यांच्या कसबे सासवड येथील ज्योतिष, उपाध्येपण व कुलकर्णपणासंबंधीचा महजर

सु. मया अलफ जमादिलाखर १ — क्र. ५४* — श. १६२१, मार्गशीर्ष शु. ३ इ. १६९९, नोव्हेंबर १४

श्री

राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान
व भावी प्रा पुणे गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमाने सेवक कोनेर जगनाथ न्यायाधीश नमस्कार सुहुर सन मया अलफ अंबाजी त्रिबक व कासी विस्वनाथ व सिऊभट बिन दादंभट पुरंधरे याणी राजश्री स्वामीसनिध येऊन विनंती केली की कसबे सासवड येथील जोतीस व उपाधेपण व कुलकर्ण व कर्यात सासवड येथील देसकुलकर्ण पूर्वापार वडिलापासून आपले आहे त्यास आपले वडिली कुलकर्णाचे मुतालिकीस ळुमाजी विठल ठेविला होता त्याणे आपले वडिलासी मुतालिकचे दडके वर्तणूक केली त्यामागे त्याचा लेक तिमाजी याणेही काही दिवस मुतालिकेच्या रीतीप्रमाणे वर्तणूक केली त्यावरी त्याणे व त्याची सतती बलास येऊन आपले वडिलास रेटून कुलकर्णाची वृती खुद खावदपणे खात आले त्यास आपले वडीली मागे येक दोन वेला कुलकर्णानिमित्ये खटखट केली होती परंतु ळुमाजी विठल याचे सततीने बले करुन आपले वडीलाचे काही चालो दिले नाही अलीकडे तो प्रांत पारपत्यास स्वामीने राजश्री संकराजी पंडित सचिव याचे स्वाधीन केला होता त्याचे वेलेस आपले वडील उभे राहिले त्यावरुन सचिवपंती कुलकर्णाची वृती अमानत केली होती त्यावरी साप्रत सचिवपंताखालील प्रात कमाविसीस स्वामीने राजश्री रामचंद्र पंडित अमात्ये याचे स्वाधीन पारपत्येविशई केला त्याजवल आपण जाऊन आपले कुलकर्णाचे वृतीचा करीना विदित केला त्यावरून अमात्येपंती कसबेचे कुलकर्ण व कर्यात मजकूरचे देसकुलकर्ण ही दोनी वतने दिवाणात आमानत करुन दिवाण निसबतीचा मुतालिक ठेऊन त्याचे हाते कुलकर्णाची सेवा घेत आहेत आणि गोतमुखे ळुमाजी विठल याचे सततीचा व आपला निवाडा करावयानिमित्ये आज्ञापत्रे दिली आहेत. ऐसे असता कुलकर्णाची वृती आमानत जाली म्हणून ळुमाजीचे सततीमध्ये भगवत कासी वचनाचे दुमाले पत्रविसई स्वामीसनिध येऊन उभा राहिला की आपले कुलकर्णाचे वतन चालत असता पुरंधरे याचे कथले यामुले या अमात्यपंती

---

* सातारा रु. क्र. ५२.

आमानत केले आहे तरी पारपत्ये केले पाहिजे म्हणून विनती केली त्यावरुन वतनाची पत्रे स्वामीने भगवत कासीपासून दिवाणात रुपये ५०० पांचसे घेऊन त्यास दिली तरी स्वामीने आपला करीना मनास आणून कुलकर्णाची वृती आमानत करऊन गोतमुखे त्याचा व आपला निवाडा करविला पाहिजे जो खरा होऊन येईल त्याचे दुमाला कुलकर्णाची वृती करावी म्हणोन तपसिले विनती केली त्यावरुन राजश्री स्वामीने कसबे सासवड येथील कुलकर्ण व कर्यात मजकूरचे देसकुलकर्ण हे दोनी वतने आमानत करावयाविसी सुभे मजकुरी आज्ञापत्र सादर केले आहे व गोतमुख्ये हरदो वादी याचा निवाडा थल नेमून देऊन करवावयाविसी आज्ञापत्रात लिहिले आहे तेणेप्रमाणे कुलकर्णाची वृती आमानत करुन थल नेमून देऊन गोतमुखे दोघा वादीयाचा निवाडा धर्मता तुम्ही करवणे तोवरी दोघासही कुलकर्णाचे वृतीत दखल होऊ न देणे येविसी तुम्ही कोणाची रयात न करिता परनिस्टपणे गोतमुखे निवाडा करऊन जो खरा होईल त्यास महजर करुन देऊन हुजुर पाठवणे त्यावरुन हुजुर मनास आणून जो निर्वाह करणे तो केला जाईल जाणिजे रा छ १

राजते
लेखना
वधि

श्री ०
श्री राजारामं
कनिष्ठस्य जगना
थतनुजने: कोने
रीरामुणी मुद्रा
न्यायाधीशस्य
राजते

जमादिलाखर पा हुजुर

राजते
लेखना
वधि

राजते
लेखना
वधि

Chhatrapati Rajaram concurs the judgement given by Government bestowing on Ambaji Trimbak, Kasi Vishwanath and Siv Bhat Purandare Inam land at Saswad for performing duties of priest, kulkarni and astrologer.

पुरंदरे व अत्रे यामधील कुलकर्णपणाच्या झगडयाच्या निवाडयात पुरंदरे खरे ठरले

सु. इसने मया व अलफ साबान १७ } क्र. ५५* { श. १६२३, पौष व. ३ इ. १७०२, जानेवारी ५

श्री

६ मशरुल अनाम देशमुख व मोकदम कसबे सासवड यांसि रामाजी बावाजी सभासद नामजाद व कारकून प्रांत पुणे आसीर्वाद सुहुर सन इसने मया व अलफ कसबे माारचे कुलकर्णाचा कथला पुरंधरे व अत्रे यामधे लागला होता त्यास राजश्री पंत अमात्य स्वामीन्ने गोतमुखे निवाड करुन पुरंधरे खरे जाहाले अत्रे खोटे जाहाले त्यावरुन पुरंधरे याचे स्वाधीन कसबे माारचे कुलकर्ण करविले असे बाा आज्ञापत्र राजश्री पंत आमात्य छ ७ साबान फ्रैवस्ता छ १७ साबान कसबे माारचे कुलकर्ण पुरंधरे यांचे स्वाधीन केले असेती तुम्ही कसबे माारची पेसजीची कुल कैफत यांसी दखल करुन देखील मोहतर्फा व मुजोरी काली व पांढरी देखील कुलकर्णाचे शेवा पुरंधरे यांचे हातून घेत जाणे अत्रे यास कुलकर्णीचे मामल्यास संमंध नाही त्यास कथला करावयासी प्रयोजन नाही तुम्ही पुरंधरे याचे हातून शेवा कसबे माारचे कुलकर्णाची होऊन यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे दर हरसाल ताजा खुर्द खताचा उजूर न करणे तालिक लेहून घेऊन असल पत्र भोगवटीयासी पुरंधरे याजवली परतून देऊन सुरक्षित चालवीत जाणे राा छ १७ साबान मोर्तब सुद

(मुद्रा: श्री बाबाजी सुत समस्य भाति मुद्रा शुभ प्रदा)

मोर्तब
सुद

बार

In a dispute between Purandare and Atre regarding wahiwat of Kulkarni watan of Kasba Saswad, a decision was given by the Government (Court) in favour of Purandare.

---

* सं.नि.का. रु. क्र. ४८.

सासवडचे कुलकर्ण वतन पुरंदरे यांचे गुमास्ते अत्रे यांनी बळकावले होते ते पुरंदरे यांचे स्वाधीन करावे असा निवाडा

सु. इसने मया व अलफ साबान १७ | क्र. ५६* | श. १६२३, पौष ब. ३ इ. १७०२, जानेवारी ५

श्री

राजश्री सिवाजी त्रिमल हवालदार व कारकून वर्तमान व भावी ता। करेपठार व सासवड गोसावी यांसी

४। अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक रामाजी बावाजी सभासद नामजाद व कारकून सरसुभा प्रांत पुणे नमस्कार सुहुर सन इसने मया व अलफ मा। चितो माहादेव व अंबाजी त्रिंबक व कासी विस्वनाथ पुरंधरे कुलकर्णी कसबे सासवड याचे कुलकर्ण पूर्वी हुजरुन अमानत केलें होतें तें गोतमुखें निर्वाद करुन राजश्री पंत अमात्य स्वामीने कसबे मा।रचे कुलकर्ण पुरंधरे याचे स्वाधीन करविलें बा। आज्ञापत्र छ ७ साबान ता। छ १५ मिनहू तेथे आज्ञा की पुरंधरे येही हुजुर येऊन विदित केले की कसबे मा।रचे कुलकर्ण मुजेरी[1] व मोहतर्फ[2] देखील पुरातन आपले आहे त्यास आपल्या वडिलांही गुमास्तगिरीस ळुमाजी विठ्ठल अत्रे ठविले होते त्याणी बहुत दिवस गुमास्तगिरी केली त्यावरी त्याचा लेक त्रिमाजी याणे बल करुन कथला केला त्यावरी पूर्वी पादशहा तुलापुरास आले त्या समई आपण उभे राहिलो परंतु निर्वाद जाहला नाही त्यावरी राजश्री कैलासवासी स्वामीपासी उभे राहिलो त्याणी कुलकर्ण व देशकुलकर्ण अमानत केले परंतु निर्वाद जाहला नाही त्यावरी स्वामीचे सेवेसी येऊन उभे राहिलो स्वामीने करीना मनास आणून आपणास व अत्रे यासी गोत देऊन मनसुभी लाविली त्यावरी गोत पाब्रळकर व पुणेकर व सुपेकर व सिकारपूरकर ऐसे सासवडी मेलऊन उभे राहिलो त्याणी पारनेरचे स्थल नेमून दिल्हे आणि आपले व अत्रे याचे राजीनामे लेहून घेऊन स्थलास रवाना केले त्यावरी आपण पारनेरचे स्थलास हजिर जाहालो अत्रे हाजीर जाले नाही त्यावरी आणखी येक दोन स्थले गोताने दिल्ही तेथेही अत्रे हाजीर जाले नाही ऐसे येक वेळा अत्रे खोटे जाहाले याकरिता गोताने करीना मनास आणून अत्रे खोटे केले आपण खरे जालो कसबे मा।रचे कुलकर्ण आपले खरे करुन गोताने सुरत महजर करुन सून इहिदेमध्ये दिल्हा त्यावरी दुमाले पत्रे करुन

---

* सातारा रु. क्र. ५२.

[1] मुजेरी = खेडुत, कुणबी, शेतकरी

[2] मोहतर्फ = खेड्यांतील दुकानदार व कारागीर यांच्यावरील कर.

घ्यावी तो जिल्हेचे हालीमाजीमुळे होऊन आली नाही सांप्रत स्वामी या प्रांतास आले याबद्दल आम्ही गोताचा सुरत महजर घेऊन सेवेसी आलो असो स्वामीने मनास आणून वतन आपले स्वाधीन केले पाहिजे म्हणून विदित केले त्यावरुन गोताचा सुरत महजर मनास आणिता अत्रे खोटे जाहाले पुरंधरे यांचे कुलकर्ण खरे जाले त्यावरुन मोहतर्फा व मुजेरी काली व पांढरी देखील कसबे मारचे कुलकर्ण पुरंधरे याचे स्वाधीन केले असे व यांचे माथा शेरणी रुपये २५०० अडीच हजार ठेविले असेत यांचा वसूल हुजूर होईल तुम्ही कुलकर्ण पुरंधरे याचे दुमाळां करणें म्हणून आज्ञा त्यावरुन सदरहू प्रमाणें कसबे मारचे कुलकर्ण देखील मोहतर्फा व मुजेरी काली व पांढरी कुलकर्ण पुरंधरे याचे स्वाधीन केले असे तरी तुम्ही सदरहूप्रमाणे यांसी व यांचे पुत्रपौत्रादि वौंसपरंपरेने सुरक्षित चालवित जाणे या वतनास हकलाजिमा पूर्वापार चालत आला असेल त्याप्रमाणे चालवणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप करीत नव जाणे तालीक लेहून असल पत्र भोगवटियासी पुरंधरे याजवली परतून देणे येणेप्रमाणे वतन स्वाधीन करुन सुरक्षित चालवीत जाणे खलेल होऊ न देणे जाणिजे

श्री बाबाजी
सुत रामस्य
भाति मुद्रा
शुभ
प्रदा

मोर्तब
सुद

छ १७ साबान मोर्तब सुद

बार

It was found that Kulkarna watan of Saswad was forcibly possessed by one Atre who was Purandare's servant. According to Government's (Court's) decision that watan was restored to Purandare.

पुरंदरे आणि अत्रे यामधील कुलकर्णपणाचा निवाडा देण्यासाठी अत्रे ह्यांस हुजूराकडे पाठविण्याची आज्ञा

रा. श. ३०
अधिक श्रावण व. १

क्र. ५७*

श. १६२५, अ. श्रावण ब. १
इ. १७०३, जुलै १८

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३० सुभानु संवत्सरे अधिक श्रावण बहुल प्रतिपदा रविवासर क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणी देशमुख व मोकदम का सासवड यांसि आज्ञा केली ऐसीजे आबाजी त्रिंबक व कासि विस्वनाथ पुरंधरे याणी हुजूर येऊन विनंती केली की भिवाजी कासी व कृष्णाजी भास्कर अत्रे यामध्ये व आपणामध्ये का सासवडच्या देशकुलकर्णाचा गांवकुलकर्णाचा वेव्हार लागला आहे याबदल अत्रे याणी राजश्री शंकराजी पंडित सचिव यांस सांगोन गोमाजी विश्वनाथ पुरंधरा यास धरून राजगडास नेले आहे तरी स्वामिनी पारपत्य केले पाहिजे म्हणून विदित केले त्यावरुन ये गोष्टीचा करीना मनास आणूं व हर हरला[१] निवाडा करावया निमित्य गोमाजी विश्वनाथ व हरदू अत्रे यांस हुजूर आणविले आहे तरी तुम्ही देखत आज्ञापत्र भिवाजी कासी व कृष्णाजी भास्कर अत्रे यांस हुजूर पाठवून देणे व ह्या हरदू वादी यांचे वर्तमान कोण्हे जातीचे कैसे आहे तें असेल तैसें हुजूर लेहून पाठवणे स्वामी मनास आणून जे करणे ते करितील †निदेश समक्ष

श्री शि
व नरपति
हर्ष निदान मो
रेश्वर सुत नील
कंठ प्रधान

श्री आई आ
दि पुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामि
कृपानिधी ॥ तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरुनिवीस
सुरु सूद बार

Raja Shiv Chhatrapati issues orders to Deshmukh and Mukadam of Karyat Saswad to send Bhivaji Kasi and Krishnaji Bhaskar Atre to the Huzur for settling dispute between them and Purandare.

---

* सं. नि. का. रु. क्र. ५२.

[१] खात्रीपूर्वक, बिनचूक.

† येथून अक्षर निराळे.

शंकराजी पंडित सचिव याजकडे कसबे सासवड इनाम

रा. श. २९, चित्रभानु आश्विन बहुल १३ } क्र. ५८* { श. १६२४, आश्विन व. १३ इ. १७०२, आक्टोबर ८

श्री

स्वास्ति श्री राज्याभिषक शक २९ चित्रभानु संवत्सरे आश्विन बहुल त्रयोदसी गुरुवासर क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती यांणी राजश्री रायाजी तुबाजी यासी आज्ञा केली यैसीजे का सासवड प्रांत पुणे हा गांव राजश्री शंकराजी पंडित सचिव यास इनाम आहे

श्री शि
व नरपति
हर्षनिधान मो
रेश्वर सुत नील
कंठ प्रधान

श्री आई आ
दि पुरुष श्री राजा
शिव छत्रपती स्वामी
कृपा निधी तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधी

त्यास तुम्ही नसता उपसर्ग देता म्हणून हुजूर विदित जालें तरी पंडित मारनिलेच्या इनाम गावासी तुम्हास कथला करायास गरज काये या उपरी हे आज्ञापत्र सादर केलें असे तरी का मजकुरास यकजरा[१] तसवीस न देणे बोभाट आलिया तुमचा उबार[२] राहाणार नाही जाणिजे †निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरुनिविस

रुजु सुरुनिविस बार

Rajashri Rayaji Tubaji was ordered that he should not molest the Kasaba Saswad of Prant Poona which is granted as Inam to Shankaraji Pandit Sachiv.

---

* पुणे जमाव ४८१.

[१] यकजरा-एकजरा = यत्किंचित.

[२] उबार = विश्वास.

† येथून अक्षर निराळे.

सुभानजी घाटगे यांस त्यांचे वडील लढाईत गारद झाले म्हणून दोन चावर जमीन इनाम

रा. श. ३० }
कार्तिक व. ३ }

क्र. ५९*

{ श. १६२५, कार्तिक व. ३
{ इ. १७०३, नोव्हेंबर १५

नकल

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषक शके ३० सुभानुनाम संवछरे कार्तिक बहुल त्रितीया इंदुवासरे क्षेत्रिये कुलावंत श्री राजा सिव छत्रपति याणी राजेश्री देशाधिकारी व देशलेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत खटाऊ यासी आज्ञा केली ऐसीजे सुभानजी घाटगे याचे बाप तिमाजी घाटगे चंजी प्रांते रा॥ आमृतराव निंबाळकर याबराबरी स्वामी कार्यावरी खर्च जाले याकरिता सुभानजी घाटगे यावरी कैलासवासी

[शिक्का] [शिक्का]

स्वामी कृपाळू होऊन मौजे नेर पा॥ इनाम जमीन चावर दोन दिल्हा होता त्याप्रो॥ करार करुन दिल्हा होता परंतु येकच गावी दोन चावर इनाम आनुकूल होत नाही म्हणोन मा॥रनिले येही विनंती केली त्यावरुन मा॥रनिलेस दोन चावर इनाम दिल्हा तो चालवणे आगत्य याकारणे नेरामध्ये पेशजी दोन चावर इनाम दिल्हा होता तो दूर करुन हाली गावगना नेमून दिल्हा आहे जमीन चावर

मौजे नर[1] [नेर]	मौजे विसापूर[2]	खातगुण[3]	पुसेगाव[4]	कुटगुण[5]
·॥·	·॥·	·॥·	·।·	·।·

येकूण दोन चावर इनाम सदरहू पाच गावी दिल्हा आहे तरी तुम्ही देहाये मा॥री दोन चावर इनाम मा॥रनिलेस षड जमीन नेमून देऊन कुळबाव कुलकानू देखील हाली पटी व पेस्तर पटी खेरीज हाकदार व इनामदार करुन यास व याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने इनाम सुरक्षित चालवीत जाणे सदरहू जमीन षडी पो विसा पाडाचे बिघ्याने आवल दुम सीम च्यार सीम चौ प्रतीने मिळन दोन चावर नेमून

* सातारा जमाव ७६०.

[1]–[5] तालुका खटाव, जिल्हा सातारा.

देणे प्रति वरसी नवीन पत्राचा आक्षेप करीत नव जाणे या पत्राची प्रत लेहून घेऊन आसल पत्र भोगवटियासी मारनिले यापासी देणे निदेश समक्ष मोर्तब

तेरीख छ १६ रजब
सन आर्बा मया

रुजु सुरुनि
वीस

सुरु सूद बार

बार

but it was changed to chawar later ...

Raja Shiv Chhatrapati grants two chawar of land in village Nen to Subhanji Ghatge as his father was slain in the battle.

छत्रपति राजाराम महाराजांच्या वृंदावनाची व्यवस्था

सु. सबा [मया व अलफ] जिल्काद ११ | क्र. ६०* | श. १६२८, माघ शु. १४ इ. १७०७, फेब्रुवारी ४

राजमंडल

वृंदावन कैलासवासी राजश्री राजाराम साहेब
मौजे अगळबे ताा कर्यात
मावळ प्राा सावल बाग़ा
व नैवेद्य वंदादीप सुसूशे
बदल दिाा बाबती दिल्हा
असे ताा पत्र छ ११
जिल्काद सन् सबा

Mention is made of Vrindavan (Samadhi) of Chhatrapati Rajaram.

*शाहू दप्तर रु. क्र. ११.

नारो शंकर यांस सुरनीसपद व नेमणूक

रा. श. ३३ वैशाख व. ५ | क्र. ६१* | श. १६२९, वैशाख व. ५ इ. १७०७, मे १०

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक ३३ सर्वजित नाम संवछरे वैशाख वद्य पंचमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री नारो शंकर पंडित सचिव यांस आज्ञा केली अैसीजे किले वंदन येथील मुकामी तुम्हाकडून राजश्री त्रिंबक सिवदेऊ मुतालिक सुरनिसी याणी येऊन विनंती केली की शंकराजी नारायण याणी आंबवडियाचे[1] मुकामी देहे विसर्जन केले नारो शंकर लाहान यांजकरितां त्याजकडे किले कोट दौलत स्वामीची आहे याचा बंदोबस्त हुजुरून व्हावा दौलतीस कर्जवाम होऊन बहुत खराबीत आहे म्हणौन विनंती केली अैसियास शंकराजीपंत इमानी आम्ही पादशहास हस्तगत होऊन त्याचे शौच्यात होतो तीर्थस्वरुप कैलासवासी काकासाहेब माहालसुध्धा कर्नाटक प्रांती इकडे राजश्री रामचंद्रपंतानी व शंकराजी पंतानी सरदाराची सरबरा करुन ठाई ठाई किलो किला छाया देऊन कर्नाटकात फौजा रवाना करुन तिकडील बंदोबस्त राखून केले किले माहामर्दीने जातीनसी मेहनत करुन घेऊन स्वामीचें राज्य रक्षिले त्याचे वौंषाचे चालवणे स्वामीस ब्रहुत अवश्यक त्याचा जिल्ह मामला वतने व इनाम गांव त्या प्रमाणे चालविले पाहिजे त्याजवरुन हाली स्वामी तुम्हांवर कृपाळू होऊन शंकराजी नारायण यांजकडे सुरनिसी चालत होती ते मृत्य पावले याजकरिता त्याजकडून दूर करुन तुम्हास सुरनिसी अजरामऱ्हामत करार करुन वस्त्रे बहुमान दिल्हा असे तुम्हांस जातीस तैनात सालीना ब्रा माजी हॊनि पाा[2] १०००० दाहा हजार करार केले असेत याचे ऐवजी तुम्हाकडे सरंजाम गांव चालत आहेत ते व इतलीख[3] नेमणूक पावत आल्याप्रमाणे पावत जाईल व वतने इनाम गांव पेशजी पासून चालत आल्याप्रमाणे तुम्हांस व तुमचे पुत्रपौत्रादि वौषपरंपरेने चालविले जाईल जिल्ह मामला किले कोट तुम्हांकडे आहेत त्याप्रमाणे करार करुन दिल्हे असेत त्यास किले कोटाचा खर्च व दरमाहाचा ऐवज सालाबाद नेमणुकेप्रमाणे पाववीत जाणे तुमचे जिल्हेतील किले कोट सुटतील ते तुम्हाकडे ठेविले जातील पादशाईचे

---

* सं. नि. का. रु. क्र. ५१.

[1] अंबवडे—तालुका भोर, जिल्हा पुणे.

[2] पादशाही.

[3] इतलोख = सरकारी तिजोरीतून किंवा कोठारातून मिळालेली रोख नेमणूक, इनाम.

लढायामुळे तुम्हांस कर्जवाम जाले आहे त्याचा निर्वाह जाला पाहिजे व तुमचे वडिलानी इमाने शेवा केली आहे याजकरिता स्वामीचे राज्य तोंवर तुमचे जिल्हे मामल्याची वौंषपरंपरेने घालमेल होणार नाही येविसी श्री शंभु माहादेव याची शफतपूर्वक आभये आसे तुम्ही इमाने इतबारे यथान्याये वडिलांचे वेलेस लोक स्वामी कार्यास आले आहेत त्यांचे व प्रजेचे पालग्रहण करीत जाणे स्वामी तुमचे शेवेचे करतुत्व पाहुन उतरोउतर उर्जीत करतील जाणिजे बहुत काय लिहिणे तरी सुज्ञ आसा मोर्तब

तारीख १७ सफर
सु॥ समान मया अलफ

बार बार

Raja Shahu Chhatrapati appoints Naro Shankar, son of deceased Shankaraji Narayan in the position of Surnis and orders to continue saranjam of ten thousand Hons and all watan grants enjoyed by his father who rendered meritorious services by defending the State from the enemy.

अत्रे व पुरंदरे यांच्या सासवड येथील कुलकर्ण वतनासंबंधीच्या वादांत पुरंदरे यांच्या बाजूने निर्णय

सु. समान मया व अलफ रविलाखर १९ } क्र. ६२* { श. १६२९, आषाढ व. ६ इ. १७०७, जुलै ९

श्री

स्वस्ति श्री माहराज राजश्री शाहूजी राजे साहेब याणी देसमुख व मोकदमानी व रयानी व सेटे माहाजन कर्यात सासवड कसबे मजकूर यासी आज्ञा केली यैसीजे अंबाजी त्र्यंबक व कासी विश्वनाथ पुरंध्रे देसकुलकर्णी कर्यात मजकूर व कुलकर्णी व भट व ज्योतिषी कसबे मजकूर हे हुजूर येऊन विदित केले की आपले वतन देसकुलकर्ण कर्यात मजकूर व कुलकर्ण व ज्योतिष व भटपण कसबे मजकूर पूर्वापार आपले वतन आहे त्यास आपले वडिली भिवाजी कासी आत्रे याचा वडील सुमाजी विठल आत्रे गुमास्ता ठेविले त्यास सुमाजी गुमास्तगिरीचा कारभार करीत असता आपली पाच कुडवी आपणास दिल्ही त्यावरी सुमाजी मागे व त्याचा लेक तिमाजी गुमास्तगिरीचा कारभार करू लागला त्याणे कितेक दिवस आपली पाच कुडवी आपणास दिल्ही त्या उपरी आपली कमकुवत होत चालिली गावीच्या कारभार फैलावला आपले वडिलामध्ये कोणी लिहिणार नाही यामुले आत्रे यांची जबरदस्ती जाली आपला हक आपणास द्यावयासी घसघस करू लागले दुसरी गोस्टी आपले भटपणासही राखो ब्राह्मण कसबे मजकुरी अगांतुक होते ते आपणावरी उठविले आणि कथला करविला त्यांचा व आपले वडीलांचा वेव्हार होऊन गोताचे विद्यमाने व दिवाणीच्या न्याये राखो खोटे जाले आपले भटपण व ज्योतिषपण आपण करू लागलो देसकुलकर्ण व कुलकर्णाचा कथला त्यांचा व आपला होत चालिला यावरी आपले वडील विसाजी भास्कर व चितो माहादेऊ यैसे व त्याकडील बावाजी गोविद व भगवंत कासी यैसे तुलापुरचे मुकामी औरंगशाहा पातशाहाजवली फिर्याद जाले आपले वडिली दोही आत्रे यास दिल्ही की आपला निवाडा जालियावाचून तुम्हास वतनाचा आमल चालवावयासी गरज नाही त्यास जबरदस्त मोगलाई दरबार टका खर्च करून निरोप घेऊन गावास गेले आपले वडील विसाजी भास्कर पातशाहाचे कूच जालियावरी मजल दर मजल अष्टी पावेतो समागमे गेले ते जो दुखणा

*सं.नि.का. रु. क्र. ५२.

पडिले यावरी म्या महिनीया गावास आले आत्रे जबरदस्तीने वतन अनुभऊ लागले यांवरी राजश्री शकराजी नारायेण सचिव यांकडे किले विश्रिलगडचे मुकामी आपण व बावाजी गोविद व भगवंत कासी यैस गेलो तेव्हा तिही वतनाचा अमानत रोखा देऊन वतन आमानत केले यावरी पातशाहा ब्रह्मपुरीस असतां आपला भाऊ सिवाजी मुद्गल ब्रह्मपुरीस जाऊन फिर्याद होऊन वतनाचा परवाना आणिला त्याउपरी राजश्री रामचंद्र नीलकठ आम्मात्य यांजकडे सिहगडचे मुकामास आपण जाऊन वतनाचा करीना विदित करुन आमानत रोखा आणिला यावरी माहाराज राजश्री राजाराम कैलासवासी स्वामी यांजवली साताराचे मुकामी आपण व भगवंत कासी व कृष्णाजी भास्कर आत्रे यैसे जाऊन माहाराज साहेबाजवली वतनाचा करीना निवेदन केला माहाराज साहेबी करीना मनास आणून वतन आमानत करुन उभयेतास गोत दिल्हे यावरी गावास आलो भगवंत कासी व कृष्णाजी भास्कर हे गोतात न येत तेव्हा आपण राजेश्री रामचंद्र पंडित आमात्य याजकडे सिहगडचे मुकामी जाऊन फिर्याद जालो यावरी पंडित मारनिले येही आत्रे यासी तलब करून त्र्यंबक कासी व नारो कृष्ण अत्रे यांसि आणून राजश्री नरहरी कृष्ण यांकडे मनसुबी दिल्ही त्याणी देसमुख व मोकदम कसबे मजकूर व सिवधडे यासी बोलाऊन पुसिले जे आपले सत्य स्मरोन जैसा करीना असेल तैसा सागणे त्यावरी गावकरी यानी साक्ष दिल्ही जे पुरधरे याचे व वडिलानी आत्रे याचा वडील सुमाजी विठल गमास्ता ठेविला हे आपले वडिलानी सांगितले यावरी पंत मारनिलेनी सिधव्रेडे गोत नेमून दिल्हे यावरी कसबे मजकूरचे मुकामी पुणे व सुपे बारामती व सिरवल व खेडबारे पाबल चाकण यैसे समस्त गोत मिलोन मनसुबी करावी तो त्र्यबक कासी व नारो कृष्ण बोलिले की आपण या गोतास मान्य नाही परकी गोते नेमून देणे तेथे आपण जाऊन म्हणन बोलिले त्यावरुन गोताने जमान[1] मागितले त्यास आपण कृष्णाजी पा। मोकदम मौजे पिप्रले ता। करेपठार प्रांत पुणे यासी जमान दिल्हे त्र्यंबक कासी याणी देवाजी नारायेण कुलकर्णी मौजे बेलसर करियात सासवड यासी जमान दिल्हे मग गोताने पारनेर गोत नेमून दिल्हे यावरी आपला भाऊ सिवाजी मुदगल व राघो कमलाकर पारनेरच्या थलास गेले त्र्यंबक कासी आत्रे पारनेरच्या गोतात गेला नाही आपल्या भावानी येक महिना वाट पाहिली सेवट त्र्यंबक कासी गोतात गेला नाही तेव्हा सिवाजी मुदगल व राघो कमलाकर येही गोतास पुसिले जे अत्रे गोतांत न येत आपणास काये आज्ञा त्यावरून गोत बोलिले जे तुम्ही गोतास आलेस अत्रे गोतात न आले तेव्हा अत्रे खोटे तुम्ही खरे यैसे गोताने बोलोन सिवाजी मुदगल व राघो कमलाकर आपले भाऊ यासी सुरत महजर करुन दिल्हा जे पत्रे घेऊ राजश्री रामचंद्र नीलकठ अमात्य याजवली सिहगडचे

---

[1] जामीन.

मुकामास आपण गेलो पंडित मा।रनिलेनी गोतपत्र मनास आणून आपले वतन आपले दुमाला करून सनद दिल्ही ते घेऊन आपण गावास आलो मोगलाईतील पातशाही परवाना आणिला होता त्यावरी आपण आपला अमल करू लागले येक साल आपण वतनाचा कारभार करून भोगवटा अनुभविला यावरी कृष्णाजी भास्कर आत्रे याची पाटी राजश्री शकराजी पंडित सचिव येही राखोन आपला निवाडा गोतमुखे जाला तो येकीकडे ठेऊन आपले भाऊ गोमाजी विस्वनाथ यांसी धरून घेऊन किले राजगडावरी सा महिने बंदी घातले त्याची सुटका नव्हे मग आपण मातुश्री आईसाहेबाकडे प्रतापगडचे मुकामास गेलो वर्तमान विदित केले की राजश्री शंकराजी पंडित सचिव याणी आत्रे याची पाटी राखोन आपणावरी कहर करून आपला भाऊ सा महिने बंदखानी घातला आहे साहेबी करीना मनास आणून पारपत्य केले पाहिजे म्हणून विनंती केली त्यावरून मातुश्री साहेबी पंडित मा।रनिलेस पत्रे लेहोनू आपला भाऊ राजगडहून प्रतापगडास आणिला करीना मनास आणिला तो माहाराज साहेब पुण्याचे मुकामी असता राजश्री रायेभानजी भो। याणी आपली पत्रे गोविंद सिवाजी आपला भाऊ याबराबर देऊन प्रतापगडास पाठविले ते पत्रे मातुश्री साहेबास श्रुत जाली त्यावरुन गोविद सिवाजी यावरी मातुश्री साहेबास क्रोध जाली ते प्रसंगी कृष्णाजी भास्कर आत्रे याणि जाऊन विदित केले कीं हे पुरंधरे यैसे समजाऊन सांगितले यावरी राजेश्री परशराम त्र्यंबक येही कृष्णाजी भास्कर आत्रे यांची पाठी राखोन आपणावरी सक्रोध होऊन प्रज घेऊन बाहीर घातले यावरी आपले भाऊ चितो माहादेव हे पुरंधरचे किलेदाराकडे जाऊन फिर्याद केली यावरी किलेदाराने आत्रे यास आणून करीना मनास आणिला यावरी किलेदाराने गोत मेळऊन मनसुबी गोतावरी टाकिली यावरी कसबे मजकूरचे वतनदारास गोताने सांगितले की उभयेतास देवळात घालितो जो खरा असेल त्यास हाती धरणे त्यावरुन श्री नारायण पेठ पुरंधरे याचे देवळामधे आपले भाऊ व आत्रे यासी घातले आणि गावकरी यांसी आज्ञा केली कीं तुम्ही गावकरी आहा आपले सत्य स्मरोन जो खरा असेल त्यास हाती धरणे त्यावरून गावकरानी आपले भाऊस हाती धरिले यावरी किलेदाराने आपले वतन आपले दुमाला करून वतनावरी पाठविले आपण वतनाचा भोगवटा चालवावा तो आत्रे जबरदस्त आणि त्यासी राजश्री शकराजी पंडित सचिव याची पाठी यामुळे आपला भोगवटा चालो दिल्हा नाही यावरी माहाराज साहेब या प्रांतास आले यावर आपले वतनाचा करीना मनास आणून आपणास वतनावरी बैसविणार स्वामी धणी आहेत म्हणून विदित केले त्यावरून विदितार्थ मनास आणितां आत्रे खोटे यैसे सभ्रा त्याचे जाले पुरंधरे खरे यैसे जाले यावरून पुरंधरे यांचें वतन पुरंधरे याचें दुमाला करुन तुम्हास हे पत्र सादर केले असे तरी देसकुलकर्ण कर्यात मजकूर

व कुलकर्ण व भट व ज्योतिषपणाचा कारभार कसबेच पुरंधरे याचे हाते घेऊन पूर्वापार हक असेल तेणेप्रमाणे चालवीत जाणे छ १९ रबिलाखर सुाा समान मया अलफ

मर्या
देयं रा
जते

मर्या
देयं रा
जते

मर्या
देयं रा
जते

Settlement of dispute between Atre and Purandare regarding Kulkarn watan at Saswad was done in favour of Purandare in 1702. But Atre continued his wahiwat. So Purandare took up this matter with Ramchandra Pant Nilkanth Amatya, who summoned Court which gave verdict in favour of Purandhare in this matter.

शिवकालीन कागदपत्रे

विभाग २

म्हसवड येथील राजे माने घराण्याची कागदपत्रे

(लेखांक क्र. ६३ ते १०४)

रताजी माने यास आदिलशहाचे दरबारी बोलावणे

सु. सित सितैन व अलफ
हि. १०७६ जमादिलावल ३० } क्र. ६३ { श. १५८७, मार्गशीर्ष शु. २
इ. १६६५, नोव्हेंबर २८

*बिस्मिल्लह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

सु. सित सितैन व अलफ
हि. १०७६ जमादिलावल ३०

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा अली आदिलशाह[१]---रताजी देसाई कर्यात परगणे माण

तुम्ही पाठविलेला अर्ज दरबारास मिळाला. फर्मान मिळाल्याबरोबर आपल्या जमेतीसह दरबारास भेटीस येणे. येथे आल्यानंतर तुमचा सन्मान होईल. याबाबतीत कुठल्याही प्रकारे उशीर करु नये.

हुजूर परवानगी.

Ali Adilshah II orders Rataji Desai (Mane of Mhaswad) to visit the Court, without delay, where he would be felicited.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.
[१] अली आदिलशहा दुसरा–विजापूरचा सुलतान (इ.स. १६५६–७२).

रताजी माने यास कसबे कलाढोणचे देशमुखी वतन

सु. सित सितैन अलफ
हि. १०७६ शव्वाल १०

क्र. ६४

श. १५८८, चैत्र शु. १२
इ. १६६६, एप्रिल ६

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

सु. सित सितैन अलफ
हि. १०७६ शव्वाल १०

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा अली आदिलशहा--देशमुख, देशपांडे, मुकदम, प्रजा,
कसबे कलाढोण[1] किले पनाला
मामले मुहम्मदपूर

सय्यद इलास सर्जाखान[2] याने दरबारास विनंती केली की, रताजी वल्द नरसिंगराव माने देशमुख व सरदेशमुख कर्यात परगणे माण यानी राजा जयसिंग याजबरोबरच्या लढाईत[3] सामील होऊन अत्यंत कष्ट केले व तो आशा करतो की बादशाही कृपेने त्याला कसबे कलाढोण किले पन्नाला हे देशमुखीचे वतन म्हणून मिळावे. उपर्युक्त खानाच्या विनंतीवरुन रताजी वल्द नरसिंगराव माने देशमुख व सरदेशमुख परगणे माण याजवर बादशाही कृपा होऊन कसबे मजकूर किले पनाला हे देशमुखीचे वतन म्हणून दिले आहे. उपर्युक्त कसब्याच्या देशमुखीसंबंधी हक्क लाजीमा[4] पटी पाछोरी व बाजी कानूनात कुलबाब कुलकानू त्यास दिले आहेत असे जाणावे. अवलद अफलाद[5] यानी चालवावे. प्रतिवर्षी फर्मान तलब करू नये. तालीक करुन घेऊन मूळ फर्मान परत फिरवावे.

ता. १० शहर शव्वाल सनह १०७६.

Sayyad Ilias Sarja Khan the Commander of Bijapur, who got pleased with valour of Rataji Narshingrao Mane while repulsing the attack of Mirza Raja Jai Singh on Bijapur, recommended to Ali Adilshah II that Deshmukhi watan of Kasba Kaladhon be granted to Rataji Mane. Accordingly a Sanad granting watan was issued by Ali Adilshah II.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] कळेढोण–तालुका खटाव, जिल्हा सातारा.

[2] सय्यद इलास सर्जाखान (शर्जाखान)–विजापूरचा सेनापती.

[3] मिर्झा राजा जयसिंग याची विजापूरवरील ही स्वारी नोव्हेंबर १६६५ ते जानेवारी १६६६ या दरम्यान झाली (बुसातिन-उस-सलातीन, संपा. बेन्द्रे, पृ. ४६४).

[4] हक लाजिमा = निरनिराळ्या प्रकारचे हक्क.

[5] अवलाद अफलाद = वंशपरंपरा.

रताजी माने यास मंगळवेढे येथील सरदेशमुखीचे वतन

हि. १०७६ शव्वाल १० } क्र. ६५ { श. १५८८, चैत्र शु. १२ इ. १६६६, एप्रिल ६

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

हि. १०७६ शव्वाल १० वर्तुळाकार आदिलशाही शिक्का.

दुसरा अली आदिलशाह—देशमुख, देशपांडे, मुकदम, प्रजा, परगणे मंगळवेढा पाा मुहम्दपूर.

सय्यद अीलास सर्जाखान याने दरबारास विनंती केली की रताजी वल्द नरसिंगराव माने देशमुख व सरदेशमुख कर्यात परगणे माण व सरदेशमुख कसबे कलाढोण किल्ले पन्हाळा, यानी राजा जयसिंगाबरोबरच्या लढाईत सामील होऊन बादशाही (आदिलशाही) कामासाठी प्राणप्रणाने प्रयत्न केले. तो आशा करीतो कीं बादशाही कृपेने त्याला मंगळवेढे[1] हे सरदेशमुखीचे वतन म्हणून मिळावे. उपर्युक्त खानाच्या विनंतीवरुन रताजी वल्द नरसिंगरराव माने देशमुख व सरदेशमुख कर्यात परगणे माण व सरदेशमुख कसबे कलाढोण किल्ले पन्हाळा यास बादशाही कृपेने उपर्युक्त वतनाची सरदेशमुखी त्यास दिली आहे. उपर्युक्त रताजीस येथील सरदेशमुख जाणावे व दुमाला करावे उपर्युक्त परगण्याच्या देशमुखीसंबंधी हक्क लाजीमा पट्टी पाछोरी व बाजी कानूनात कुलबाब त्यास दिले आहेत असे जाणावे त्याच्या नंतर त्याचे अवलाद इफ्लाद हे चालवतील. प्रतिवर्षी फर्मान तलब करु नये तालिक घेऊन मूळ फर्मान परत पाठवावे.

तारीख १० शहर शव्वाल सन १०७६.

[खाली मुहम्मद अिखलास खानाचा शिक्का व इतर दोन शिक्के]

Rataji Narsingrao Mane, Deshmukh and Sardeshmukh of Pargana Man and Kasba Kaladhon is granted Sardeshmukhi watan of Mangalwedha for his services rendered to the Adilshahi Government in the war against Mirza Raja Jai Singh.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] मंगळवेढे–तालुका मंगळवेढा, जिल्हा सोलापूर.

रताजी माने यास दहा गावांचे वतन

सु. सीत सीतैन अलफ
हि. १०७६ शव्वाल १०

क्र. ६६

श. १५८८, चैत्र शु. १२
इ. १६६६, एप्रिल ६

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

सु. सीत सितैन अलफ
हि. १०७६ शव्वाल १०

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा अली आदिलशहा—देशमुख, देशपांडे, मुकदम, प्रजा
परगणे माण वगैरे पाा मुहम्मदपूर

सरदार इलास सर्जाखान याने दरबारांस विनंती केली कीं, रताजी वल्द नरसिंगराव माने देशमुख व सरदेशमुख कर्यात मजकूर यांनी राजा जयसिंग याचा मोगलाईत अंमल असताना बादशाही कामात प्राणपणाने प्रयत्न केले व तो आता आशा करितो त्याजवर बादशाही कृपा होऊन नवीन वतन मिळावे व तेथील महसूल १० होन १० कसबे येणे प्रमाणे मनोर[१], देगांव[२], अकलूज[३], भालवणी[४], कासेगाव[५], ब्रह्मपुरी[६], सांगोला[७], अठपाडी[८], नाझरा[९], येळापूर[१०], उपर्युक्त खानाच्या विनंतीवरुन रताजी वल्द नरसिंगराव माने देशमुख कर्यात मजकूर याजवर बादशाही कृपा होऊन वतन दिले दुमाला किजे, प्रतिवर्षी फर्मान तलब करु नये तालिक घेऊन अस्सल फर्मान परत फीराऊन देणे.

ता. १० शहर शव्वाल सनह १०७६

मुहम्मद इखलासखानाचा कोयरीच्या
आकाराचा शिक्का

Rataji Narsingrao Mane is granted ten villages, viz. Manur, Degaon, Akluj, Bhalvani Kasegaon, Brahmapuri, Sangola, Athpadi, Nazra and Yelapur, for his services to the Adilshahi Sultanate, during Mirza Raja Jai Singh's Deccan Campaign.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[१] मनोर–तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

[२] देगांव–तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर.

[३] अकलूज–तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर.

[४] भालावणी–तालुका आष्टी, जिल्हा बीड.

[५] कासेगांव–तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर.

[६] ब्रह्मपुरी–तालुका मंगळवेढा, जिल्हा सोलापूर.

[७] सांगोला–तालुका सांगोला, जिल्हा सोलापूर.

[८] आटपाडी–तालुका खानापूर, जिल्हा सांगली.

[९] नाझरे–तालुका सांगोला, जिल्हा सोलापूर.

[१०] येळापूर–तालुका शिराळा, जिल्हा सांगली.

रताजी माने यास कलाढोण येथील सरदेशकतीची मिरास

सु. सित सितैन व अलफ हि. १०७६ शव्वाल १७	क्र. ६७	श. १५८८, चैत्र व. ५ इ. १६६६, एप्रिल १३

* बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

सु. सित सितैन व अलफ
हि. १०७६ शव्वाल १७

दुसरा अली आदिलशहा--अब्दुल कादिर सरनौबत सर हवालदार नामजाद हवालदारी व कारकुनान हाल व इस्तकबाल किले पनाला.

बादशाही कृपेने मौजे कलाढोण किले मजकूर येथील सरदेशकतीची मिरास रताजी माने यास फर्माविली आहे. उपर्युक्त हक्क लाजीमा पटी पाचोरी व कुलबाव कुलकानू त्यास दिले आहे. दुमाला किजे. प्रतिवर्षी फर्मान तलब करू नये. असल फर्मान तालीक करुन घेऊन फिराऊन देणे.

तारीख १७ शव्वाल सनह १०७६.

हु. प.

Ali Adilshah II to Abdul Qadir Sar-naubat and Sar-havaldar, Panhala, informing that Mirasi watan of Kaladhon which is granted to Rataji Mane should be continued to him without any hindrance.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

दुष्काळामुळे मुलुख वैराण सबब रताजी माने यास सरदेशमुखीची नवी सनद

सु. सन सीत सितैन अलफ } क्र. ६८ { श. १५८७-८८ इ. १६६५-६६

*नकल बमुजब असल

अदिलशाह——देशमुख देशपांडे मोकदम वारिआ कर्यात माण पा मुहम्मदपूर सुा सन सीत सितैन अलफ

सय्यद इलाश शर्जाखान यानी दरबारास अर्ज केला की रताजी वलद नरसिंगराव माने देशमुख यानी राजा जयसिंगाबरोबर लढाईत उत्कृष्ट कामगिरी बजावली तो आता आशा करितो की त्याच्या सरदेशमुखीच्या महालात तसेच परगणे माण येथे दुष्काळ पडल्यामुळे मुलुख वैराण झाला असून लोकांची नासाडी झाली आहे तो आशा करितो की बादशाही कृपा होऊन पूर्वीप्रमाणे सनद मिळावी उपर्युक्त खानाच्या विनंतीवरुन रताजी वलद नरसिंगराव माने यास उपर्युक्त महालाची सरदेशमुखीची कृपा केली आहे उपर्युक्तास सरदेशमुखी आहे असे समजून हुकुमाप्रमाणे वागावे.

Ali Adilshah II who got pleased with the exemplary services of Rataji Mane during war with Raja Jai Singh informs Deshmukh, Deshpande and other officers of Karyat Man, Pargana Muhammadpur that Rataji Mane has been granted new Sanads for the Sardeshmukhi watan, as his Mahals had been deserted on account of severe famine in the province.

---

*मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

रताजी माने याजवर कर्यात कासेगावमधील दंगेखोरांस हाकलून लावण्याची कामगिरी

सु. सीत सितैन व अलफ
हि. १०७६ शव्वाल २५

क्र. ६९

श. १५८८, चैत्र व. १२
इ. १६६६, एप्रिल २१

*बिस्मिल्लाह उर रहेमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

सु. सित सितैन व अलफ
हि. १०७६ शव्वाल २५

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा अली आदिलशाह--रताजी देसाई कर्यात म्हसवड[1] परगणे माण.

बादशाही हुकुमाप्रमाणे कर्यात कासेगांव येथील गावे हे फरासखाना व वहेली[2] या खात्यातील लोकांना मुकासा म्हणून चालू आहेत. यावेळी दरबारांस समजले की नायकजी पांढराच्यावतीनें पुंजाजी नावाचा जमातदार याने दांडगाई केली आहे. कर्यात मजकूर उपर्युक्त नायकजी यास मुकासा मिळाला आहे म्हणोन त्याने कर्यात मजकूर हुज्जतीशिवाय आपल्या ताब्यांत आणली असून तेथील महसूल गोळा करीत आहे. हे फर्मान मिळाल्याबरोबर तुम्ही जमीयतेनिशी व स्वारानिशी पुंजाजी जमातदारास जाऊन तंबी देऊन कर्यात मजकुरातून त्यास हाकलून देऊन ते फरासखाना व वहेलीच्या लोकांच्या ताब्यांत देऊन दरबारांस कळवावे. तसेच व्यवस्थेच्याबाबत तेथील हवालदार जे सांगेल त्याप्रमाणे प्रयत्न करीत राहावे. जाणिजे २५ शव्वाल सनह १०७६.

हु. प.

Ali Adilshah II to Rataji Mane—The Villages in Karyat Kasegaon are given in Mokasa to the men working in the 'Faraskhana' and 'Vaheli' departments of the State who are oppressed by one Punjaji so drive P. away

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] म्हसवड–तालुका माण, जिल्हा सातारा.

[2] वहिली महाल=रथशाला (राज्यव्यवहारकोश, १७१. शि.च.प्र. पृ. १५८).

कर्यात कासेगावमधील बंडखोरांस हुसकावून लावल्याबद्दल रताजीस शाबासकी व मानाची वस्त्रे

सु. सित सितैन व अलफ हि. १०७६ जिल्हेज	क्र. ७०	श. १५८८, ज्येष्ठ शु. १० इ. १६६६, जून २

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

सुा सित सितैन व अलफ
हि. १०७६ जिल्हेज

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा अली आदिलशाह--रताजी देसाई कर्यात म्हसवड परगणे माण.

कर्यात कासेगांव हे फरासखाना व वहेली या खात्याच्या लोकांकडे मुकासा म्हणून चालू आहे. नंतर त्याबाबत त्याला फर्मान सादर झाले होते की, कर्यात मजकूर काबीज करुन द्यावी. त्यावर त्याने कर्यात काबीज करुन फरासखाना व वहेलीच्या खात्यातील संबंधीत लोकांना दिली. त्यात त्याच्या राजनिष्ठेबद्दल कसूर झाली नाही. शाबास शाबास, आता त्याच्या सर्फराजेसाठी बादशाही खिलत[1] पाठविला आहे. तो घेऊन त्याने स्वतः सन्मानित व्हावे व कर्यात मजकुरास बंडखोर व हरामखोराकडून कोणताही त्रास होऊ नये. उपर्युक्त कर्यात चुकीने नायकजी पांढऱ्याकडे मोकासा म्हणून चालत आहे. तरी त्यांच्या लोकांच्या ताब्यांत न देता त्यांना तंबी द्यावी व बाहेर काढावे व कर्यात मजकूरही खात्यातील मजकूर लोकांसाठी नेमलेला आहे. कर्यात मजकूरमध्ये पांढऱ्याच्या निसबतीचा पुंजाजी हा पुंडावा करीत आहे. त्यास अशी तंबी द्यावी की त्याने कर्यात मजकूरमध्ये दखल देऊ नये. यातच त्याचा उत्कर्ष आहे असे जाणावे.

सु. १०६६ हि. १०७६ जिल्हेज ८

हुजूर परवानगी.

Rataji Desai (Mane) is complimented by Ali Adilshah II for carrying out royal orders to conquer Karyat Kasegaon and handover the same to the men working in 'Vaheli' and 'Faraskhana' Departments. The robes of honour are also sent to him. He is further directed to warn Punaji, who is making disturbances in these villages giving him no chance to renew the disturbances.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] खिलत=बहुमानाचा पोषाख.

नरसोजी व यशवंतराव माणकोजी यांचा मळगाव येथील पुंडावा मोडण्याची रताजीवर कामगिरी

सु. सित सितैन व अलफ
हि. १०७० मोहरम ३

क्र. ७१

श. १५८८, आषाढ शु. ४
इ. १६६६, जून २६

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क

सुा सित सितैन व अलफ
हि. १०७० मोहरम ३

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा अली आदिलशाह--रताजी देसाई परगणे माण

यावेळी दरबारास समजले की नरसोजी नावाच्या प्रजाजनाने जामदार खान्याच्या खात्यातील अल्पवयी मुलास मुकासा असलेल्या मलगांव[१] परगणे कागल याजवरती तुंगीचा खोटा दावा लावला आहे. यशवंतराव माणकोजी मौजे बेन्नुरचा पाटील याच्या आसऱ्याने त्याचे स्वार व हशम घेऊन मौजे मलगांव येथे गेला. २०९ गुरे व प्रजेची चीजवस्तु नेली व लुटली. मौजे मलगांव परगणे मजकूर हे या खात्यातील अल्पवयी मुलास चालू असताना उपर्युक्त नरसोजीने हरकत घेऊन तुंगीचा दावा केला व यशवंतराव माणकोजी याचा आसरा घेऊन तमाम प्रजेस लुटलें. . . .नरसोजी व यशवंतराव यांचे हे केवढे धाडस. आता हे फर्मान मिळताच तेथील यशवंतराव व नरसोजी यास तंबी देऊन सदरील गुरे, माल, चीजवस्तु त्यानी नेले आहे ते परत आणून मौजे मलगांव येथील मुकदम व हुद्देदार यांच्या स्वाधीन करावे व त्याने त्याचा अर्ज व अधिकाऱ्यांचा अर्ज हुजूर पाठवावा व मौजे मलगांव येथील प्रजेस कौल व दिलासा देऊन आबादानी करावी की पूर्वीपेक्षा अधिक आबादी होईल. नरसोजी व यशवंतराव यास ताबडतोब कैद करून हशमाबरोबर हुजूर पाठवावे. यात त्यांचा उत्कर्ष आहे याबाबत ताकीद जाणावी व परत फिर्याद येऊ देऊ नये सु. १०६६ हि. १०७७ मोहरम ३. गुलाम हाजी खुरमन उल शरिफन शेख अबदुल अली सरखेल मुमालीक याच्या माहितीत याबाबत लाडला अलाउद्दीन खवास यास पाठविले आहे.

हु. प.

Rataji Desai (Mane) is directed by Ali Adilshah II to severely warn and capture Narsoji and Yeshwantrao Mankoji who had plundered Malgaon in Pargana Kagal and handover the plundered material to the village officers of Malgaon assuring them of protection.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[१] मळगांव–हल्ली तालुका सावंतवाडी, जिल्हा रत्नागिरीमध्ये.

कासेगावमधील पुंजाजीच्या पुंडाईचा बंदोबस्त केल्याबद्दल रताजीस मानाची वस्त्रे

सु. सीत सितैन व अलफ }
हि. १०७७ मोहरम २९ } क्र. ७२ { श. १५८८, श्रावण शु. १
{ इ. १६६६, जुलै २२

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

सु. सीत सितैन व अलफ
हि. १०७७ मोहरम २९

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा आदिलशाह---रताजी देसाई कर्यात म्हासवड परगणे माण.

देहाये कर्यात कासेगांव परगणे मजकूर हे हुकुमाप्रमाणे फरासखाना व वहेली या खात्यातील लोकांच्याकडे मुकासा म्हणून चालत आहे. यावेळी दरबारास समजले की उपर्युक्त कर्यात नायकजी पांढऱ्यांच्या निसबतीतील पुंजाजी याने दांडगाई व पुंडाई करून काबीज करुन पैसा वसूल करीत आहे. याबाबत फर्मान सादर झाले होते की, पुंजाजी मजकूरास बाहेर काढून कर्यात काबीज करून द्यावी याप्रमाणे त्याने आपल्या लोकांसह जाऊन त्यांना तंबी देऊन दुमाला केला व आता या कारणास्तव त्याला खिलत पाठविला आहे ते घेऊन सन्मानित होऊन पुढेहि मदतीचा नवा प्रयत्न करावा. कर्यातितील गांवाची व्यवस्था करुन पुंजाजी मजकुरास तंबी देऊन कर्यात मजकुरांतून बाहेर काढावा व त्यांत दखल होऊ देऊ नये याबाबत योग्य ताकीद जाणून पुन्हा फिर्याद येऊ देऊ नये यातच त्याचा उत्कर्ष व भले आहे असे जाणावे.

सु. १०६६ हि. १०७७ मोहरम २९

परवानगी हुजूर.

Ali Adilshah II sends robes of honour to Rataji Desai (Mane) for driving out Punaji from Karyat Kasegaon, which was occupied by the said Punaji illegally on behalf of Nayakji Pandhare.

---

*मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

कर्यात वेळापूर काबीज करून बहलोलखानाच्या स्वाधीन करण्याची रताजीवर कामगिरी

सु. सबा सितैन व अलफ
हि. १०७७ जावल १०

क्र. ७३

श. १५८८, कार्तिक शु. १३
इ. १६६६, नोव्हेंबर २९

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा अली आदिलशहा--रताजी देसाई म्हसवड.

जाधवरावाचा भाऊ खंडोजी[1] यास कर्यात वेळापूर[2], परगणे माण हे दिलेले होते ते अब्दुल करीम बहलोलखान[3] यास इनाम दिल्याचे फर्मान सादर झाले आहे. तेव्हा फर्मान मिळाल्याबरोबर खंडोजीच्या लोकास कर्यात मजकुरातून बाहेर काढावे व कर्यात मजकूर काबीज करुन नबाब मजकूरच्या लोकाकडे द्यावे याबाबतीत कुठल्याही प्रकारे अडथळा करू नये व हुकुमाप्रमाणे वागावे व जे कोणी याबाबतीत अडथळा करतील त्याना योग्य ते उत्तर दिले जाईल. मुद्दाम मुहम्मद हुसेन फतेउल्लाह यास आपल्या लोकांसह पाठविले आहे. तो सांगेल त्याप्रमाणे वागावे.

तारीख १० जमादिलावल १०७७ हीजरी.

Rataji Desai (Mane) of Mhaswad is informed by Ali Adilshah II of Bijapur that Karyat Velapur which was previously granted to Khandoji, brother of Jadhavrao, is now bestowed on one Abdul Karim Bahlolkhan: Rataji should drive out the people of Khandoji from that village and help Muhammed Hussain Fatehullah to resume the watan.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] खंडोजी–भुइंज शाखेचा पूर्वज, बायको सगुणाबाई. पहा सरदेसाई, ऐ. घ. वंशावळी, पृ. ४६.

[2] वेळापूर–ता. माळशिरस, जिल्हा सोलापूर.

[3] अब्दुल करीम बहलोलखान–विजापूरचा एक प्रमुख सरदार.

शिवाजीच्या लोकांना तंबी देण्याची रताजी मानेवर कामगिरी

सु. सबा सितैन अलफ
हि. १०७७ रमजान १८ } क्र. ७४ { श. १५८८, फाल्गुन व. ४
इ. १६६७, मार्च ४

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

वर्तुळाकार आदिलशाही
शिक्का

दुसरा अली आदिलशहा--रताजी (माने)

यावेळी दरबारांस समजले की सिवाचे [शिवाजीचे] स्वार हे अहसनाबादेतील[1] हिरापुराकडे घुसत आहेत. हे फर्मान मिळाल्याबरोबर सय्यद असील जमातदार खासखेल व वजारतमाब बजाजी व महादाजी[2] याजकडे जाऊन सिवाजीच्या लोकास तंबी देऊन स्वतःची दौलतख्वाही[3] जाहीर करावी तसेच या अर्थाचे फर्मान उपर्युक्त जमातदार व बजाजी व महादाजी यांस सादर झालेले आहे. जाणावे.

तारीख १८ रमजान १०७७ सनह.

हुजूर परवानगी.

Ali Adilshah II directs Rataji (Mane) to join Sayyad Asil Jamatdar Khaskhel and Bajaji and Mahadaji and to prevent Shivaji's men who are marching towards Hirapur in Ahsanabad (Gulbarga).

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] अहसनाबाद--गुल्बर्गा.

[2] बजाजी व महादाजी हे निंबाळकर पितापुत्र असावेत.
महादाजीस शिवाजी महाराजांची कन्या सखुबाई दिली होती. सरदेसाई, ऐ. घ. वंशावळी, पृ. ७१.

[3] दौलतख्वाई--दौलतखाही = हितेच्छा.

खटाव परगण्यातून शत्रूस हुसकावून लावल्याबद्दल सिदोजी माने याचा आदिलशहाकडून सन्मान

हि. १०८४ शाबान १५ | क्र. ७५ | श. १५९५, कार्तिक व. १ इ. १६७३, नोव्हेंबर १५

*बिस्मिल्लाह उर रहमान उर्रहीम
उल्मुल्क अल्लाह

वर्तुळाकार लहान आदिलशाही शिक्का

सिकंदर[1] आदिलशाह--सिदोजी बिन रतोजी माने नामज्राद
परगणें खटाव.

यांनी जाणावे की तुम्ही कौलानुसार परगणे मजकुरास येऊन राहिला तेव्हा गनीमानी परगणे मजकुरास तोशीस दिली असता तुम्ही कस्त[2] घेऊन गनीमास पळवून लाविले ही खबर हुजूरास समजली व ती पसंतीस आली तुमच्या उत्कर्षा-साठी बादशाही खिलत पाठविलेली आहे व तुमचा सन्मान केला आहे. तुम्ही इकडील वजीर हुकमत खवासखान[3] यानी त्या तर्फेच्या माहालावर नेमलेले सुबेदार नागोजी व एसो पंडित याजकडे आपल्या जमेतीसह जाऊन अत्यंत कस्त व प्रयत्न करून शत्रूस शिक्षा द्यावी व परगणे खटाव यास गनीमाची तोशीस लागो न देता खटाव परगणा आबाद होईल असे करावे. याप्रमाणे तुझा उत्कर्ष होईल हे जाणावे.

ता. १०८४ शावान १५.

Sikandar Adilshah sends robes of honour to Sidoji bin Rataji Mane for driving out enemy from his pargana Khatav. He is directed to contact Nagoji and Eso Pandit, who were appointed Subedars in that region, and see that the pargana is relieved from the enemy's troubles.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.
[1] सिकंदर आदिलहशाह–विजापूरचा सुलतान (इ.स. १६७२–८६).
[2] कस्त = मेहनत.
[3] खवासखान–विजापूर दरबारातील वजीर.

नागोजी माने यास औरंगजेबाचा कौलनामा--सरदेशमुखी व जमीनदारी मिळण्याचे आश्वासन

साबान १९ जुलूस २१ } क्र. ७६ { श. १६००, आश्विन व. ६ इ. १६७८, ऑक्टोबर २६

उजव्या बाजूस उजव्या हाताच्या पंजाचा ठसा त्याच्या डाव्या बाजूस वर्तुळाकार औरंगजेबाच्या सरदाराचा शिक्का.

*बमुजब हुक्म अशफअली

कौलनामा--नागोजी माने.

तुम्ही चाकरीत राहिल्यानंतर सरदेशमुखी व जमीनदारी वगैरे नतिजा पावाल तेव्हा त्वरेने हुजूर यावे व घोडे उंट वगैरेच्या बाबतीत अडथळा करू नये.

ता. १९ शाबान जुलूस २१.

Kaulnama (letter of assurance) to Nagoji Mane (from the Emperor Aurangzib) that he will receive Sardeshmukhi, Zamindari, etc. on entering the Mughal service.

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

नागोजी माने यास मोंगलांकडून साडेतेरा लाखाची जागीर

सफर १४ जुलुस २८ } क्र. ७७ { श. १६०६, फाल्गुन पौर्णिमा
इ. १६८५, मार्च १०

*अलिफ

उजव्या बाजूस असदखानाचा[1] वर्तुळाकार शिक्का

देशमुख देशपांडे व मोकदम व रया परगणे — तर्फ माणदेश नवीन मिळविलेला प्रांत यांनी जाणावे की, उपर्युक्त परगण्यातून खरीफाच्या सुरवातीपासून १३ लक्ष ५० हजार दामाची[2] जागीर नागोजी माने यास नेमून दिली आहे. दिवाणीचे हक्क व इतर जाबत्याप्रमाणे दिले आहेत. जागीरदाराचे गुमास्ते हे प्रजेबरोबर चांगले वागतील. त्यानी प्रयत्नपूर्वक काम करावे. ता. ११ रबिलाखर २८ जुलूस अलमगीर. लिहिल्याप्रमाणे लिहिले आहे असे जाणावे.

[पाठीवरती शेरा]

परगणे म्हैसवड तर्फ माणदेश नवीन प्रांत नागोजी माने वगैरे या पासून जागीर दिली आहे.

बहादुरखानाच्या[3] पत्राप्रमाणे अर्ज आला की शत्रूकडील कसबे म्हैसवड हे हल्ली बादशाही ताब्यांत आणले आहे. तरी उपर्युक्त ठिकाणी ठाणेदाराच्या चाकरीवरती नागोजी माने यास नेमलेले आहे तो महाल मजकूर आपणांस जाहागीर मिळावी म्हणून प्रार्थना करीत आहे तरी त्यास मनसब द्यावी. हुकूम झाला की मनसब देऊन तनखा द्यावा. ता. २५ साबान जुलूस २७.

कीर्दीप्रमाणे ता. १४ सफर जुलूस २८.

A Firman from Mughal Emperor.—On resuming Kasba Mhaswad by the Mughals, Bahadurkhan Koka recommended that the same may be given in jagir to Nagoji Mane. This is done. Nagoji Mane is also given Jagir of 13,50,000 dams in Man Pargana.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] असदखान (उमदत–उल–मुलूक) औरंगजेबाचा वज़ीर. हा काही काळ (१६७७–७८) दक्षिणेत सुभेदारीवर होता. औरंगजेबाच्या विजापूरावरील शेवटच्या मोहिमेत (१६८५–८६) याचा महत्त्वाचा भाग होता. (तारीख-इ-दिल्कशा, पृ. १४४).

[2] दाम = एक मुगलकालीन तांब्याचे चलनी नाणे. औरंगजेबाच्या काळी रुपयाला ४६ दाम असे त्याचे प्रमाण होते. विल्सन ग्लोसरी, पृ. १८७.

[3] बहादुरखान (कोकल्ताश, मूळ नाव–मलिक हुसेन कोका) १६७३-७७ या दरम्यान तोही दक्षिणेत सुभेदारीवर होता. १६८५ च्या सुमारास तोही विजापूर मोहिमेत होता. तारीख-इ-दिलकशा, पृ. १४४.

आदिलशहाकडून रताजी माने यास मिळालेल्या इनाम महालांचा तपशील

ता. ५ जिल्हाद जु. ३३ } क्र. ७८ { श. १६११, भाद्रपद शु. ५ इ. १६८९, ऑगस्ट ११

*अलिफ

काझीचे दोन वर्तुळाकार शिक्के

ह्या वेळी लिहून देण्याचे कारण हे की नागोजी माने देशमुख पा म्हैसवड असे जाहिर करीत आहे की मुहम्मद आदिलखानाच्या[1] सनदेप्रमाणे अंदाजे ४ कुडे व ३१० होन हे खाली नमूद केलेल्या महालातून माझे वडील रताजी यास इनाम म्हणून नेमले होते परंतु गनिमाच्या बंडामुळे माझ्या सनदा हरवल्या म्हणून जाहिर केल्याप्रमाणे उपर्युक्ताने ह्या ओळी कामास उपयोगी पडाव्या म्हणून लिहून दिल्या.

महाल–

असदनगर (अकलूज), येलापूर, दहिगांव,
कारवा, कुनेरा, निमगाव,
म्हैसवड, आठपाडी, नाजरा,
हिंगणी, सांगोला, कासेगांव,
ब्रह्मपुरी, भालवणी, कलाढोर्णे,
मंगळवेढा.

ता. ५ जिल्काद जु. ३३

Note written by Nagoji Mane, Deshmukh of Pargana Mhaswad, declaring that according to the Sanads granted by Muhammad Adilshah his father had Inams in sixteen Mahals. But the Sanads have been lost during the enemy's disturbances.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] मुहम्मद आदिलशहा–विजापूरचा सुलतान (१६२६–५६).

चिंचोली परगण्यात उपद्रव होत असल्याबद्दल नागोजीची तक्रार व त्याबद्दल ताकीदपत्र

रजब २७ जु. ३३ } क्र. ७९ { श. १६१३, अ. वै. शु. १४
इ. १६९०, एप्रिल २७

*अलिफ

ख्वाज़ा अबदुल अज़ीम हे सुरक्षीत असो योवेळी नागो मान्याच्या वकीलाने न्यायालयातील अधिकाऱ्यांच्या मार्फतीने तक्रार केली की पा. चिंचोली सरकार मुजफ़रनगर, मुजाफ सुभे मूहमदाबाद उर्फ जाफराबाद हे मोकिलास तनखा म्हणून आहे. मुहम्मद शफी नावाचा तुमचा गुमाश्ता तेथील रयतेस अनेक तऱ्हेने उपद्रव देत आहे. प्रज़ाजन तेथून पळून गेले आहेत. उपर्युक्त गुमाश्ता हा मोकीलाच्या हवेलीत, जेथे त्यांचे काही नातेवाईक रहात आहेत तेथे गेला. त्याने दरवाजा मोडून तीन लोकास ठार केले व चार लोकास जखमी केले व हवेलीस आग लावली. त्यामुळे दोन घोडे व ९ रेडे, १२० खंडी धान्य जळाले. तीन स्त्री नोकरांना कैद केले. त्याच्या जुलूमामुळे जवळपासच्या ठिकाणाहून जिजया वसूल होत नाही. मोकीलाचे अधिकारी त्याबद्दल मागणी करत आहेत. म्हणून असे लिहिले जात आहे की जे काही घडेले ते कांही चांगले नाही. तुम्ही या मुकदम्याची चौकशी करावी. मजकूर गुमाश्त्याने हे अत्यंत अयोग्य काम केले आहे. त्यास तगीर केले पाहिजे व दुसऱ्या इसमास पाठवून देऊन त्यास ताक़ीद केली पाहिजे की त्याने लोकापासून जिजया कर शरिअत प्रमाणे वसूल करावा, अहदीच्यावर लक्ष ठेवावे, त्याबाबतीत ताकीद जाणावी.

ता. २७ रजब जु. ३३.
पैवस्ती ताा ५ शाबान जु. ३३

पाठीवरती असदखानाचा वर्तुळाकार शिक्का
फजाईल खानाच्या परवानगीत बघितले.

Khwaja Abdul Azim is directed to warn his servant Muhammad Shafi who devastated Pargana Chincholi belonging to Nagoji Mane by burning Nagoji's house and killing his relative.

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

छत्रपति राजाराम महाराजांकडून नागोजी माने यास कसबे कलाढोणचे इनाम

रा. श. १७ प्रजापति चैत्र व. ९	क्र. ८०	श. १६१३, चैत्र व. ९ इ. १६९१, एप्रिल ११

श्री

श्रीधर्मप्र
द्योतिता शेषव
र्णा दाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे
यं विश्ववंद्या
विराजते

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १७ प्रजापती नाम सवछरे चैत्र बहुल नवमी मंदवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजाराम छत्रपती याणी राजेश्री नागोजी बिन रतोजी माने यास दिल्हे अभयपत्र ऐसाजे तुम्ही पूर्वी तांब्राकडे[1] होतेत त्याउपरी स्वामीचे पायासी येकनिष्टता धरुन कर्नाटकात चंदीचे मुकामी स्वामी-पासी आलेती[2] येऊन तुम्ही विनंती केली की स्वामींनीं

श्रीराजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्रीलक्ष्मी
नृहरिप्रीते:
मुद्रा नीराजि-
जन्मन: राजा
रामप्रतिनिधे:
प्रल्हादस्य
विराजते

कृपाळू होऊन आपणास कर्यात कसबा कलाढोण देह १ येक इनाम करुन द्यावया आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केले त्यावरुन तुमची विनंती मनास आणून तुम्ही स्वामी कार्याचे इमाने सेवा करीत आहा यास्तव स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन नूतन इनाम कसबा कलाढोण देह १ येक सूस कुल बाव कुलकानु दिधले

---

[1] तांब्र = मुसलमान, मोगल.

[2] नागोजी माने, नेमाजी शिंदे, इ. मोंगलाकडील मराठे सरदार नोव्हेंबर १६९० त जिंजीच्या मुक्कामी राजाराम महाराजांना येऊन मिळाले. जे. श. (शि.च.प्र.), पृ. ३५.

असे सदरहू कसबा इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्री परंपरेने अनुभऊन सुखरुप असणे *निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजू

तेरीज २१ रजब
सुा इहिदे तिसैन

माहे रजब
सुरु सुद बार

Nagoji Mane who was in the Mughal service joined Chhatrapati Rajaram at Jinji to serve the Maratha cause. In recognition of his useful services the Chhatrapati granted to him an Inam of village Kaladhon in perpetuity.

---

* येथून अक्षर निराळे.

छत्रपतींकडून नागोजीस दहीगाव इनाम

रा. श. १७ प्रजापति चैत्र व. ९ — क्र. ८१ — श. १६१३, चैत्र व. ९ / इ. १६९१, एप्रिल ११

श्री

श्रीधर्मप्र
द्योतिता शेषव
र्णा दाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे
या विश्ववंद्या
विराजते

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १७ प्रजापतीनाम सवछरे चैत्र बहुल नवमी मंदवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजे नागोजी बिन रताजी माने देशमुख का। दहीगाऊ यास दिल्हे वृत्ती पत्र यैसीजे तुम्ही पूर्वी तांब्राकडे होतेत त्याउपरी स्वामीचे पायासी येकनिष्टता धरुन कर्नाटकात चंदीच्या मुकामी स्वामीपासी आलेती येऊन विनंती केली की स्वामीनी कृपाळू होऊन आपणास कर्यात दहीगाव प्रामाण हा माहाल इनाम करुन द्यावया आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केले त्यावरुन तुमची विनंती मनास आणून तुम्ही स्वामी कार्याचे इमाने सेवा करीत आहा यास्तव स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन नूतन इनाम

श्रीराजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्री लक्ष्मी॰
नृहरिप्रीतेः
मुद्रा नीराजि
जन्मनः राजा
राम प्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

कर्यात दहीगाऊ इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्री परंपरेने अनभऊन सुखरूप असणे जाणिजे *निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजु

तेरीख २१ माहे रजब
रजब सुाा इहिदे तिसैन सुरु सुद बार

Nagoji bin Rataji Mane Deshmukh who was in the service of Mughal joined Chhatrapati Rajaram at Jinji serving for Maratha cause. In recognition of his services he was granted an Inam of Mahal Dashigaon in Paragana Man.

* येथून अक्षर निराळे.

स्वामीचे राज्य म्हणजे देवता भूमी – मराठी धर्म संरक्षण

नागोजी माने यांस छत्रपतींकडून बारा गावांत सरदेशमुखीचे इनाम

रा. श. १७ प्रजापति चैत्र व. ९ } क्र. ८२ { श. १६१३, चैत्र व. ९ इ. १६९१, एप्रिल ११

[नक्कल]

श्री

[शिक्का]

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १७ प्रजापतीनाम सवत्सरे चेत्र बहुल नवमी मंदवासरे क्षत्रीय कुळावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजश्री नागोजी बिन रताजी माने यासी दिल्हे अभयपत्र ऐसीजे तुम्ही पूर्वी तांब्राकडे होतेत ऐसियासी स्वामीचे राज्य म्हणजे देवता भूमी या राज्यास तांब्राचा उपद्रव न व्हावा मराठ धर्म राहावा स्वामीच्या राज्याची अभिवृद्धी व्हावी या उदेशे स्वामीच्या पायापासी

[शिक्का] [शिक्का]

येकनिष्टता धरुन कर्नाटकात चंदीचे मुकामी स्वामीपासी आलेती येऊन विनंती केली की आपणास देश्यात सरदेशमुखीचे वतन करुन दिल्हे पाहिजे ते बितपसील

१	कसबे म्हसवड देखील बारा वाड्या	१	कर्याती दहीगाव
१	कर्याती सांगोले	१	कर्याती भालवणी
१	कर्यात आटपाडी	१	कर्याती नाझरे
१	कर्याती ब्रह्मपुरी	१	कर्याती कासेगाऊ
१	कर्याती अकलूज	१	कर्याती वेळापूर
१	कर्याती मंगळवेढे	१	कर्याती कलाढोण
६		६	

येकूण माहाल बारा १२ माहालचे वतन करुन द्यावयासी आज्ञापत्र देविले पाहिजे म्हणोन विदित केले ऐसियासी तुम्ही स्वामी सेवेवरी येक च्रिते वर्तत आहा तुम्हावर स्वामी कृपाळू होऊन नूतन वतन सरदेशमुखीचे वतन सदरहू बारा

माहालाचे करुन दिल्हे असे तुम्ही व तुमचे पुत्रपौत्री आनभऊन सुखरुप असणे निदेश समक्ष मोर्तब असे

रुजू

तेरीख २१ माहे रजब

रजब सुाा इहिदे तिसैन सुरु सुद बार

Nagoji bin Rataji Mane who was in the service of Mughal came over to the Marathas and joined Chhatrapati Rajaram at Jinji to serve Maratha cause. His request for a Sardeshmukhi watan of twelve Mahals is granted.

नागोजी माने यास छत्रपतींकडून दोन गावे इनाम

रा. श. १७ प्रजापति ज्येष्ठ शु. २	क्र. ८३	श. १६१३, ज्येष्ठ शु. २ इ. १६९१, मे १९

श्रीधर्मप्र
द्योतिता शेषव
र्णा दाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे
या विश्ववंद्या
विराजते

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १७ प्रजापती नाम सवछरे ज्येष्ट शुध द्वितिया भोगवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजेश्री नागोजी माने देशमुख कर्याती हाये पा माण यासी दिल्हे अभयेपत्र येसी जे तुम्ही चंदीचे मुकामी स्वामीसनिध येऊन विनंती केली की आपणास देशात इनाम गाऊ २ दोनी पूर्वापार भोगवटा चालत आले आहे ती पुढे उतरोतर चालवायाची आज्ञा केली पाहिजे बिा

श्री राजाराम
नरपति हर्ष निधान
मोरेश्वरसुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्री लक्ष्मी
नृहरि प्रीतेः
मुद्रा नीराजि
जन्मनः राजा
राम प्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

मौजे गाड्वड कसबे अकलूज	मौजे निबगाव कर्यात वेळापूर
गाऊ १	गाऊ १

येणे प्रमाणे गाऊ इनाम आहे ती म्हणोन विनती केली त्यावरुन स्वामी कृपाळू होऊन सदरहू दोन्ही गाऊ इनाम चालत आले असतील तेणेप्रमाणे चालवायाची

आज्ञा केली असे तुमचे पुत्रपौत्री अनभऊन सुखरुप असणे अभय असे जाणिजे.
निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजु

तेरीख ३०
शावान सुाा इहिदे तिसैन

माहे सावान
सुरु सुद बार

On request from Nagoji Mane at Jinji, Chhatrapati Rajaram grants him Inam of two villages viz. Mauje Gadwad and Nimgaon in perpetuity.

नागोजी माने मराठ्यांकडून निघून परत मोंगलास मिळतो

जिल्हेज २९ जु. ४१ } क्र. ८४ { श. १६१९, श्रावण शु. १
इ. १६९७, जुलै ९

*अला

बादशाही उजव्या हाताचा ठसा त्याच्या उजव्या बाजूस
वर्तुळाकार सैफखानाचा शिक्का

कौलनामा—नागोजी माने

तुम्ही दरबाराची सेवा करण्यासाठी शत्रू (बंडखोर मराठे) कडून निघाला[1] व संताजीच्या पळून जाण्याबाबत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याबाबत तुमच्या साठी फर्मान पाठवून व गुन्ह्याची क्षमा करून तुमच्या मागण्या हुजूर पाठविल्या. तेव्हा तुम्ही रणदुल्लाखानाच्या फौजेत जाऊन मिळावे व नंतर तुम्हाला तुमचे गुन्हे माफ केल्याचे फर्मान व मागण्या व इनाम वगैरे लिहिल्या प्रमाणे दिले जाईल. यातच तुमचे कल्याण व उत्कर्ष आहे व त्याप्रमाणे तुम्ही वागावे. तुमच्या प्राणापलीकडील निष्ठेबद्दल योग्य ते चीज होईल.

तेरीख २९ जिल्हेज जुलूस ४१.

Kaulnama (from the Emperor) to Nagoji Mane who put to flight Santaji Ghorpade. He is complimented for his service rendered to the Mughals. He is directed to join Randulla Khan and is assured of pardon and grant of watan.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] नागोजी माने या सुमारासच मराठ्यांकडून निघून मोंगलांकडे जाऊन मिळाला होता व त्याला तेथे पाच हजारी मनसब मिळाली होती. तारीख-इ-दिलकुशा, पृ. २०६.

संताजी घोरपडे याच्या वधानंतर त्याचे घोडे, उंट घेऊन जाण्यास नागोजी माने यास परवानगी

साबान १९ जु. ४१ } क्र. ८५ { श. १६१९, फाल्गुन व. ६ इ. १६९८, फेब्रुवारी २१

परवानगी

*नागोजी माने याच्या वकीलाच्या विनंतीनुसार दरबारास अर्ज आला की हुकुमाप्रमाणे मोकील कासेगावी पोहचला आहे. लवकरच हुजूर पोहचत आहे. संता नर्कवासी यास मारल्यानंतर[१] काही घोडे उंट बैल वगैरे मोकीलाच्या लोकाच्या हाती आले आहेत. प्रार्थना करितो की चौथाऱ्याच्या[२] कोतवालीच्या अधिकाऱ्याच्या नावे हुकूम व्हावा की त्याना अडथळा करू नये. बादशाही हुकूम झाला की त्यांना अडथळा करु नये.

ता. १९ साबान जु. ४१

हुकूम

पाठीवरती घौसखानाचा वर्तुळाकार शिक्का

After the assassination of Santaji Ghorpade his horses, camels, oxen, etc., fell in the hands of Nagoji Mane. He requested the Emperor from Kasegaon, to issue orders to the Kotwal not to obstruct him in carrying these animals. His request is granted.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[१] संताजी घोरपडे याचा खून जून १६९७ त झाला. जेधे शकावली (शि.च.प्र.), पृ. ३९.

[२] चौत्रा = कोतवालाची कचेरी.

नागोजी माने यास औरंगजेबाचे माफीचे फर्मान

साबान २१ जु. ४१ | क्र. ८६ | श. १६१९, फाल्गुन व. ८
इ. १६९८, फेब्रुवारी २३

औरंगजेबाचा वर्तुळाकार शिक्का

* नागोजी माने यांचे नांवे औरंजेबाचे फर्मान

नागो मान्याने यावेळी तरबियतखानाच्या मार्फतीने अर्ज केला की त्यांस त्यांच्या चुकीचा प्रश्चाताप होत असून आता तो बादशाही सेवा इमाने इतबारे करण्याची प्रार्थना करीत आहे व त्यास त्याचे पूर्वीचे गुन्हे माफ व्हावे. या कारणास्तव बादशाही कृपा होऊन त्यास क्षमा करण्यात आली असून त्याबद्दल त्याने धन्यवाद देऊन उंबरठयास सलाम करण्यासाठी धाऊन यावे म्हणजे त्याजवर कृपा होऊन उत्तम मनसबीच्या योगाने त्याचे डोके वर उचलले जाईल.

ता. साबान २१, जुळूस ४१.

पाठीवरती असदखानाचा वर्तुळाकार शिक्का.

The Emperor Aurangzib after pardoning Nagoji Mane for his errors summons him to the Court for receiving favours.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

नं ८ ... १५१ ...

औरंगजेब बादशहाकडे नागोजी माने याच्या मागण्या

मोहरम २१ जु. ४१ | क्र. ८७ | श. १६१९, श्रावण ब. ७ इ. १६९७, जुलै ३०

*नागोजी मान्या बादशहास अर्ज करितो व आशा करितो की खालील तपशीलाप्रमाणे मागण्या कबूल व्हाव्यात. २१ मोहरम जुलुस ४१ (कुम्माफसल)

माझ्या गुन्ह्याची माफी होऊन कौल व पंजाचे फर्मान मिळावे

सात हजार स्वार सात हजार जात यांनी कृपा व्हावी यापैकी चौथा हिस्सा, घोड्यास डाग देण व मोजदाद तसेच द्रो घोड्याचा खुराक माफ व्हावा व नगारा द्यावा जामीन माफ व्हावा.

हती, पोशाख, सोन्याचा साज असलेला घोडा (सोन्याच्या साखळी-सह), सांगोल्याच्या गढीत ठेवण्यासाठी सैन्य, तीस हजार रुपये इनाम ७० हजार रुपये मदत ५० हजार माझ्या साठी व वीस हजार रुपये भाऊबंदी-साठी देणेची कृपा व्हावी.

खाली दिलेल्या तपशीलाप्रमाणे त्या त्या ठाण्याची ठाणेदारी : गढी पतंगा गढी परगणे माजरा गढी आटपाडी गढी सांगोला गढी नात्यागोत्या (नातेपोते) गढी तहबोर

तनख्यासाठी जाग्रीर म्हणून खालील महाल तेथील फौजदारीसुध्दा द्यावेत.

परगणे	परगणे
पा सांगोला कासेगाव	चिंचोली
इस्लामपुरी	माजरा

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

व या ठाण्यांमध्ये पुर्वीप्रमाणे जो दारु गोळा वगैरे सामान आहे ते बहाल व्हावे.

आटपाडी
दहीगांव
मंगळवेढा
कालगी

अयेलमपूर
असअदनगर
मंगलगी

सरकार पारंड्यातून पांच परगणे
सरकार बिदर येथून दोन महाल

Emperor Aurangzib was requested by Nagoji Mane to grant him Mansab of 7-hazari sowars and 7-hazari zat, along with the necessary retinue, robe of honour and amount of 70,000 rupees as assistance, and Thanedari in various gadhis and jagirs in different parganas and mahals.

संताजी घोरपडे याच्या चीजवस्तू घेऊन जाण्यास नागोजीस परवानगी

शाबान १९ जु. ४१ } **क्र. ८८** { **श. १६१९, फाल्गुन व. ६**
इ. १६९८, मार्च २१

अल्लाह

*नागोजी मान्याच्या वकीलाचा विनंती अर्ज दरबारास आला की, नागोजी मान्या हुकुमाप्रमाणे कासेगावास पोहचला हुजूर जवळजवळ येऊन पोहचला आहे (संत्या नर्कवासी) संताजी यास मारल्यानंतर त्याच्या लोकांच्या हाती घोडे, ऊंट व बैल वगैरे आले आहेत आशा करितो की कोतवालीच्या मुत्सद्यांच्या नांवे हुकूम व्हावा की त्यांनी अडथळा आणू नये. हुकूम झाला की अडथळा आणू नये.

ता. १९ शाबान जु. ४१

हुकुम

पाठीवरती घौसखानाचा वर्तुळाकार शिक्का
त्याखाली 'बघितले' असा शेरा.

Nagoji Mane is permitted to carry without obstruction from Kotwal's office, the horses, camels, oxen, etc., captured by his people after murder of Santaji Ghorpade.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

परगणा मांडोरा येथे नागोजीस मोंगलांकडून जागीर

सफर १८ जु. ४२ } क्र. ८९ { श. १६२०, श्रावण व. ४
इ. १६९८, ऑगस्ट १५

*अलीफ

परगणे मांडोरा सरकार नर्नाला सुबे वराड पैकी ७ लक्ष ७८ हजार दामाची अलिखानाची जागीर तगीर[1] करुन नागोजी माने यास तनख्यासाठी दिल्याचा हुकूम झाला. उपर्युक्त महालांतील महसूल कराराप्रमाणे वसूल करुन सुरक्षित ठेवावा. राजपत्रांत लिहिल्या गेल्यानंतर तनखा म्हणून द्यावे. याप्रमाणे अमल करावा. ता. १८ सफर जुळूस ४२.

[पाठीवरती शेरा] परगणे मांडोरा सरकार नर्नाला सुबे वराड येथील अली-खानाची जागीर तगीर करुन नागोजी वल्द रताजी माने यास तनख्यासाठी दिल्याचा हुकूम झाला. दरोबस्त तनख्याच्या दामाचा परवाना येईपर्यंत पूर्वीप्रमाणे लक्ष ठेवावे. परवाना मिळाल्यानंतर जाबत्याप्रमाणे अमल करावा.

५ हजारी जात, चौमाही चौथाई वजा करुन नागोजी मान्याचा वसूल हरिपंत पंडित याने ४० दिवसामध्ये उपर्युक्त परवाना आणून देण्याबद्दल मुचलका लिहून दिला आहे व तनखा वसूल करण्याबद्दल परवानगी मागितली आहे. असे घडले नाही तर जागीर तगीर व्हावी.

पाठीवरती दियानतखानाचा वर्तुळाकार शिक्का.

An order granting Jageer of 7,78,000 dams in Pargana Mandora, Sarkar Narnala, in Berar Subah, to Nagoji Mane.

*मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] तगीर = रद्द, बडतर्फ.

मोंगलांकडून मांडोरा परगण्यांतील जागीर नागोजीस

रबिलावल २२ जु. ४२ } क्र. ९० { श. १६२०, आश्विन व. ९ / इ. १६९८, ऑक्टोबर १७

*अलीफ

उजव्या बाजूस असदखानाचा वर्तुळाकार शिक्का

देशमुख देशपांडे मुकदम व रया, परगणे मांडोरा सरकार नर्नाला सूबे वराड यानी जाणावे की, उपर्युक्त परगण्यांतून ११ लक्ष ४ हजार ४१० दामाची जागीर अलीखान वगैरेकडून तगीर करुन रबीच्या सुरुवातीपासून हुकूमाप्रमाणे नागोजीस नेमलेली आहे. दिवाणीचे हक्क व कराराप्रमाणें उपर्युक्ताच्या गुमास्त्यांना वसुल करू द्यावे

ता. २२ रबिलाखर जुळस ४२.

[पाठीवरती शेरा] परगणे मांडोरा सरकार नर्नाला सुबे वराड येथील अलीखान वगैरेची जागीर तगीर करुन नागोजी वल्द रताजी माने यास नेमली आहे.

Nagoji Mane is given grant of Jagir worth 11,04,410 dams in Pargana Mandora by removing it from Ali Khan.

---

*मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

साबाजी निंबाळकर यास आदिलशाहीतील जागिरी चालू ठेवण्याचे बादशहाकडून आश्वासन

जमादिलावल २१ जु. ४३ } **क्र. ९१** { **श. १६२१, मार्गशीर्ष व. ८ इ. १६९९, डिसेंबर ४**

*कौलनामा : साबाजी निंबालकर

नागोजी माने याने तुझ्याबद्दल लिहिलेली हकीकत समजली. खातीरजमा ठेऊन चाकरीत यावे म्हणजे गुन्हे माफ केले जातील व ३ हजारी जात, दोन हजारी स्वार, ४ माही चौथा हिस्सा वजा करुन व हत्ती, घोडा, पोशाख व १० हजार रुपये मदत व परगणे खानापूर येथील देशमुखी अदिलखानाच्या सनदांप्रमाणे जागीराच्या तनख्यासाठी जुन्या प्रदेशात दिली जाईल. जमीयत[१] घेऊन या पत्रास कौलनामा समजून खातिरजमा करुन त्वरेने पोचावे. ता. २१ जमादिलाखर जु. ४३.

As per recommendations of Nagoji Mane, Kaulnama is given to Sabaji Nimbalkar assuring that on joining Mughal service he would be given Saranjam of 3–hazari zat and 2–hazari sowars and others assistance and continuance of Deshmukhi watan in Khanapur Pargana given by Adilshah.

*मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[१] जमीयत-जमेत = जमाव, जमात.

नागोजी माने यास मोंगलांकडून पाच हजार जात व चार हजार स्वारांची मनसब

शाबान १२ जु. ४३ हि. ११११	क्र. ९२	श. १६२१, पौष व. १४ इ. १७००, जानेवारी ९

नकल

*रोज मंगळवार ता. १२ शाबान जु. ४३ हि. ११११ बहमन १५०

बक्षी-उल-मुल्क बहरामंदखान[१] व वाक्यानिगारीचा नायब हिदायतुल्लाह[२] यानी लिहून पाठवले की बादशाही हुकूम झाला आहे की नागोजी माने यास पांच हजारी जात, चार हजार स्वाराची मनसब दिली आहे. घोडचास डाक देणे व निशाण करणेबद्दल[३] माफी दिली आहे. हे जाणावे. ताा. २८ रजब जु. ४३

पांच हजारी जात
चौमाह, चौथाई वजा
ठाणे आटपाडी व नातेपोते
उपर्युक्तास दिले.

बहरामंदखानाचा शेरा

वाक्यात दाखल करावे.

वाक्याप्रमाणे आहे.

हुकूम

सदरील तारीख

Bakshi-Ul-Mulk Bahramand Khan and the Newswriter Hidayat-ullah has informed that Nagoji Mane is given Mansab of 5–hazari zat and 4-hazari sowars, and he is exempted from the process of branding of horses.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[१] बहरामंदखान–मिर्झा बहरामचा मुलगा, वजीर जाफरखानाचा पुतण्या, असदखानाचा जावई. मूळ नाव अझिझुद्दीन. हा मीरबक्षीच्या हुद्यापर्यंत चढला होता. (मासिर-इ-आलमगिरी, पृ. २७४).

[२] हिदायतुल्लाह–दिल्ली येथील वाकेनवीस. कित्ता, पृ. १११.

[३] घोडचाच्या व स्वारांच्या निशाण्यांची नोंद सरकारात केली जाई. त्याला 'दागतशीहा करणे' असे म्हणत. ऐ. शब्दकोश, भाग १, पृ. ६२०.

सोनेगावची गढी नागोजी मानेच्या ताब्यात देण्याबाबत बादशाही ताकीदपत्र

शाबान १६ जु. ४३ } क्र. ९३ { श. १६२१, माघ व. ३
इ. १७००, जानेवारी २७

*अलीफ

काझीचा वर्तुळाकार शिक्का

उजव्या बाजूस साक्षिदारांचे निरनिराळे आठ शिक्के

ह्या ओळी लिहिण्याचे कारण की पा चिंचोली सरकार मुझफरनगर सुभे मुहम्मदाबाद येथील फौजदारी नागोजी माने यास नेमून दिली आहे. ख्वाजा अबूल ताळा याने बादशाही सनदेशिवाय मौजे सोनेगांव येथील गढीत जबरदस्तीने ठाणे बसविले आहे व तो आम्हास दाखल होऊ देत नाही त्यास फौजदारीच्या अमलात अडथळा आणू नये म्हणून दक्षिणच्या सुभ्याच्या दिवाणास त्याच्या मोहरेनिशी ताकीद देणारी दोन पत्रे पाठवली आहेत. परंतु उपर्युक्त अमीनाने जुलूम जबरदस्तीने करुन दाखल होऊ दिला नाही. तेथील रिआ, महाजन व व्यापारी लोकानी कसबे चिंचोली येथील न्यायालयात येऊन त्याबद्दल तक्रार केली की आमचे संरक्षण उपर्युक्त अमीनाच्या हातून होत नाही तेव्हा उपर्युक्त अमीनास परत एकदा लिहून कळवले की उपर्युक्त ठिकाण नागो माने याच्या फौजदारीत आहे व सदर गढी त्याच्या लोकाच्या ताब्यांत द्यावी म्हणजे प्रजेचे संरक्षण करता येईल व जर दिली नाही तर न्यायालयांत हजर रहावे. परंतु अमीन मजकूर जबरदस्ती करुन आला नाही. म्हणून ह्या ओळी लिहिल्या आहेत ते सर्वश्रुतच आहे. लेखन ता. १६ शाबान जु. ४३.

The office of Faujdari of Pargana Chincholi, in Sarkar Muzaffarnagar, Subha Muhammadabad was allotted to Nagoji Mane. One Khwaja Abdul Tala took possession of the fortress at Sonegaon (in Nagoji Mane's province) without the Emperor's orders. The Rayat, Mahajans and merchants in that province made a complaint in the Judicial Court at Chincholi that they are not protected by the Diwan of the Deccan Subha. The said officer is directed to make arrangements to return the fortress of Nagoji to him.

Amin arrogantly did not appear before the judicial ...

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

हिरापूर व पेठ सोनेगाव येथील व्यापाऱ्यांकडून कर्जफेड पूर्णपणे झाल्याबद्दल पत्र

रमजान ५ जु. ४४ } क्र. ९४ { श. १६२१, फाल्गुन शु. ११
इ. १७००, फेब्रुवारी १५

*अलिफ

वरती काझीचा वर्तुळाकार शिक्का

कागदाच्या उजव्या बाजूस साक्षिदारांच्या सह्या व सात वर्तुळाकार शिक्के

कारणे लिहून देतो की, ता. २९ शाबान जु. ४३ कचेरीत नेमलेल्या, सय्यद अली नांवाच्या मुहम्मदाबाद सुभ्याच्या दिवाणाच्या शिक्याचा दस्तक, नागो माने फौजदार पा चिंचोली याचा गुमास्ता सिताबराव याच्या नावे खालील मजकूराचा दस्तक आणिला. अमले हिरापूर येथील राहणार व पेठ सोनेगांव येथील राहणार शिवलिंग, इ. व्यापारी यांच्याकडून कर्जाची रक्कम येणे आहे. उपर्युक्त लोक कर्जाची अदाई करीत नाहीत. तेव्हा उपर्युक्तांना परगणे मजकूरच्या न्यायालयाच्या कचेरीत हजर होण्यास कळवले आहे. म्हणजे कायद्याप्रमाणे त्याचा निवाडा होईल. म्हणून फौजदाराच्या गुमाश्त्याने दोन तीन वेळा आपल्या लोकास पाठवले कीं दिवाणाच्या दस्तकाप्रमाणे हजर व्हावे म्हणजे मामल्याचा निकाल देता येईल. परंतु उपर्युक्त लोक हजर झाले नाहीत. त्यानंतर शिवलींग वगैरे व्यापाऱ्यावरती काझीच्या शिक्याचा हुकूम पाठवला की उपर्युक्त व्यापारी हे बंडखोर आहेत. न्यायालयाचा हुकूम झाला आहे की त्यांनी स्वतःस न्यायालयात हजर करावे. परंतु यापूर्वीच उपर्युक्ताचे घेतलेले कर्ज त्यांनी पूर्णपणे परत केले. त्याबाबत हे लिहून दिले आहे––याबाबत सर्वास सुचना व्हावी.

ता. ५ रमजान जु ४४

The merchants of Hirapur and Peth Sonegaon, who were not repaying loans, were summoned in the Judicial Court. But they did not turn to the Court, inspite of repeated summons. Hence the Kazi declared them to be rebel and sent order to be present in the Court. But the said merchants repaid the loans.

* मूळ फार्शी कागदाचे माराठी भषांतर.

नागोजी माने याचा नायब सिताबराव लुटलेले सर्व सामान परत करतो

जावल ४ जु. ४४ } क्र. ९५ { श. १६२२, आश्विन शु. ५
इ. १७००, ऑक्टोबर ६

*अलिफ

नबाब असदखान

काझीचा वर्तुळाकार शिक्का
उजव्या बाजूस तीन वर्तुळाकार शिक्के, पैकी
(१) कलंदरखान, (२) खेमकुरण, (३) अस्पष्ट.

क्षेम करणे मुशरीफ सरकार मुजफरनगर सुबा मुहम्मदाबाद याचा स्वखुशीचा दस्तक, यापुर्वी माहे जिल्हेज जु. ४४ या काळी पेठ सोनेगांव आा पा चिंचोली येथे नागोजी माने याचा नायब सिताबराव यांच्या कांही लोकाचे व माझे भांडण झाले. मी दरबारास तक्रार केली होती की माझे सामान लुटले गेले आहे. असदखानाच्या शिक्क्याचा परवाना आला होता. मध्यंतरीच्या काळात उपर्युक्त सिताबरावाने माझे सर्व गेलेले सामान परत दिले व त्याबद्दल मी मान्यता दिली. तेव्हा मी हे सर्व सामान मिळाल्याबद्दल वसुलाची पावती म्हणून स्वखुशीने लिहून दिले आहे. यानंतर आता माझा कुठलाही हक्क राहिलेला नाही तसेच भांडण राहिले नाही. यानंतर मी काही हक्क सांगितला तर तो खोटा आहे असे समजावे.

ता. ४ जावल जु. ४४.

The Mushriff, Sarkar Muzaffarnagar, Subha Muhammadabad confesses that he had received back the goods looted by the people of Sitabrao, the servant (deputy) of Nagoji Mane at Peth Sonegaon.

---

* मूळ फारशी कागदाचे मराठी भाषांतर.

महादजी घाटगे यास बादशहाकडून मनसब, जागीर व इनाम देण्याचे आश्वासन

जिलकाद ३० जु. ४६ } क्र. ९६ { श. १६२४, चैत्र व. ७ इ. १७०२, एप्रिल ७

*अलीफ

उजव्या हातास वर्तुळाकार (मुजाहिदखानाचा) शिक्का

कौलनामा—नागोजी माने

नागोजी माने याने माहादाजी वल्द साबाजी घाटगे याच्या मागण्याचा अर्ज बादशाहास पाठविला. त्याबाबत खान फिरोजजंग[1] याच्या मोहरेचा कौलनामा येईल. तरी खातिरजमा ठेऊन बादशाही फौजेची चाकरी करणे. एकूण मागण्या मनसब, इनाम, जागीर, जात व स्वार वगैरे लौकर पावतील ता. २० जिलकाद जुळूस ४६.

हुतुल गालिब.

Kaulnama to Nagoji Mane on the petition of Mahadaji Ghatge, sent by him to the Emperor.

---

* मूळ फार्शी कागदाचे मराठी भाषांतर.

[1] फिरोज़-जंग–शिहाबुद्दीन खान, औरंगजेबाच्या दरबारातील 'शिपाह सालार'.

नागोजी घाटगे यास बादशहाकडून कौलनामा

जिल्काद २० जु. ४६ } क्र. ९७ { श. १६२४, चैत्र शु. ७
इ. १७०२, एप्रिल ७

उजव्या बाजूस मुजाहिद्खानाचा वर्तुळाकार शिक्का

*कौलनामा :

नागोजी माने याने दरबारास प्रणाम करुन नागोजी घाटगे याच्या मागण्यांचा अर्ज बादशहास केला. जुमदतुल्मुल्क खान फिरोजजंग याचा हुकुम झाला की इकडील मोहरेनिशी कौलनामा तिकडे पाठवत आहे. खातिरजमा ठेऊन बादशाही फौजेत येऊन योग्य ती चाकरी करावी म्हणजे तुमच्या मागण्या, मनसब, मदत, इनाम, जाहागिर, जात व स्वार हे इच्छेप्रमाणे मिळतील. ता. २० जिल्हाद जु. ४६.

Nagoji Ghatge is assured that he will receive good position, Inams, Jagirs, etc., on joining Mughal service.

* मूळ फार्शी कागदाचे भाषांतर.

नागोजी माने यास शिवछत्रपति (दुसरे) यांचेकडून म्हसवडसहीत बारा वाड्या इनाम

रा. श. २९ चित्रभानु पौष व. ३ भृगु	क्र. ९८	श. १६२४, पौष व. ३ इ. १७०२, डिसेंबर २५

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २९ चित्रभानु संवत्सरे पौष्य बहुल त्रितिया भृगुवासर क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती[१] याणी राजश्री देशाधिकारी व कारकून प्रांत माण यासि आज्ञा केली ऐसीजे राजश्री नागोजी माने याणी

श्री शि
वनरपति
हर्ष निधान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री
आई आदिपुरुष
श्रीराजाशिवछत्रप
ति स्वामि कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

कैलासवासी राजश्री स्वामीची सेवा बहुतच निष्टेने केली याकरिता त्याणी कृपाळू होऊन मारनिलेस कसबे म्हसवड देखील बारा वाड्या इनाम दिल्हा आहे तेणे प्रमाणे स्वामीसही चालवणे अगत्य यास्तव हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्ही हे जाणून का मजकूर दा वाड्या नागोजी माने यास कैलासवासी स्वामीची सनदेप्रमाणे बिकुसूर इनाम चालवणे उपसर्ग कांही न देणे प्रतीवर्षी नूतन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रत लेहोन घेऊन हे मुख्य पत्र मारनिलेकडे भोगवटि यास परतोन देणे जाणिजे *निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजू अकूब

[र] निविस

सुरु सुद बार

Memorandum issued to the Deshadhikari and Karkun, Prant Man, by Chhatrapati Shivaji II stating that Nāgoji Mane was previously granted Inam of twelve Wadis including Mhaswad by Rajaram Chhatrapati and that the same Inam should be continued to him undisturbed.

---

[१] राजाराम व ताराबाई यांचा पुत्र शिवाजी (दुसरा).

* येथून अक्षर निराळे.

नागोजी माने यास छत्रपतींकडून म्हसवडसहीत बारा वाड्या इनाम

रा. श. ७ चित्रभानु
पौष व. ३ भृगु

क्र. ९९

श. १६२४, पौष व. ३
इ. १७०२, डिसेंबर २५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २९ चित्रभानु संवत्सरे पौष्य बहुल त्रितिया भृगुवासर क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती याणी मोकदमानी व रयानी का म्हसवड प्रांत माण यासि आज्ञा केली ऐसीजे का मजकूर देखील बारा वाड्या राजश्री

श्री शि
वछत्रपति
हर्ष निधान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री
आई आदिपुरुष
श्री राजा शिवछत्रप
ति स्वामि कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

नागोजी माने यास कैलासवासी स्वामीनी इनाम दिल्हा आहे तेणे प्रमाणे स्वामीनी करार केला असे तरी तुम्ही का मजकूर देखील वाड्या माारनिलेकडे इनाम कैलासवासी स्वामींचे सनदेप्रा॰ चालवणे *जाणिजे

मर्या
देयं विरा
जते

सुरू सुद बार

The Mokadam and the subjects of Karyat Mhaswad, Prant Man, are informed that the Inam of twelve Wadis including Mhaswad has been continued to Nagoji Mane.

---

* येथून अक्षर निराळे.

नागोजी माने यास छत्रपतींकडून म्हसवडसहीत बारा वाडचा इनाम

रा. श. २९ चित्रभानु पौष व. ३ भृगुवासर	क्र. १००	श. १६२४, पौष व. ३ इ. १७०२, डिसेंबर २५

श्री

श्री
प्रतिपचंद्र
लेखेव वर्धिष्णुवि
श्ववंदिता रामसू
नो: शिवस्यैशा मुद्रा
भद्राय राजते

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक २९ चित्रभानु संवत्सरे पौष्य बहुल त्रितिया भृगुवासर क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती याणी राजश्री नागोजी बिन रताजी माने यासि दिल्हे इनामपत्र ऐसेजे आपण कैलासवासी राजश्री स्वामीची सेवा निष्ठेने केली म्हणोन त्याणी कृपाळू होऊन आपणास कसबे म्हसवड देखील बारा वाडचा इनाम दिल्हा आहे तरी स्वामीनेही उत्तरोत्तर चाले ऐसी आज्ञा केली पाहृजे म्हणून तुम्ही विनती सांगोन पाठविली यैशास कैलासवासी स्वामीचे वेलेस तुम्ही बहुतच निष्ठेने सेवा केली हाली स्वामीची पायासी निष्ठ धरुन वर्तता या बदल तुमचे चालवणे अगत्य म्हणून स्वामी तुम्हावरी संतोषी होऊन का म्हसवड देखील बारा वाडचा कुलबाब कुलकानू तुम्हांस इनाम करार केला आहे तरी तुम्ही पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने का मार देखीलवाडचा इनाम अनभऊन सुखरुप असणे जाणिजे *निदेश समक्ष

श्री शि
वनरपति
हर्ष निधान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री
आई आदिपुरुष
श्रीराजा शिवछत्रप
तिस्वामि कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

मर्या
देयं विरा
जते

सुरु सुद बार

Chhatrapati Shivaji II continues Inam of twelve Wadis including Kasba Mhaswad to Nagoji Mane. The said Inam was originally given to Nagoji by late Rajaram Chhatrapati, who was pleased with his loyal services.

---

* येथून अक्षर निराळे.

छत्रपतींकडून म्हसवडसहीत बारा वाड्या नागोजी माने यास इनाम

रा. श. २९ चित्रभानु पौष व. ३ भृगुवासर | क्र. १०१ | श. १६२४, पौष व. ३ इ. १७०२, डिसेंबर २५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक २९ चित्रभानु संवत्सर पौष्य बहुल त्रितिया भृगुवासर क्षत्री (य) कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती यांणी राजश्री सुभेदार व कारकून

श्री शि
व नरपति
हर्ष निधान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री
आई आदिपुरुष
श्रीराजा शिवछत्रप
तिस्वामि कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

सुभे लस्कर पागा व सिलेदार यासी आज्ञा केली यैसीजे का म्हसवड देखील बारा वाड्या कैलासवासी स्वामीनी राजश्री नागोजी माने यांस इनाम दिल्हा आहे यैशीयास मारनिलेनी पूर्वी सेवा, उदंड्च केली हाली निष्ठेने वर्तत्मात याकरिता का मजकूर इनाम चालवणे अगत्य म्हणोन करार केला आहे यैसीयास तुम्ही कोण्ही का मजकुरास तसवीस द्याल तरी न देणे ताकीद असे जाणिजे *निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

सुरु सुद बार

Order from Chhatrapati Shivaji II to the Subhedar, Karkun and other military officers informing them that Inam of twelve Wadis including Mhaswad is conferred on Nagoji Mane and that they should take precautions for not causing disturbances to the said villages.

---

* येथून अक्षर निराळे.

छत्रपतींकडून नागोजी माने यास म्हसवडसहीत बारा वाड्या इनाम

रा. श. ३३ सर्वजित वैशाख व. १३ रविलाखर	क्र. १०२	श. १६२९, वैशाख व. १३ इ. १७०७, मे १८

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३३ सर्वजित्सवंत्सरे वैशाख बहुल त्रयोदशी रविवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणी मोकदमानी व सेटे माहाजनानी कसबे म्हैसवड यासी आज्ञा केली ऐसी जे राजश्री नागोजी बिन रताजी माने यांणी कैलासवासी राजश्री स्वामीची सेवा बहुतच निष्ठेने केली हाली स्वामीच्या पायासी निष्ठा धरून वर्तणुक करितात ऐसीयास कैलासवासी स्वामीनी यांस कृपाळू होऊन का मजकूर देखील बारा वाड्या कुलबाब कुलकानू इनाम दिल्हा आहे तेणे प्रमाणे स्वामीनी करार करून पूर्वी पत्रे दिल्ही आहेत प्रस्तुत हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्ही का मजकूर दा॰ बारा वाड्या नागोजी माने यांस वंशपरंपरेने इनाम चालवणे जाणीजे तेथील ऐवज यांस पाठवीत जाणे जाणिजे *लेखनालंकार

श्री शि
व नरपति
हर्ष निधान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री
आई आदिपुरुष
श्रीराजा शिवछत्रप
ति स्वामि कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

मर्या
देयं विरा
जते

सुर सुद बार

An order by Chhatrapati Shivaji II that Inam of village Mhaswad and twelve Wadis which was bestowed on Nagoji Mane is confirmed.

---

*येथून अक्षर निराळे.

म्हसवडसहीत बारा वाड्या नागोजी माने यास इनाम दिल्याबाबतचे आज्ञापत्र

रा. श. ३३ सर्वजित्
वैशाख व. १३ रविलाखर

क्र. १०३

श. १६२९, वैशाख व. १३
इ. १७०७, मे १८

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३३ सर्वजित्संवत्सरे वैशाख बहुल त्रयोदसी रविवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती यांणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत माण यासी आज्ञा केली अैसीजे राजश्री

श्रीशि
व नरपति
हर्ष निधान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री
आई आदिपुरुष
श्रीराजा शिवछत्रप
तिस्वामि कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

नागोजी बिन रताजी माने यांणी कैलासवासी राजश्री स्वामीची सेवा बहुतच केली हाली स्वामीचे पायांची निष्ठा वर्तताता ऐसीयास कैलासवासी स्वामीनी त्यास कृपाळू होऊन कसबा म्हसवड येथील बारा वाड्या कुलबाब कुलकानु इनाम दिल्हा आहे तेणे प्रा॰ स्वामीनी करार करुन पूर्वी पत्रे दिल्ही आहेत प्रस्तुत हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्ही का॰ मजकूर दा॰ बारा वाड्या नागोजी माने यांस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे जाणिजे *लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

सुरु सुद बार

An order from Chhatrapati Shivaji II to the Deshadhikari (District Officer) Prant Man that Inam of village Mhaswad and twelve Wadis, which was already granted to Nagoji Mane, has been confirmed to him in perpetuity.

---

* येथून अक्षर निराळे.

नागोजी माने यास म्हसवडसहीत बारा वाड्या इनाम दिल्याचे आज्ञापत्र

रा. श. ३३ सर्वजित्
ज्येष्ठ शु. २ भृगु

क्र. १०४

श. १६२९, ज्येष्ठ शु. २
इ. १७०७, मे २३

श्री

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके ३३ सर्वजितसंवत्सरे जेष्ट शुध द्विति (या) भृगुवासरे क्षत्रीये कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती यांणी (. . . . फाटले आहे) (देशमुख) व देशकुलकर्णी का। म्हसवड यासी आज्ञा केली यैसीजे कसबे मा।र देखील बारा वाड्या राजश्री नागोजी माने यास इनाम दिल्हा आहे त्याप्रमाणे करार आहे तरी तुम्ही हे जाणून का। मा।र मशारनिलेस इनाम चालवणे जाणिजे. *लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरु निवीस

सुरु सुद बार

An order from Chhatrapati Shivaji II to the Deshmukh and Deshkulkarni of Mhaswad informing that Inam of twelve Wadis including Mhaswad has been conferred on Nagoji Mane.

---

* येथून अक्षर निराळे.

शिवकालीन कागदपत्रे

विभाग ३

पाटण येथील सरदार पाटणकर घराण्याची कागदपत्रे

(लेखांक क्र. १०५ ते १२५)

यशवंतराव पाटणकर यास वीरमरण आल्यावर त्यांच्या आप्तांचे शिवाजीमहाराजांकडून सांत्वन

रा. श. ४ पिंगल माघ शु. द्वादशी } क्र. १०५ { श. १५९९, माघ शु. १२ इ. १६७८, जानेवारी २४

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ४ पिंगल नाम संवत्सरे माघ शुद्ध द्वादशी गुरुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्रीराजा शिव छत्रपति याणी बालाजीराऊ व चांदजीराऊ पा पाटण यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही पत्र पाटविले ते पावले कितेक

श्री
शिवचर
णी तत्पर त्र्य
बक सुत मो
रेश्वर

आपले वर्तमान ता जे लिहिले ते कलो आले ऐसियास तुम्ही मानाचे धणी वतनी लोक आहा. तुम्हावरी स्वामीची कृपा आहे. झगडीयात येसवंतराऊ पडला तरी त्याची आयुष्य मर्यादाच वितकी त्यास काय करावे तुम्ही त्याचे मुलांचा समाचार घेत जाणे त्यांचे जित्रब[1] त्याचे मुलास करार करुन पूर्वीचे पत्रे पाठविली आहे ती व रा अनाजी पंतापासी[2] असतील समाचार घेउन त्याप्रमाणे चालवणे आपले समाधान असो देणे येविशी रा आनाजीपंतास पत्र लिहिले असे *लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

While offering condolences to Balajirao and Chandjirao Patankar on the death of Yashwantrao Patankar in the battle, Chhatrapati Shivaji asks them to look after his children. Anaji Dattu

---

[1] जित्रब=घोडी वगैरे जनावरे.
[2] अण्णाजी दत्तो सुरनीस.
* येथून अक्षर निराळे.

जावळी प्रांतातील दंगेखोरांचे पारिपत्य करण्यासाठी छत्रपतींचा नागोजीराव पाटणकर यांस आदेश

रा. भि. १६ शुक्ल आश्विन श. ११ | क्र. १०६ | श. १६११, आश्विन शु. ११ इ. १६८९, सप्टेंबर १५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १६ शुक्लनाम संवत्सरे आस्वीन शुध येकादशी मदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति यांणि राजश्री नागोजीराऊ

श्री राजाराम न रपति हर्ष निधान मो रेश्वरसुत नीळकं ठ मुख्य प्रधान

श्री लक्ष्मी नृहरि प्रीति मुद्रा नीराजि जन्मन: ।। राजा राम प्रतिनिधे प्रल्हादस्य विराजते

पाटणकर यांसि आज्ञा केली ऐसीजे जाऊली प्रातीचे लोक फिसाहतीस[१] मिळोन चंदरराऊ यासि पारास होउनू येऊन हरामखोरी माडिली आहे दरेकर व मालसरे व नऱ्हे आदीकरुन वरकड त्याला मिलाले आहेत यैसियासि स्वामिनें या लोकांचे बहुत रवेशीने[२] चालविले कैलासवासी स्वामीनें नावारुपास आणिले आणि सांप्रत यैसे ढंगावरी आले आहेत त्यांचे काय बरे होऊ पाहाते आपले केले पावतील जे स्वामीचे पायासि दुर्बुधीने राहू करितील त्याचे अणुमात्र बरें होणार नाही त्या मजुरांचा काय हिसाब आहे या उपरी त्याला मारुन काढावे गर्देस[३] मेलऊन नाहीसेच करावे लागतात याकरितां जमेतीनसी राजश्री धनाजी जाधव सेनापंचसहश्री यासि त्या प्रांते रवाना केले आहेत व या बराबरी आणिखीही जमेत सरदार दिल्हे आहेत त्या प्रांते जाऊन गनिमास फिसाहतखोरीस घालितील त्यास ते जागा हशमाचा मान आहे या कार्यास हशमाचाही पोख्ता जमाव असिला पाहिजे यैशास तुम्ही त्या प्रांते हशमाचा जमाव करुन स्वारी सिकारी करवीत आहा हरामखोरांस नतिजा पावउनू जमाव बरा पोख्ता राखिला आहे म्हणून तुम्ही हुजूर लिहिले होते त्यावरुन स्वामीनें बहुत संतोशी होऊन भरवसा मानिला की तुम्हासारिखे लोक त्या प्रांते असता स्वामीकार्य होऊन यावया काये अशक्य आहे जमाव राखोन जैसी कस्त करायाची तैसी केली यावरुन स्वामीस बहुतच मजुरा जाला तरी ये गोस्टीचे अपूर्व काये आहे तुम्ही लोक तैसेच आहा हाली हा गनिम

---

[१] फिसाहत = दंगा.

[२] रवेशी = चाल, रीत.

[३] गर्देस मिळविणे = धुळीस मिळविणे, नायनाट करणे.

मारुन काढावा आणि तो प्रांत मोकला करावा याहून आणिक काये विशेष आहे जाऊली प्रांत मोकला केल्याने बहुतच मामला अनकूल होतो तरी हे गोष्ट ढाल ढकलीवरी घातल्यानें दिवसेंदिवस बहुतच मामला अबास (?) होतो हे तुम्ही शाहणे लोक जाणतच आहा याकरितां ही गोष्ट जरुरच जाणून जो तुम्हाकडील जमाव हशमाचा असेल तो कुल सारा राजश्री धनाजी जाधव यां बराबरी देणे हिरोजी पदाती पंचसहश्री यासि स्वामिनें आज्ञापत्र पाठविले आहे तुम्ही त्यांचा दिलासा करुन त्या बराबरी लोकांचा जमाव देउनू मारनइले बराबरी देउनू रवाना आणि जाउली प्रांते जाऊन गनिमास नतिजा पाववीत ते करणे तुम्ही पाठीवरी मदत व कुमक करायाची तैसी करुन मामला अनुकूल होये ते करणें तुम्हाकरिता स्वामीने हे बाबे निश्चिती मानिली आहे हे राज्य श्रीच्या वरदांचे आहे यांचे कोण्हाच्यानें अनिष्ट होवतच नाही जे हरामखोरीच्या दंगास लागले आहेत त्याचा नाश होतच आहे यास संदेह नाही तुम्हा लोकी या प्रसंगी कस्त करुन गनीम नस्तनाबूद करावा आणि मामला सुरलित होये ते करावें स्वामिजवली मजुरा करुन घ्यावा हे उचित आहे तुम्ही आज्ञिवरी जे खटपट करायाची ते करीतच आहा व पुढेंही स्वामीचे आज्ञेप्रा वर्तंचा अंतर पडो द्याना हा भरवसाच आहे तथाप स्वामीनेंही खावऊन लिंहिले आहे हे वहुता कार्यात नाजुक काम समजोन आधी आधी मारनिलेबराबरी जमावानसी हिरोजी भालेखोर यास देउनू रवाना करणे तो गनीम मारुन काढिला म्हणजे स्वामी तुम्हावरी बहुत संतोशी होतील हे जाणून जमाव रवाना कराया दिरंग न लावणे या उपरी जमाव रवाना केला यैसेच उतर आज्ञापत्राचे पाठउनू देणे जाणिजे *लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरु
निवीस

सुरु सुद

†लेखन
सीमा समु
ल्लसति

An order from Chhatrapati Rajaram to Nagojirao Patankar to help Senapati Dhanaji Jadhav in driving out the Mughals and the Maratha Commanders, who joined them, from Prant Javali. Rajaram mentions how Maratha Commanders who were helped by Chhatrapati Shivaji to gain the present status have become traitors and went over to the Mughals.

---

* येथून अक्षर निराळे.

† जोडावरील शिक्का.

पाटणकर बंधूना छत्रपती लिहितात, 'राज्याची पोटतिडीक तुम्हां लोकांस आहे'

रा. भि. १६ शुक्ल आश्विन व. ११ | क्र. १०७ | श. १६११, आश्विन व. ११ इ. १६८९, सप्टेंबर २९

श्री

स्वस्ती श्री राज्याभिषेक शक १६ शुक्लनाम संवत्सरे अस्विन बहुल येकादसी रविवासर क्षत्रिये कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजश्री नागोजीराऊ पाटणकर व चादजीराऊ पाटणकर सेनासहश्री लस्कर यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामी सुमुहूर्ते करुन स्वार होउनू स्वारीस गेले पासी यास कितेक हराम-खोरास नतीजा द्यावयास

श्री राजाराम न
रपति हर्ष निधान मो
रेश्वर सुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

या प्रांतीचा कारबाराचा मखतीयार[१] राजश्री रामचंद्र पंडित सचिव यावरी देउनू ठेविले असती यैसियास स्वामी कार्याविशई तुम्हास लिहितील व सागतील त्याणे प्रमाण वर्तणूक करीत जाणे तुम्ही स्वामीचे पुरातन सेवक असा व या राज्याची पोटतिडीक[२] तुम्हा लोकास आहे जे गोस्टीने राज्य संरक्षण होये तोच पदार्थ करणे म्हणजे स्वामी तुम्हावरी बहुत संतोषी होतील हे पूर्ण समजोन मनामध्ये अ[...] सारखी गोष्ट काही न आणिता वर्तणूक (करून)[३] मजुरा[४] करुन घेणे जाणिजे *लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरु
निवीस

सुरु सूद

While leaving on expedition against the Mughals Chhatrapati Rajaram informs Nagojirao and Chandjirao Patankar that Ramchandra Pandit Sachiv is entrusted with the management of the Province for punishing the traitors and that they being patriots should obey his (Ramchandra Pandit Sachiv's) orders for the cause of protecting the Kingdom.

---

[१] मख्तयार = मुखत्यारी, जबाबदारी.

[२] पोटतिडीक = कळकळ, आस्था.

[३] येथे षटकोनी बहुदळी शिक्का असल्याने अक्षरे दिसत नाही.

[४] मजुरा = मान्यता, दखल.

* येथून अक्षर निराळे.

पाटणकरांच्या मर्दुमकीवर छत्रपति राजाराम संतुष्ट

स. श. १६ शुक्ल आस्वीन शुध नवमी	क्र. १०८	श. १६११, आश्विन शु. ९ इ. १६८९, ऑक्टोबर १३

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १६ शुक्ल नाम संवत्सरे आस्वीन शुध नवमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती यांणी राजश्री नागोजी राऊ पाटणकर व राजश्री चांदजीराऊ पाटणकर यांसी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते छ २ जिल्हेजी प्रविष्ट जाले या प्रांते तमाम लोक फितरतीस[१] मिलाले होते त्यास सेवक जमावानसी ताहसोलस पर्यंत जाऊन स्वारी करुन फितरतीखोरास सजा पावविला त्यावरुन बेल खुद राहिले आहेत पार पावता मार्ग चालतात जमाव देसमुख वतनदारी लोक आहे यांसी समाधान पत्र पाठविली पाहीजेत आम्ही तरी सेवेस येकनिष्टच आहो कोण्हे विषई अंतर पडणार नाही म्हणोन लिहिले ते सविस्तर कलो आले तुम्ही हुशार खबरदार राहुनू फिसाहतखोरास कोटगा देऊन मार्ग मामला अनुकुल चालता केला यावरुन स्वामी तुम्हावरी संतोशी जाले तरी तुम्ही मर्दाने लोक तैसेच आह्मा तुमचे भरवसेच आहेत हे मऱ्हाठे राज्य तुम्ही आम्ही मऱ्हाटे लोकी इमानासी खता[२] न करीता मऱ्हाठेधर्माची इरे[३] धरुन स्वामी कार्य करावे यैसे इकडून तुम्हा लोकांचे उर्जितच आहे तुम्हा लोकाचे चालवणे हे स्वामीस आवश्यकच आहे याकरीता पुढेंहि बहुत चौकसपणे राहुनू कोण्ही फितये फांदडी-यासी मिलतील त्यांला बलऊन दटवणे हेलवाक[४] व ताहासोलसीकराची[५] विनंतीपत्रे पाठविली येकनिष्टपणे आहेत म्हणून लिहिले ते कलो आले त्यांला समाधानपत्रे पाठविली आहेत म्हणून येकनिष्टपणें राहणी केलीया त्यांचे

श्री राजाराम न रपति हर्ष निधान मो रेश्वर सुत नीळकं ठ मुख्य प्रधान	श्री लक्ष्मी नृहरि प्रीति मुद्रा नीराजि जन्मनः ॥ राजा राम प्रतिनिधेः प्रल्हादस्य विराजते

---

[१] फितरत = दंगा, फितुरी.

[२] खता = लबाडी.

[३] इरे = ईर्षा.

[४] हेलवाक–तालुका पाटण, जिल्हा सातारा.

[५] सोळसी–तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा.

उर्जितच होईल तुम्ही गनिमाची याद धरुन चौकस राहणे वरकड तुम्ही इमानी इतबारी स्वामीचे पायासी अनसारिखी वर्तणुक होऊन येणार नाही येविषई स्वामीचा ब्रु निशा आहे व तुम्हा लोकांचे स्वामीने भरवसे मोजिले आहेत आपले हरबाब दिलासे राखोन स्वामीचे पायासी येकनिष्टपणे वर्तोन स्वामीकार्यी तत्पर असणे म्हणजे उर्जित होईल व चांदजीराऊ तुम्हाला स्वामीने हुजूर यावयाची आज्ञा करुन पत्र पेशजीच सादर केले आहे त्यास तुम्ही अद्याप वरी आलेस नाही दिरंग लाविला आहे यैसी गोष्ट न करणे तुम्ही लोक स्वामी-संनिध असोन याप्रसंगी स्वामीकार्य करुन दाखवावे आणि मजुरा करुन घ्यावा यैसे आहे तरी याउपरी दिरंग न लाविता स्वार होऊन येणे म्हणजे स्वामी संतोशी होतील तुमची ब्रेगसी जे करावयेची ते करुन देतील. जाणिजे *लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरु निवीस

Chhatrapati Rajaram became pleased with the valour and powers exhibited by Patankar Brothers in putting down the Mughal and asked Chandjirao to see the Chhatrapati at once.

---

* येथून अक्षर निराळे.

विजापूरावर चालून जाण्याचा चांदजीरावांना आदेश

रा. भि. १६ प्रमोदनाम संवत्सर अ. वैशाख शु. १५	क्र. १०९	श. १६१२, अ. वैशाख शु. १५ इ. १६९०, एप्रिल १३

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषक शके १६ प्रमोदनाम संवत्सरे अधिक वैशाख सुध पूर्णिमा रविवासर क्षेत्रिय कुलावतस श्री राजाराम छत्रपती याणी राजेश्री चादजी पाटणकर सेना पच सहस्री यासी आज्ञा केली यैसीजे स्वामी कर्नाटक प्रांते आलीया उपरी मागे तुम्ही त्या प्राते राहोन रा सताजी घोरपडे व रा धनाजी जाधव उभयता पंचसहस्री या समागमे स्वारी सिकारी करुन स्वामी कार्ये केले हे वर्तमान स्वामीस श्रुत जाले त्यावरुन तुमचा बहुतच मजुरा जाहला पुढही येच रीतीने स्वामी कार्ये करुन तुम्हावरी स्वामी संतोसी होत यैसी वर्तणूक करणे प्रस्तुत स्वामी कर्नाटक प्रांते आले याकरिता अवरंगशाहा त्या प्रातीहून निघोन विज्यापुरास आला कुल फौजा इकडे रवाना केल्या आपणही येत होता तो च्यार दिवस टिकोन राहिला परंतु त्याचा मामला पाहता बहुत नह..... न आहे जमाव थोडका आहे यैशा प्रसगी रा सताजी घोरपडे व रा धनाजी जाधव व तुम्ही आवघे सरदार मिळोन पोखता जमावाने विज्यापुरावरी जावे देश मारुन तलफ[1] करावा फावल्या प्रसगी शाहरावरीही छापा घालावा अवरंगशाहास दहशत लावावी यैसा प्रसग आहे याकरिता रा संताजी घोरपडे व रा धनाजी जाधव या उभयेतास पत्रे पाठविली आहेत तेणेप्रमाणे ते जमावानसी विज्यापूर प्रांते स्वारीस जातील तुम्हीही त्या बरावरी आपल्या जमावाने जाणे आणि त्या उभयताच्या मते स्वारी सिकारी करुन गनिमास दहशत लाऊन काबूत सापडलिया मारुन गर्देस मेलवणे कुल लस्कर येकवट होऊन खासा विज्यापुरावरीच छापा घालून औरंगशाहा नेस्तनाबूद होयेस करणे अणिक संतोश वार्ता स्वामीस लेहून पाठवणे इकडे स्वामीचे राज्याच..... खासा मनुश्य साहा सात हजार घोडा व वीस हजार हशम इतकियाचा खावंद याला आपले करुन घेऊन ते व रा शाहाजीराऊ याकडील चार पाच हजार घोडा तैसाच आपल्याकडील जमाव व सिलेदार सात आठ हजार आहे इतकियाची फौजा तियावरी पाठविली आहे आणखीही जमाव येतच आहे थोडिकिया दिवसात इकडील गनीम मारुन नाहीसा करुन स्वामी तिकडे येतील तुम्ही शर्तीनसी मर्दानगी करुन

[1] तलफ = उध्वस्त, बेचीराख, ओसाड.

विज्यापुरा भोवताल्या धिर(य्या) खेलोन औरंग(शाहास) सिकिजा[१] करुन तिकडेच गर्सोन पडे ते करणे या प्रसगी स्वामीने तुम्हा लोकाचे भरोसे धरले आहेत तर लिहिल्या प्रमाणे वर्तायास अंतर पडो न देणे *बहुत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

सुरु सूद

पा॰ छ ११ रमजान
सुा इहिदे तिसैन

While congratulating Chandjirao Patankar for his valour in opposing and harrasing the Mughal forces, Chhatrapati Rajaram orders him to march on Bijapur along with Santaji and Dhanaji and inflict a crushing defeat on Aurangzib, who was halting there and who had despatched his forces to Karnatak against the Chhatrapati.

---

[१] सिकिजा = पेच, संकट.

* येथून अक्षर निराळे.

पाटणकरबंधूना बारा गावे इनाम मिळतात

सु. इहिदे तिसैन अलफ छ १२ मोहरम } क्र. ११० { श. १६१२, आश्विन शु. १२ इ. १६९०, आक्टोबर ५

श्री

राजश्री नागोजीराऊ पाटणकर व राजश्री चादुजीराऊ पाटणकर गोसावी यासी

ॡअखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ना। प्रल्हाद निराजी प्रतिनिधी आसीर्वाद सुा ईहिदे तिसैन अलफ तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लिहिले वर्तमान विदीत जाले लिहिले की राजश्री स्वामी त्या प्रांतास गेलीयावरी कितेक ताम्राचे सरदार बुडविले ते काली बहुत काही स्वामी कार्ये केली व पुढेही अंतर पडणार नाही म्हणून विस्तारे लिा तरी तुम्ही नामाकीत घराणेदार तुम्हापासून स्वामी कार्य न व्हे तेव्हा कोणापासून होवे तुम्ही मर्दाने स्वामी कार्याचे आहा राजश्री स्वामी प्रति तुमचा मजुरा आहे ये विषयी आपुले समाधान असो देणे व लिहिले की रा रामचंद्रपंती आपणास बारा गाव इनाम करुन दिल्ही आहे त्याची सनद पाठवणे व आज्ञा करणे म्हणून लिा तरी तुम्हास इनाम तेही स्वामी कार्या निमत्य दिल्हे ते उत्तम केले सदरहू इनामाची सनद तेही दिल्ही ते आमचीच सनद आहे ऐसे जाणून इनाम अनभऊन सुखरुप राहणे आणि गनिम मारुन गर्देस मेलवणे व लिहिले की आपले हजार होनाची सनद पाठविजे म्हणून तरी *राजश्री पंती जे सरजामी केली ते आम्हीच केळी त्या प्रांते त्यावरी मदार आहे येथून सनद पाठवणे न लगे छ १२ मोहरम बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा

श्री लक्ष्मी
नृहरि प्रीति
मुद्रा नीराजि
जन्मनः राजा.
राम प्रतिनिधि,
प्रल्हादस्य
विराजते

लेख
ना वधि
ब्मति

Nagoji Rao and Chandjirao Patankar are informed by Pralhad Niraji that in recognition of their loyal services rendered to the Chhatrapati, twelve villages are given in Inam to them through Pant Pratinidhi.

---

* येथून अक्षर निराळे.

चांदजीरावांना स्वामीकार्याबद्दल छत्रपतींकडून हत्ती बक्षीस

सु. सन इसने तिसेन व अलफ छ ६ रबिलावल	क्र. १११	श. १६१३, मार्गशीर्ष शु. ७ इ. १६९१, नोव्हेंबर १७

श्री

राजश्री चादजी पाटणकर सेनापंचसहश्री
गोसावी यास

ॐ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.] श्नेाा रामचंद्र नीलकंठ आसिर्वाद सुाा सन इसने तिसेन व अलफ तुम्हा जवली हतीण निगेस ठेविली होती ते सिद्यास देणे म्हणून लिहिले होते त्यास तुम्ही लिहिले की हती स्वामिने आम्हास दिल्हा आहे तो बकसीस म्हणून सनद पाठवावी म्हणजे हतीण देऊन म्हणून त्यावरुन तुम्ही स्वामी कार्यावरी बहुत येकनिष्टपणे कष्ट मेहनत केली या करिता तो हती तुम्हास बकसीस दिल्हा आहे घेणे आण हतीण सिद्यास देविली आहे ते देणे जाणीजे छ ६ रबिलोवल *बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा

लेखन
सीमा समु
ल्लसती

Ramchandra Nilkanth informs Chandji Patankar that an elephant given to him by Chhatrapati is a reward for his loyalty. He should return the she-elephant to Shinde or Sidi?

---

* येथून अक्षर निराळे.

रामराव पाटणकर यांस पागेची पंचसहस्त्री

रा. श. १९ अंगिरा
भाद्रपद शु. पंचमी

क्र. ११२

श. १६१४, भाद्रपद शु. ५
इ. १६९२, सप्टेंबर ५

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक १९ अंगिरानाम संवत्सरे भाद्रपद श्रुध पंचमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी समस्त राजकार्य धुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित आमात्य यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री चादजी पाटणकर सेनापंचसहश्री यानी हुजूर सरजाम बाबे लिहिले होते की रामराव पाटणकर यास सिलेदारांची पंचसहश्री आहे त्यास पागेचे पंचसहश्रीची सनद करुन पाठविली पाहिजे त्यावरुन तुम्हास पत्र लिहिले आहे ते सिलेदारीची घोडी रामराव पागेस देतील तरी घेऊन पंचसहश्री . . . . सदरहु प्रमाणे पागेस घोडी . . . . रामराव याच्या पथकात खटपटे मनुश . . . . पाहिजे यास जिवाजी गंगाधर त्या प्रा उमेदवार आहे स्वामीकार्याचे खटपटे मनुश त्याची आसामी सभासदत घाळून खटपुटेस दिल्हे पाहिजे म्हणून रा चादजी पाटणकर यानी लिहिले होते ऐशास तुम्ही रामराव यास पागेची पंचसहश्री दिधली म्हणजे जिवाजी गंगाधर याची आसामी सभासदत घाळून वतन सालिना ७०० सातसे करुन मानीलेचे पंचसहश्रीची खटपट सागोन स्वामी सेवा घेत जाणे जाणीजे *बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

Chhatrapati Rajaram orders Ramchandrapant Amatya to comply with a request of Chandji Patankar that Ramrao Patankar be given Saranjam of 5,000 horse.

* येथून अक्षर निराळे.

धनाजी जाधवांबरोबर जिंजीस येण्याचा चांदजी पाटणकर यांना आदेश

रा. श. १९ अंगिरा कार्तिक बहुल चतुर्दशि } क्र. ११३ { श. १६१४, कार्तिक व. १४ इ. १६९२, नोव्हेंबर २६

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवत्सरे कार्तिक बहुल चतुर्दशि मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणी राजमान्य राजश्री चादजी पाटणकर सेनापंचसहश्री यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री संताजी घोरपडे सेनापती फौजेनसी चंदीस येत आहेत तुगभद्रा तीरास आले त्या बराबरी तुम्हीही आपल्या जमावानसी येत आहा म्हणोन हे वर्तमान राजश्री सेनापती याणी व राजश्री विठल नीलकंठ याणी लिहिले त्या वरुन स्वामी बहुत संतोषी जाले राजश्री धनाजी जाधवराऊ तरी फौजेनसी कोल्हर प्रांतास आले या उपरी सात पांच रोजात चंजीस दाखल होतील तुम्ही इतक्या दिवसात तुगभद्रानदी उतरले असाल या उपरी सेनापतीस स्वामीने आज्ञा पेत्र पाठविले आहे तरी तुम्ही मात्रिले समाग्रमे आपल्या जमावानसी बहुत सिताब स्वार घेऊन लाब लाब मजली करुन स्वामी सनिध येणे तुमचे स्वामीचे भेटीत ते सकल अभिस्ट सिधीस पावतील *बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

Chhatrapati Rajaram was pleased to learn from Santaji Ghorpade and Vithal Nilkanth that Chandji Patankar was proceeding towards Jinji. Chandji was asked to join Dhanaji Jadhav, who had come in the Kolhar province and who would be reaching Jinji soon.

---

*येथून अक्षर निराळे.

पदाजीराव पाटणकर यांना पांचहजारी स्वारांचा सरंजाम

रा. श. १९ अंगिरा फाल्गुन सुध अष्ठमी	क्र. ११४	श. १६१४, फाल्गन शु. ८ इ. १६९३, मार्च ५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषक १९ अगिरा नाम सवत्सर फाल्गुंण सुध अष्टमी रविवासर क्षेत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छेत्रपति स्वामी याणी राजश्री पदाजीराऊ पाटणकर सेनापंचसहश्री यासी आज्ञा केली ऐसीजे तुमचे पत्री राजेश्री चादजीराऊ पाटणकर सेनापचसहश्री याणी चंदीचे मुकामी स्वामी सनीध येऊन विनती केली ऐसीजे पदाजीराऊ पाटणकर याणी स्वामीच्या पायासी येकनिष्टता धरुन देशामधे स्वामी सेवा येक भावे करीत आहेत तरी यासी पूर्वी सहेश्री आहे त्यासी पागेची पंचसहश्री सागा (व) यासि आज्ञा केली पाहीजे म्हणौन विनति केली त्यावरुन स्वामी (बहुत) कृपाळू होऊनू पागेची पंचसहश्री सागीतली असे पागेचा जमाव करुन राजेश्री चादजीराऊ पाटणकर याचे ताबीन राहून स्वामी सेवा करीत जाणे तुम्हास ऐवज सालीना होन पादशाही २०००

खासा जातीस होन पादशाही चाकर आसामी २४ येकून होनु पा
१६०० १९० भोई १२ यो

२५	नाईक	१ यो
१६५	भोई	११ यो
१९०		
३६	दिवटे	२ यो
२१	अफतागीर	१ यो
२१	जेजदार	१ यो
३६	अफराद	२ यो
३६	माहालदार	२ यो
३६	अडेकरी	२ यो
४००		२४

एकूण व्रतन सालीना होनु पादशाही दोन हजारास केले असेती इा सनद पाा पासून वजा . . . . वजा करुन उरले वेतन घेत जाणे बारगीर घोडे बारदार घ्रडीक प्रमाणे चालवणे ते . . . . पानसुपारी बर्ज पंचसहश्री प्रााचालवणे तुमच्या जमावा माफीक चालवीत जाणे पूर्वील सेवेचे फाजील असेल ते हालीहमी वजा करणे व चाकर हाजीर तेरीखे पासून वतन घेत जाणे *जाणीजे बहुत काये लिहिणे

मर्या
देयं विरा
जते

तेरीख छ ७
रजब सुाा सलास

On recommendation from Chandjirao Patankar, Senapanchasahasri, Chhatrapati Rajaram issues orders granting Saranjam of 5,000 horse to Padajirao Patankar in recognition of his loyal services to the Chhatrapati.

---

*येथून अक्षर निराळे.

सेनापती धनाजी जाधव यांच्या ताबीन राहाण्याचा चांदजीराव पाटणकरांना आदेश

रा. श. १९ श्रीमुख जेस्ट शुध त्रीतिया | क्र. ११५ | श. १६१५, ज्येष्ठ शु. ३ इ. १६९३, मे २८

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक १९ श्रीमुख नाम संवत्सरे जेस्ट शुध त्रीतीया मंदवासर क्षेत्रीये कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी राजमान्य राजश्री चांदजीराऊ पाटणकर यासी आज्ञा केली ऐसीजे सताजी घोरपडे याणी व बहिरजी घोरपडे याणी स्वामीच्या पायासी अनवरखी वर्तणूक केली याकरिता व बहिरजी घोरपडे यास राज्यातून बाहेर घातले सताजीचे सेनापतीपण दूर करुन राजश्री धनाजी जाधवराऊ यासी सेनापतीपण सांगितले आहे[1] तरी तुम्ही रा धनाजी जाधवराऊ सेनापति याचे ताबीन राहोन स्वामी कार्य करीत जाणे त्या वातीच्या राज्याचा कस्ती फार राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यावरी आहे ते आज्ञा करीत जातील तैसी वर्तणुक करीत जाणे बहुत लिहीणे तरी तुम्ही सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

An order from Chhatrapati Rajaram to Chandjirao Patankar asking him to join Dhanaji Jadhav who is made Senapati by removing Santaji Ghorpade from that post and banishing his brother Bahirji Ghorpade due to their misbehaviour.

[1] '(शके १६१५ श्रीमुख संवछरे) वैशाख मासी संताजी घोरपडे राजारामासीह्री बिघाड करून देशास गेले त्यावरी धनाजीस नामजाद केले.' जेधे शकावली, शि.च.प्र., पृ. ३७.

चांदजी पाटणकरांस पाटण महालांतील चौतीस गावे इनाम व मोकासे

सु. सन आर्बा तिसेन व अलफ, छ १ सफर } क्र. ११६ { श. १६१५, आश्विन शु. ३ इ. १६९३, सप्टेंबर २२

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री त्र्यंबक कृष्ण
नामजाद सुा व्याघ्रगड[1] गोसावी यांस

सेवक रामचंद्र नीलकंठ[2] नमस्कार सुहूर सन आर्बा तिसेन अलफ पाटण माहालेचे देह देखील कसबा ५७ पैकी मुकासे दिल्हे आहेत ते करार वि ता २३

किले हाये	राजश्री पंत अमात्य मौजे त्रिपुडी
११ किले सुंदरगड[3]	१
१ मौजे मारूल[4]	लस्कर
१ मौजे कसाटी (?)	१ माधवराऊ ....
१ कराटे	१ संताजे जाधव कुसवड
१ कारवट [कारवत]	१ कमोजी अनंत नहींबे
१ कातवडी	——
१ खेउसी [खिवशी]	३
१ बेदरी	का गांव
१ वाटोले[ळे]	१ हिरोजी भालेघरे आंबेघर
१ वठार (?)	१ सुभाकडे आरल [अरळ]
१ सीरल	१ हुजूर खासगीकडे जिवखणे [निवकणे]
१ काळोली [कालोली]	
——	——
११	३

[1] व्याघ्रगड (वासोटा)—हल्ली जावळी तालुक्यात (जिल्हा सातारा).
[2] रामचंद्र नीळकंठ पंत अमात्य (बावडेकर).
[3] सुंदरगड ऊर्फ हातगड—पाटणचे वायव्येस तीन मैलावर.
[4] लेखांकात निर्देशिलेली बहुतेक गावे हल्ली सातारा जिल्ह्यात पाटण तालुक्यातच आहेत. हल्लीच्या पाटण तालुक्याबाहेरच्या गावांचा स्थलनिर्देश तळटीपांत केला आहे.

४ किले गुणवंतगड[१]
१ मोरगीर [मोरगिरी]
१ झाकडे
१ लेडोरी
१ गुंजाली[ळी] लंग

४

१ किले वसुंतगड[२] मौजे पोतले[३]

१६

एकूण वजा देहे तेवीस बाकी देहे राजश्री छत्रपती स्वामीने रा चांदजी पाटणकर याकडे देविले त्यावरुन मुकासे ज्याकडे होते ते दूर करुन याकडे देविले बि ता।

पेशजीच चांदजीराऊ याकडे मुकासे व इनाम आहेत	हाली लोकाकडे मुकासे होते ते दूर करुन दिल्हे
१२ मुकासे	५ हणमतराऊ पाटणकर याकडे होते
१ सुरल [सुरुळ]	
१ आंबवणे	१ काटी
१ घाणवी [घाणबी]	१ वाजोले [वाझोली]
१ गोजेगाऊ [गोजेगाव]	१ तावकड [तामकडे]
१ बांजे	१ देवघर
१ दसदुण [दस्तन]	१ बेलवडे बु॥
१ गाढवखोप	
१ आबुरले (?)	५
१ चिटेघर	या खेरीज वाजेगावीची वाडी
१ नाणेल[ळ]	१ रामोजी इंगले चिखली
१ चिरंबे	१ शंकरराऊ दिवसी [दिवशी]
१ कसबा पाटण	१ कटाजी काटे गोष्टवाडी [गोष्टवाडी]
१२	१ बेलवडी खुर्द आंबरोजी सेडग्याकडे होते

[१] गुणवंतगड ऊर्फ मोरगीर–पाटणच्या नै. सहा मैलावर.
[२] वसंतगड–कऱ्हाडच्या वायव्येस पाच मैल.
[३] पोतले–कऱ्हाड तालुका, जिल्हा सातारा.

११ इनाम
१ साखरी
१ मेडोसी [मेंढोशी]
१ दिवसी खुर्द
१ चाफोली
१ बिभवी[1]
१ माऊसी [मावशी]
१ पिपळोसी
१ ताबकणे [तामकण]
१ केरल[ळ]
१ मणदुरे
१ गोकुल[ळ]
——
११

१ नानपरवेसी[2] हिरोजी राऊ
पाटणकराचा लेक सुभानजी
पाटणकर यास दिल्हे
मुलगाऊ [मुळगांव]
——
२४

१ वाजेगाऊ जुह्यारजी याचा भाऊ
याकडे होते पहिले
——
१०

येणेप्रमाणे चौतीस गांव याचे दुमाला केले असेत तरी तुम्ही सदरहू गांव याकडे देणे *येकीन तुम्ही हजीर करुन मशारनिल्हेकडे आकार खर्च लिहीत जाणे छ १ सफर निदेश समक्ष

लेखन
सीमा समु
ल्लसति

बार सुरु सुद बार

These are the details of fifty-seven villages in Patan Mahal, out of which thirty-four villages were given to Chandji Patankar. Trimbak Krishna, the officer-in-charge of Vyaghragad Subha, is directed to hand over the charge of these villages to Chandji Patankar.

---

[1] बिभवी–तालुका जावळी, जिल्हा सातारा.
[2] नानपरवेशी, नान् प्रवेसी = संगोपन, पालन.
* येथून अक्षर निराळे.

धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांच्यात समेट

रा. श. २१ मुळ वैशाख सुध द्वादशी } क्र. ११७ { श. १६१७, वैशाख शु. १२ इ. १६९४, एप्रिल १७

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २१ मुळनामसंवत्सरे वैशाख सुध द्वादसी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती यांणी राजमान्य राजश्री चांदजी पाटणकर यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही विनतीपत्र पाठविले ते पावले आपण स्वामी सेवेसी येकनिष्ट आहो परंतु इकडील वर्तमान येक प्रकार आहे स्वामीचे मदतीस जावे हा उपदेश बहुता प्रकारे उभयता[१] सरदारास आपण केला त्यास कोण्हाच्या विवेकास येत नाही म्हणून लिहिले ते विदीत जाले. यैशास राजश्री संताजी घोरपडे सेनापती पहिलेपाल्यापावेतो[२] इकडे यावयास आले होते ते माघारे गेले. तैसेच राजश्री जाधवराऊ मोगलाईत भागानगर पावेतो जाऊन फिरोन आले ते उभयता देशास आल्यावरी स्वामीने येथून राजश्री विठल निलकंठ पाठविले होते त्यांच्या यांच्या भेटी जाल्या त्याउपरी राजश्री रामचंद्रजीपंती[३] रा परशरामपंतास[४] सातारीयास पाठविले त्याणी येऊन उभयता सरदारांची येकुयता करुन दिल्ही आणि वैशाख माहा कारणे कर्नाटकात यावे येसा निर्वाह केला आहे हे वर्तमान उभयतानी लिहिले त्यास हाली त्यांस व रा अमात्यपंतास पत्रे पाठविली आहेत की सत्वर फौजा पाठऊन देणे तरी तुम्ही ज्यांचे ताबीन[५] असाल त्यांचे ताबीन राहोन आपल्या जमावानसी त्याजबराबरी स्वामी संनिध येऊन गनीम पराभवाते पाववणें तुम्ही येथे आल्यावरी तुमचे स्वामी बहुत प्रकारे चालवितील *जाणिजे बहुत काये लिहिणे

मर्या
देयं विरा
जते

A letter from Chhatrapati Rajaram saying that Santaji Ghorpade and Dhanaji Jadhav who had grievances against each other were reconciled by Parashurampant Pratinidhi. Chandji Patankar is directed to join one of them to serve the Chhatrapati faithfully.

---

[१] हे 'उभयतः सरदार' म्हणजे संताजी घोरपडे व धनाजी जाधव होत.

[२] पहिलेपाल्यापावेतो–पहिले, पहिल = झपाट्याने, तात्काळ.

[३] रामचंद्रपंत अमात्य.

[४] परशुराम त्रिंबक–प्रतिनिधी घराण्याचे संस्थापक.

[५] ताबीन = ताब्यांत, स्वाधीन, अंकित.

*येथून अक्षर निराळे.

चांदजीराव पाटणकर यांना रहिमतपूर येथे जमीन इनाम

रा. श. २३ धातु आषाढ शुध त्रयोदशी | क्र. ११८ | श. १६१८, आषाढ शु. १३ इ. १६९६, जुलै २

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २३ धातुनाम संवत्सरे आषाढ शुध त्रयोदशी गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रा वाई यासि आज्ञा केली ऐसीजे चांदजीराऊ बिन नागोजीराऊ पाटणकर याणी चंदीचे मुकामी विनंती केली की आपण स्वामीच्या सेवेस्तव कर्नाटक प्रांतास येऊन सेवा करीतो तरी आपणास भूमी काही इनाम देविली पाहिजे म्हणोन विदीत केले त्याजवरुन याजवरी स्वामी कृपाळू होऊन यास नुतन इनाम कसबा रहिमतपूर[1] प्रात मजकूर पैकी जीरात चावर ४ च्यार चावर रास कुलबाब कुल कानु देखील हालीपटी पेस्तर पटी खेरीज हकदार करुन इनाम दिल्हा असे तरी विसा पांडाच्या बिघीयाने भूमी याचे दुमाले करुन यास व याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवणे प्रतीवर्षी नुतन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रत लिहुन घेऊन मुख्य पत्र यास परतोन देणे निदेश समक्ष

श्रीराजाराम
नरपति हर्ष निधान मो
रेश्वर सुत नीलकं
ठ मुख्य प्रधान

श्री लक्ष्मी
नृहरि प्रीति
मुद्रा निराजी
जन्मनः राजारा
म प्रतिनिधेः
प्रल्हादस्य
विराजते

मर्या
देयं विरा
जते

Chandjirao Nagojirao Patankar is given an Inam of land in Rahimatpur in recognition of his loyal services.

---

[1] रहिमतपूर–तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा.

चांदजीराव पाटणकर यांना नाटणें येथे जमीन इनाम

रा. श. २३ धातु
आषाढ शु. १३

क्र. ११९

श. १६१८, आषाढ शु. १३
इ. १६९६, जुलै २

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २३ धातुनाम संवत्सरे आषाढ शुध त्रयोदशी गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपती याणी राजश्री देशाधीकारी

श्री राजारम
नरपति हर्ष निधान मो
रेश्वर सुत नीळकं
ठ मुख्य प्रधान

श्री लक्ष्मी
नृहरि प्रीति
मुद्रा निराजि
जन्मन: राजारा
म प्रतिनिधे:
प्रल्हादस्य
विराजते

व लेखक वर्तमान व भावी प्रांत सातारा यासी आज्ञा केली येसीजे चादजीराऊ बीन नागोजीराऊ पाटणकर याणी चंदीचे मुकामी स्वामी समीप विनती केली की आपण स्वामी सेवेस्तव कर्नाटक प्रातास येऊन सेवा करीत असो तरी आपणास काही भूमी इनाम देविली पाहिजे म्हणोन विदीत केले त्याजवरुन स्वामी याजवरी कृपाळू होऊन यासी नूतन इनाम मौजे नाटणे ता। सातारा प्रा। मजकूर पैकी जिरात चावर २ दोनी रास कुलबाब कुलकानु देखील हाली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार करुन इनाम दिल्हे असे तरी विसा पाडाच्या बिधीयाने भूमी याचे दुमाले करुन यासी व याचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने चालवणे प्रतीवर्षी नूतन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रत लिहून घेऊन मुख्य पत्र यासी परतोन देणे नीदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

Chandjirao Patankar is given an Inam of land in the village Natne, Tarf Satara, in recognition of his loyal services.

चांदजीराव पाटणकर यांना पाटण महालातील जकातीचे हक्क

रा. श. २३ धाता
आषाढ शु. १३

क्र. १२०

श. १६१८, आषाढ शु. १३
इ. १६९६, जुलै २

श्री

[शिक्का] तालिक

स्वती श्री राज्याभिषेक शके २३ धातुनाम संवस्छर आशाढ शुध्ध त्रयोदसी गुरुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजश्री चांदजीराव
[शिक्का] [शिक्का] बिन नागोजीराव
पाटणकर देशमुख पा॥ पाटण यासी दिल्हे इनाम ऐसेजे तुम्ही चंदीचे मुकामी स्वामीसमीप विनंती केली की पाटण माहाल उभा मार्ग जकाती आहेत ते आपणास इनाम देविले पाहिजे म्हणोन विदीत केले त्यावरोन मनास आणिता तुम्ही स्वामीचे वतनी सेवक आत:कर्णापूर्वक स्वामी शेवा आहा तुमचे विशाषात्कार[1] गोमटे करुन चालवणे स्वामीस आगत्य यास्तव स्वामी तुम्हावर कृपाळू होऊन तुम्हास नूतन इनाम पा॥ पाटण माहली उभा मार्ग जकाती आहेत खेरीज हाकदार व घोटेकराज तुम्हास इनाम आजरामरामत करुन दिल्हा आसे तुम्ही आपले स्वांधीन करुन घेऊन जकातीची कामावीस करुन हासील जो येईल तो तुम्ही तुमचे पुत्र पौत्रादी वौंशपरंपरेन आनभऊन सुखी आसणे निदेश समक्ष मोर्तब

रुजु
माहे जिल्हेज

तेरीख छ १६
जिल्हेज सुा सबा
तिसैन अलफ

बार सूद सुरु सूद बार

Chhatrapati Rajaram bestows the rights of octroi collection in Pargana Patan upon Chandjirao Nagojirao Patankar in recognition of services rendered by him.

[1] विशेषात्कार = मुख्यत्वे करून.

पदाजीराव व चांदजीराव यांच्यामधील देशमुखी वतनाबाबत तंटा

सु. सन सबा तिसैन अलफ ताा छ १९ जमादिलावल } **क्र. १२१** { **श. १६१८, मार्गशोर्ष व. ७ इ. १६९६, डिसेंबर ५**

श्री

राजेश्री पंत आमात्ये
स्वामीचे सेवेसी

सेवक त्र्यंबक कृष्ण सरसुभेदार प्रांत व्याघ्रगड[1] साा नमस्कार विनती सुाा सन सबा तिसैन अलफ ताा छ १९ जमादिलोवल बाा रा चादजीराऊ पाटणकर व राा पदाजीराऊ पाटणकर हे भाऊ भाऊ आपले वृती देसमुखी प्राा पाटण याविशई भाडीताती तरी याचा याचा निवाडा पहिलेच होऊन गेला आहे यानी आपले कुल स्वामी श्री देव तेथे जाऊन तेथे क्रिया देवाची केली आहे तेथे जाऊन जेव्हडे भाऊ वर्तमान त्याची संतती होती त्याचे तकसीम करुन राा पदाजी रायासी त्रिसरी तकसीम देविली आहे निवाडा होऊन निवाड पत्र आहे ते स्वामी कृपाळु होऊन त्या प्रमाणे विल्हे लावावी यावर स्वामी धणी मायेबाप आहेती निवाडा जाहाला असता राा पदाजीराऊ सत्य सोडून अपले कुलस्वामीची क्रीया टाकून नसता कथल्या करून मुलुक मारावा रयेती खराब करावी बदला (?) व्हावी ऐसा अर्थ आहे दोघानीही जे क्रीया केली आहे निवाडपत्र जाहले आहे त्याप्रमाणे वर्तीबे ऐसा अर्थ आहे राा पदाजीराऊ यानी सुदरगडीचे हवालदाराची पाठी करुन[2] मुळुक मारीताती तरी किलेकराचे काम येकच की हुजूरचे आज्ञेप्रमाणे किलेवारी स्थल घ्यावे पुढे निवाडा होणे तो हुजूरुन होईल अथवा गोत मुख्ये होईल ऐसे आहे तरी याचा तो निवाडा याचा यानी केला आहे निवाडपत्र आहे ज्या देवाचे क्रीया केली आहे तो देव आहे नाही तरी देवापासी उभे राहाणे आणि मागती क्रीया बेल घ्याबा तेथे सेवक जाऊन उत्तर लेहोन गोही मानास आणिली जाईल परंतु निवाडा जाहला असता हे हिसाब वर्तो नये यामध्ये स्वामी धणी मायेबाप आहेती सेवेस विदीत होये विनती लक्ष विनती १०००००.

Tryambak Krishna, Sarsubhedar of Prant Vyaghragad, reports to the Pant Amatya that a dispute between Chandjirao and Padajirao, two Patankar brothers, about the division of their Deshmukhi watan of Pargana Patan. Padajirao continued to disturb the country, in collaboration with the Havaldar of the fort Sundargad.

---

[1] व्याघ्रगड=वासोटा

[2] पाठी करणे=सहाय्य, मदत करणे.

औरंगजेबाचा सातार्‍यास वेढा व गड स्वाधीन करण्याबाबत वाटाघाटी

सु. सन मया व अलफ
छ ५ जिलकाद

क्र. १२२

श. १६२२, वैशाख शु. ७
इ. १७००, एप्रिल १४

श्री

राजश्री चांदजीराऊ पाटणकर
गोसावी यांसी

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्नो परशराम त्र्यंबक प्रधान आसिर्वाद सुहूर सन मया व अलफ तुम्ही पत्र पाठविलें पावले सविस्तर वर्तमान कलो आले जमावानसी कुसवडीयाच्या[१] माथा येऊन राहिलो आहो गनिमाचे कहीकाबाड[२] मारीतो म्हणऊन् लिहिले ते कलो आले समाधान वाटले याउपरीहि त्या प्रांते गनिमाची कही येईल ते घेत जाणे तुम्हापासी जमावहि पोखता आहे जमावाचे पोटहि भरेल स्वामी कार्यहि होईल याकरीता गनिमास नतीजा पटवीत जाणे ईकडील वर्तमान तर औरंगजेबाने अजीपावेतो सातारेयास[३] जो ईलाज करावयाचा तो केला परंतु काहीच न चाले या करीता हाली सद्य प्रसंगाचे राजकारण लावणे म्हणउनू रोहिलाखानास[४] हुकूम करुन त्याचे तर्फेने राजश्री विठोजी पाटील आमचे भेटीस पाठविले पातशहांचा आदर देखोन आम्ही राजश्री अंताजी आपदेव यास पातशहाचे भेटीस[५] पाठविले आहेत त्याची भेटी होउनू पुढे जो प्रसंग होउनू येईल तो तुम्हास लिहून पाठऊन देउनू प्रस्तुत सजनगडाखाले कमरदीखान[६] आला याचे कहीस बरी दहशत लाउन कही मारीत जाणे आणि वर्तमान वरचेवर लिहीत जाणे मालोजी व अरजोजी पवार जमावानसी हमी राहिले आहेत पंचवीस

---

[१] कुसवडे–तालुका प्राटण, जिल्हा सातारा.

[२] कहीकाबाड = सैन्याला लागणारे जळण, लाकूडफाटा.

[३] औरंगजेबाने ८ डिसेंबर १६९९ रोजी स्वतः सातार्‍यास वेढा घातला. २१ एप्रिल १७०० रोजी सातारा गड त्याच्या स्वाधीन झाला. मासीर-इ-आलमगिरी, पृ. २५१–५४.

